



डॉ. पवन मांडवकर

# आनंदाचे डोही दु:खाचा तरंग




# अनुक्रमणिका


‘आनंदाचे डोही दु:खाचा तरंग’च्या निमित्ताने / ३
अनुक्रमणिका / ४
१. आनंदाचे डोही, दु:खाचा तरंग / ७
२. शिकवण्यांचा भस्मासूर / १५
३. आजचा युवक आणि शिक्षणपद्धती / २१
४. कॉपीमुक्त अभियान : हेतू चांगला, मार्ग चुकला / २७
५. पटपडताळणीमागचे षडयंत्र / ३०
६. नेट—सेट, एम.फिल., पीएच.डी. / ३६
७. जातीचे राजकारण / ४१
८. विद्यार्थी मिळेल का हो बाजारी? / ग्रामीण भागातील कनिष्ठ महाविद्यालयांची अजूनही विद्यार्थ्यांकरिता भटकंती / ४५
९. श्री क्षेत्र चिंतामणीला गंगेच्या आगमनाची प्रतीक्षा / ४८
१०. कला शाखा खुणावतेय / ५४
११. मातृभाषेतून उच्च शिक्षण / ६०
१२. आंतरविद्याशाखा व विषय निवडीचे स्वातंत्र्य / ६२
१३. विनाअनुदानित शिक्षण संस्थांच्या समस्या / ६५
१४. एक शिक्षकी शाळा / ६९
१५. वाजंत्री, बँड आणि डीजे / ७१
१६. विद्यार्थी पास, शासन नापास, तरी पालकांना आस / ७४
१७. विद्यार्थी मिळेल का हो बाजारी? / ७८





ISBN 978-81-939072-2-1


शिक्षण आणि सामाजिक विषयांवरील चिंतनपर लेख

# आनंदाचे डोही दु:खाचा तरंग

## डॉ. पवन मांडवकर


**सेवा प्रकाशन**
‘पद्मनिलया’, ४२, शिवाजी नगर,
यवतमाळ ४४५ ००१
अमरावती कार्यालय — विजय कॉलनी,
रुक्मिणी नगर, अमरावती ४४४ ६०६
**भ्रमणध्वनी :** ९४२२८६७६५८, ९४०३०१४८८५
e mail : marathipradhyapak@gmail.com

नोंदणीकृत संस्था
**डॉ. यशवंत मोरेश्वर सार्वजनिक शैक्षणिक ट्रस्ट**
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५ ४०१

**मूल्य दोनशे रुपये**

ISBN 978-81-939072-2-1

**आनंदाचे डोही दु:खाचा तरंग**
**(वैचारिक लेखसंग्रह)**
Anandache Dohi Dukkhacha Tarang
(Conceptual Articles)

**© डॉ. पवन मांडवकर**
(© Dr. Pavan Mandavkar)

**प्रथमावृत्ती** दि. १४ जानेवारी, २०२०
(मकर संक्रांती)

**प्रकाशक / मुद्रक / वितरक**
**डॉ.सौ. वीरा मांडवकर**
**सेवा प्रकाशन**
'पद्‌मनिलया', ४२, शिवाजी नगर,
यवतमाळ ४४५००१
**भ्रमणध्वनी** ९४२२८६७६५८, ९४०३०१४८८५
e mail : marathipradhyapak@gmail.com

**प्रकाशन क्रमांक** १९९

**प्रती १०००, पृष्ठसंख्या १६४**

**मुखपृष्ठ/अक्षर जुळणी : डॉ. पवन मांडवकर**

**लेखनस्थळ व कालावधी**
**अमरावती, कळंब, बोरी महाल, यवतमाळ**
१९८६ पासून २०१९

**सहयोगी वितरक व नोंदणीकृत संस्था**
**डॉ. यशवंत मोरेश्वर सार्वजनिक शैक्षणिक ट्रस्ट**
*डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र*
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ

**मूल्य २०० रुपये**

# 'आनंदाचे डोही दु:खाचा तरंग'च्या निमित्ताने

अचानक अशी एखादी घटना घडते आणि मन उद्विग्न होते. कधी लोकप्रतिनिधींच्या, कधी शासनाच्या तर कधी प्रशासनाच्या चुकीच्या निर्णयांचा फटका शिक्षण क्षेत्राला किंवा सामान्यजनांना बसतो. कधीकधी एकामागे एक असे प्रसंग घडतात की मनातल्या भावनांना वाट मोकळी करून देण्यासाठी केवळ लेखणीचाच मार्ग शिल्लक उरतो. अशा अनेक क्षणांच्या साक्षीने कधी आनंद आणि कधी त्याला दु:खाची झालरही अनुभवली. कधी आनंदाऐवजी दु:खाचाच तरंग उमटत गेला आणि असे काही लेख व बातम्या तयार झाल्या. हृदयातून निर्माण झालेल्या लेखनाला प्रसिद्धी अवश्य मिळते आणि तोच अनुभव मलाही आला. कदाचित ह्या भावना जगाला कळाव्या म्हणूनच ही निर्मिती झाली असावी. अशा असंख्य प्रसिद्ध झालेल्या व उपलब्ध असलेल्या माझ्या काही संवेदनांना पुस्तकरूपाने सादर करीत आहे. आणखी बऱ्याच भावना वृत्तपत्रांतून प्रकाशित झालेल्या आहेत; परंतु त्यांना सादर करायला आणखी एक ग्रंथ प्रकाशित करावा लागेल. तूर्तास इतकेच! आपल्या अंत:करणाला ह्या पुस्तकातील विचार निश्चितच स्पर्शून जातील, याची खात्री आहे.

- ***डॉ. पवन मांडवकर***
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
सदस्य, मराठी अभ्यास मंडळ, अमरावती विद्यापीठ
अध्यक्ष, अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद

चिखलदरा हे थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असूनही पर्यटन विभागाने या स्थळाकडे पुरेसे लक्ष दिलेले नाही. यापूर्वी महाबळेश्वर, गणपतीपुळे येथे जाऊन आलो असल्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांची व्यवस्था आणि चिखलदऱ्याची दुर्लक्षित व्यवस्था पाहून दोहोंमधील तफावत मनाला दु:खदायक वाटली.

सर्वसाधारण पर्यटकांना अशा थंड हवेच्या ठिकाणी आठ–दहा दिवस मजेने घालवावेसे वाटतात. त्यासाठी चिखलदऱ्यात निवासाची व्यवस्था उत्तम आहे. महाराष्ट्र पर्यटन खात्याने फिक्या रंगाच्या छोट्या छोट्या इमारती सुसज्ज ठेवल्या आहेत. तेथील स्वच्छता पाहून मन प्रसन्न होते. या टुरिस्ट क्वार्टर्समध्ये सकाळी ९ वाजता आणि सायंकाळी ५ वाजता सुमारे एक तास नळाचे पाणी मिळते. विद्युत प्रवाहाचा मात्र अधूनमधून लपंडाव सुरू असतो. त्यामुळे अनेकदा फजिती होते.

भोजनाची सोयसुद्धा बऱ्यापैकी आहे. महाराष्ट्र टुरिझम अँड डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या (एम.टी.डी.सी.) कँटीनमध्ये ऑर्डर देऊन शाकाहारी जेवण मिळू शकते. सकाळी ११ आणि संध्याकाळी ६ नंतर सुमारे २ तास जेवणाची वेळ असते. त्याच कँटीनमध्ये हवा तेव्हा चहा मिळू शकतो. अर्थात दर भरपूर असतात. क्वार्टर्ससमोरच हे कँटीन आहे. उन्हाळ्यात तर बरीच मंडळी समोरच्या झाडाखाली मोकळ्या हवेत खाणेपिणे करताना दिसतात.



१८. राजकारण्यांच्या शिक्षणसंस्था : एक प्रश्नचिन्ह / ८०
१९. जुन्या महाविद्यालयांची विज्ञान शाखेसाठी अनुदानाची मागणी / ८३
२०. कागदावरची महाविद्यालयेसुद्धा अनुदानाच्या शर्यतीत / ८६
२१. यवतमाळ जिल्ह्यातील ५१ महाविद्यालयांवर टांगती तलवार / ९०
२२. वाणिज्य शाखेकडे वळण्याची गरज / ९३
२३. अमरावती विद्यापीठाच्या विभाजनाची आवश्यकता / ९८
२४. बदलती शिक्षणव्यवस्था : दशा आणि दिशा / १०२
२५. शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक चिंतन / १०६
२६. स्वतंत्र भारतातील बेरोजगारीची समस्या / १२६
२७. नॅकचे नखरे हजार / नॅकची काळी बाजू / १२९
२८. कारणे दाखवा नोटिशीला प्रतिसाद न देणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई / १३९
२९. कामचलावू महाविद्यालयांना उच्च न्यायालयाचा दणका / १४२
३०. पीएच.डी.प्राप्त आणि नेटसेटग्रस्त प्राध्यापकांना सर्वोच्च न्यायालयाचा तात्पुरता दिलासा / २००९ पूर्वीच्या पीएच.डी. प्राप्त प्राध्यापकांना नेटसेटमधून सूट देण्यासंबंधी यूजीसीचा प्रस्ताव / १४५
३१. कनिष्ठ महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या शोधात / १५१

३२. ग्रामीण भागातील कला–वाणिज्य कनिष्ठ
महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या शोधात /
विज्ञान महाविद्यालयांची चंगळ / १५३
३३. रॅगिंग टाळता येणे सहज शक्य / १५६
एक अभ्यासू साहित्यिक / डॉ. गोविंद कासट /
१६३



# आनंदाचे डोही दुःखाचा तरंग

## (चिखलदरा)

गाडीने एक छोटासा वळसा घेऊन घाट चढण्यास प्रारंभ केला आणि थंडगार झुळूक अंगावर रोमांच आणून मोहित करून गेली. जसजसा घाट चढून वर जाऊ लागलो, तसतसे वातावरण अधिकाधिक गारेगार होत गेले. एक बराच मोठा घाट चढून गाडी उतरणीला लागली. एक रोमांचक गोळा पोटातून वर उठल्यासारखे वाटू लागले. घाट पूर्ण उतरून संपताच पाच ते सात मिनिटांत आम्ही चिखलदऱ्याच्या एस.टी. स्टँडवर पोचलो. कोणतीही इमारत नसलेल्या त्या स्टँडला एक बस स्टॉपच म्हणावेसे वाटले. एस.टी.तून बाहेर पडताच अतिशय आल्हाददायक अशा वातावरणाने मनाला एकदम तजेला आला. लगेच आम्ही भटकंतीला सुरुवात केली. कारण खांद्यावरील शबनम बॅगेखेरीज फारसे सामान आमच्याजवळ नव्हतेच.

घरून निघण्यापूर्वी चिखलदऱ्याचा नि प्रेक्षणीय स्थळांचा नकाशा नीट पाहून अभ्यास केला होता. त्यामुळे गाईड वगैरे शोधण्याचा प्रयास करावाच लागला नाही आणि म्हणून 'वन टू' सुरू केले.

चिखलदऱ्याची प्रेक्षणीय स्थळे पाहताना एक गोष्ट प्रामुख्याने जाणवली ती अशी की इंग्रजांच्या राजवटीपासून

पहायला मिळतात. हे वन्यप्राण्यांचे दर्शन आपण सुरक्षित जागी असल्यामुळेच आपल्याला समाधान देते; पण रेस्ट हाऊसचा दरवाजा आतून पक्का बंद केला नसेल तर मग मात्र वेळ काही सांगून येत नाही, हे लक्षात ठेवलेलेच बरे! जवळूनच वाहणारी नदी, तिचे निळसर वर्णाचे पाणी हेही मनाला मोहविणारे एक आकर्षण! चिखलदऱ्याला गेल्यावर कोलखासला एक रात्र न घालविता परत येणारी मंडळी दुर्दैवीच समजायला हवीत.

चिखलदरा हे असे प्रेक्षणीय थंड हवेचे ठिकाण; पण एका गोष्टीचा त्रास सहन करायची तयारी असेल तरच तिथे जाण्याचा बेत करा. हो, कारण इथे भटकायला, पॉईंट्स पाहायला कुठल्याही प्रकारचे वाहन मिळत नाही. पायीच भटकंती करावी लागते. तेव्हा लठ्ठभारतींनी आपला आवाका आधी जोखावा. बसने जाणाऱ्यांनी बस सोडली की आपल्या पायांचा आधार घ्यावा. स्वतःच्या कारने किंवा जीपने जायला मिळाले तर तुम्ही खरे भाग्यवान! सर्वच पॉईंट्सपासून थोड्याफार अंतरावर गाड्या उभ्या करता येतात व थोडेफार चालून प्रेक्षणीय स्थळांचे दर्शन घेता येते.

हं, एक महत्त्वाची गोष्ट सांगायची विसरलोच. भकास वाटणाऱ्या गाविलगडच्या किल्ल्यात फिरायची तुम्हाला हौस असेलच तर भरभक्कम मोठी वॉटरबॅग गळ्यात अडकवून न्या. तिथे तुम्हाला कुठेही प्यायला



या छोट्या छोट्या निवासाचे भाडे फारसे महाग नाही. साधारण दर्जाच्या निवासाला चोवीस तासांसाठी फक्त पंचवीस रुपये पडतात. मध्यम दर्जा चाळीस रुपये तर प्रथम दर्जाच्या निवासाला साठ रुपये रोज असे भाडे द्यावे लागते. एक खंत अशी की या जागांचे बुकींग किंवा रिझर्वेशन चिखलदऱ्यात न होता अमरावतीच्या हॉटेल टुरिस्टमध्ये होते.

चिखलदऱ्यात राहण्याची आणखी एक सोय आहे, ती म्हणजे जंगलखात्याचे विश्रामगृह. या जागेचे बुकींग मात्र तिथेच करता येते. येथेही सर्वसाधारण व्यवस्था उत्तम आहे. या गावात उपहारगृहे, खाणावळी अगदी बोटावर मोजण्याइतक्या आहेत. उन्हाळ्यात थंडपेयाची सोय होते.

वनखात्याचे रेस्ट हाऊस आणि पर्यटन खात्याच्या विश्रामगृहापासून वनउद्यान आणि हरिकेन पॉईंट फार जवळ आहेत. वनोद्यानाला रोजगार्डन असे म्हणतात, कारण तेथे विविध रंगांचे नयनमनोहर गुलाब फार मोठ्या प्रमाणावर अतिशय नेटकेपणाने वाढवले आहेत. लहान मुलांना खेळण्याचा आनंद मिळावा म्हणून विविध प्रकारची साधनेही या बगिच्यात आहेत. या ठिकाणी फिरताना अर्धा पाऊणतास कसा निघून जातो, हे कळत नाही. मन अगदी मंत्रमुग्ध होते. रोजगार्डनपासून दोनच मिनिटांच्या अंतरावर हरिकेन पॉईंट आहे. तेथील छत्रीतून खाली

पाहिले असता खोल खोल दऱ्या आणि दूरवर गाविलगड किल्ला अंधुकसा दिसतो. येथे सावलीची सोय असल्याने आसमंताचे दर्शन आल्हाददायक वाटते.

अशाच प्रकारे किचकदरा, प्रॉस्पेक्ट पॉईंट, मोझरी पॉईंट, कालापानी टँक, लाँग पॉईंट, सक्कर पॉईंट, वीरटँक ही सर्व स्थळे दर्शनीय आहेत; परंतु यापैकी अनेक स्थळी पोचविणारे रस्ते मात्र खडबडीत मुरमाड असल्यामुळे वाहनांचे फार हाल होतात. देवी पॉईंट अतिशय गलिच्छ झाल्याचे जाणवते. तेथे जंगलातून आलेली काही मंडळी वस्ती करू लागली आहेत. ते लोक आणि इतर भिकारी वगैरे तेथे कोंबड्या, बोकड सोलून भाजत असतात. त्यामुळे आम्हाला तर किळसच आली; पण इतर धार्मिक वृत्तीच्या मंडळींनाही ते दृश्य पाहावेसे वाटत नाही. वैराट पॉईंटसुद्धा आम्हाला फारसा प्रेक्षणीय वाटला नाही. वैराट हे सातपुडा पर्वतातील सर्वोच्च शिखर आहे, अशी माहिती सुलभ विश्वकोशात आढळते. पंचबोलमात्र खरंच आनंदाचा अनुभव देतो. आपण जोरदार हाळी दिली की तिचे प्रतिध्वनी ऐकू येतात. एक–दोन–तीन–चार... पाचवा प्रतिध्वनी मात्र इतका क्षीण असतो की कधीकधी पंचबोलातून चारच वेळा घुमलेला आवाज ऐकायला मिळतो.

गाविलगडच्या किल्ल्याची दुर्दशा मात्र न वर्णण्याइतकी वाईट झाली आहे. रस्ता अतिशय खडतर



तरीही धडपडून पाहायला जाणाऱ्याला दिसते तर काय तर किल्ल्याचे मोडकळीला आलेले दरवाजे, दोन–तीन तशीच अव्यवस्थित मंदिरे आणि एक तोफ. इतकी पायपीट करून असे दृश्य पाहिल्यानंतर 'हेच काय फळ मम तपाला?' असे म्हणत प्रवासी माघारी फिरतो. सहसा कोणी किल्ल्याकडे फिरकत नाही. आता इतिहास संशोधकांबद्दल किंवा इतिहासप्रेमींबद्दल असे विधान मला करता येणार नाही, हे नक्की!

यानंतर चिखलदऱ्याचे आणखी एक आकर्षण म्हणजे कोलकास. याला 'कोलखास' म्हणून ओळखतात. अतिशय उत्कृष्ट, मनाला मोहवून टाकणारा हा पॉईंट. उन्हाळ्यात श्रांत–क्लांत–शांत वातावरणाचा अनुभव इथेच मिळू शकतो. दिवसा आजूबाजूची वनश्री पाहण्याकरिता आपण चार–पाचजणांच्या गृपने फिरू शकतो. पण रात्री घराबाहेर पडणे अतिशय धोकादायक आहे. या ठिकाणी सुंदर मजबूत रेस्ट हाऊस आहे. त्याचे रिझर्वेशन अमरावतीच्या कॅम्प भागातील डिपार्टमेंट ऑफ फॉरेस्टच्या ऑफीसमध्ये करता येते. या ठिकाणचा रेट प्रतिदिवशी ५० रुपये आहे, असे कळते. जेवण्याची सोय तेथील आचाऱ्याला पैसे देऊन करता येते. रात्रीच्या वेळी या रेस्ट हाऊसवरील सर्चलाईट सुरू करतात. त्यामुळे आजूबाजूच्या जंगलझाडीतून मोकळ्या जागी येणारी जनावरे वाघ, चितळ, कोल्हे वगैरे रेस्ट हाऊसच्या काचांतून

शिकवतात ते थातुरमातूर. विद्यार्थ्यांना समजतंय की नाही, याचा विचार ते करतच नाहीत आणि समजा एखाद्या विद्यार्थ्याने हिंमत करून वर्गात 'हे समजले नाही, पुन्हा सांगता का?' असे विचारले तर, 'तुम्हाला डिफिकल्टी असेल तर घरी या. पहाटे ५ ते ६ ची नवीन बॅच नुकतीच सुरू झाली आहे' असे उत्तर मिळते. प्राचार्यांकडे काही तक्रार करता येत नाही, कारण ते 'मी काय करू?' असे विचारतात.

'एकाही शिकवणी वर्गाला न जाता मी मेरीटमध्ये आलो' अशा मुलाखती आपण वर्तमान पत्रात वाचतो. त्यात कितपत तथ्य असते, ते तेच बिचारो जाणोत! माझ्या अंदाजाने त्यांचे जवळचे नातेवाईक (ट्युशन फी न घेता मार्गदर्शन करणारे) किंवा वडील एखाद्या मोठ्या हुद्यावर असल्यामुळे त्यांना दबलेले प्राध्यापक शिकवणी वर्गाचे नाव न घेता अशा मेरीटच्या विद्यार्थ्यांना मदत करीत असतील किंवा आणखी एक मार्ग तर सर्वांच्या परिचयाचा आहेच. एम. व्हिटॅमिन परीक्षकांना, विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना दिले की मेरीट लिस्टमध्ये नाव येऊ शकते; पण ही सगळी असामान्य मुलांची कहाणी. आमच्यासारख्या सामान्य बुद्धीच्या आणि सामान्य परिस्थितीत जगणाऱ्या व शिकून इंजिनियर, डॉक्टर किंवा काही उच्च पद मिळविण्याची अभिलाषा धरणाऱ्या विद्यार्थ्यांचे काय? प्रत्येक विषयाच्या शिकवणीचा दर



पाणी मिळणार नाही. आणि माकडांच्या टोळ्यांना हाकलायला एक काठी तुम्ही जवळ बाळगली नाहीत तर तुमचे हात, पाय, केस ओढायला ते कमी करणार नाहीत. तेव्हा मंडळी जरा जपूनच जा हं! या चिखलदऱ्याला टुरिस्ट टॅक्सी आणि ऑटोरिक्षाची सोय झाली तर या पर्यटनक्षेत्राचे काश्मीरइतके महत्त्व वाढू शकेल, असे मला नक्की वाटते.

तर मित्रहो, आम्ही आता चिखलदऱ्याहून परत अमरावतीच्या मार्गावर लागलोय. बसचा प्रवास, घाटाचा रस्ता त्यामुळे थोडं मळमळायलाही लागतं बसमध्ये आणि राहायची सोय आधी केलेली नाही ना! त्यामुळे आता पॉईंट्स तर सगळे बघितले. खूप पदयात्रा झाली. पायही बोलायला लागलेत. तेव्हा घरी जाऊन विश्रांती घेतलेली बरी नाही का?

मग हे सगळं वर्णन ऐकून सगळ्या सोयींनिशी एकदा भेट देणार ना चिखलऱ्याला? काय बेत आहे तुमचा?

तुमच्या माहितीसाठी एस.टी. स्टँड, चिखलदऱ्यापासून विविध प्रेक्षणीय स्थळांचे अंतर सांगतो. घ्या डायरीत टिपून.

१. देवी पॉईंट — १.६ कि.मी.

२. वन उद्यान — १.६ कि.मी.

३. हरिकेन पॉईंट — २.२ कि.मी.

४. कालापानी टँक – १.६ कि.मी.
५. सक्कर पॉईंट – १.६ कि.मी.
६. मोझरी – २.४ कि.मी.
७. भीमकुंड वा किचकदरा – ३ कि.मी.
८. लाँग पॉईंट – ३ कि.मी.
९. प्रॉस्पेक्ट पॉईंट – ३ कि.मी.
१०. वीर टँक – ३ कि.मी.
११. गाविलगड – ४.२ कि.मी.
१२. पंचबोल वा एकोपॉईंट – ५.३ कि.मी.
१३. वैराट – ११ कि.मी.
१४. कोलखास – ४५ कि.मी.

(अमरावती–चिखलदरा बसने प्रवास – मे १९८६,
लेखन – जुलै १९८६
पूर्वप्रसिद्धी – १. साहित्य मैफल, रविवार पुरवणी,
दै. हिंदुस्थान, अमरावती, दि. २८–८–१९८६
२. दै. नागपूर पत्रिका, नागपूरचे रविवारचे साप्ताहिक,
दि. १४ ते २० सप्टेंबर १९८६)



# शिकवण्यांचा भस्मासूर

बेसुमार शिकवण्या घेणाऱ्या प्राध्यापकांवर महाराष्ट्र शासन काही कारवाई करणार आहे असे वर्तमान पत्रात वाचले आणि खूप खूप आनंद झाला. गरीब आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना आता दिलासा मिळेल, अशी आशा वाटली. पण फक्त शिकवणी वर्गावर अवलंबून राहून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे निकाल आता पडतील. बारावीचे जे काही ३०–३५ टक्के निकाल लागत होते ते घसरतील, या भीतीने वाईटही वाटले. पण आशा करूया की शासनाने शिकवणी वर्ग बंद केल्यानंतर ही शिकवणी घेणारी प्राध्यापक–शिक्षक मंडळी आपल्या नोकरीच्या ठिकाणी म्हणजे वर्गात प्रामाणिकपणे विद्यार्थ्यांना आवश्यक ती मदत करतील. पूर्ण वेळ त्यांच्या अभ्यासाकडे लक्ष देतील व त्यामुळे आर्थिक अडचणीमुळे शिकवणी वर्गाला जाऊ न शकणाऱ्या माझ्या अनेक विद्यार्थी मित्रांना पुरेसे मार्गदर्शन वर्गात होईल व ते स्वतः मेहनत करून उत्तीर्ण होऊ शकतील.

अमरावती शहरातच काय पण या विद्यापीठ कक्षेत येणाऱ्या बहुतेक सर्वच महाविद्यालयांत प्राध्यापकांवर विशेषतः गणित, अकाऊंट्स, फिजिक्स, केमेस्ट्री, बॉयलॉजी आणि इंग्रजी हे विषय शिकविणाऱ्या प्राध्यापकांबद्दल विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया विचारल्या तर हेच उत्तर मिळेल की वर्गात ही मंडळी शिकवतच नाहीत. जे काही

काय हरकत आहे?

ही सगळी व्यथा माझ्या एकट्याची नाही. अनेक विद्यार्थ्यांशी, खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांशी चर्चा केल्यानंतर त्यांनी जे काही सांगितलं तेच इथे मांडलं आहे. माझ्या प्रिय प्राध्यापकांनो, आमचं सुस्थिर जीवन घडविण्यासाठी, आमच्यासमोर आदर्श हवा आहे. मातृपितृ देवतेसमान आम्ही तुम्हालाही देव मानतोय; पण देव भक्तांचं रक्षण करतात की भक्षण? कराल का कधीतरी आत्मपरीक्षण? लहान तोंडी मोठा घास झालाय, याची जाणीव ठेवून क्षमा मागतो. पण मग आम्ही आमचं गाऱ्हाणं कुणापुढे मांडावं?

(लेखन – सप्टेंबर १९८६
पूर्वप्रसिद्धी – उगवतीचे रंग, दै. देशोन्नती, अकोला, दि. २६–१०–१९८६)
(डॉ. श्रीकांत तिडके हे दै. देशोन्नतीच्या 'उगवतीचे रंग' या नव्याने सुरू झालेल्या सदराचे संयोजक होते. ठिकठिकाणचे महाविद्यालयीन प्रतिनिधी त्यांनी निवडले. त्यात माझी अमरावती प्रतिनिधी म्हणून निवड झाली. दुर्दैवाने हा लेख छापल्यानंतर ते सदर बंद पडले.)



रु. ४५० ते ५५०. आता इंग्रजी, गणित, फिजिक्स, केमेस्ट्री, बॉयलॉजीची शिकवणी लावायची म्हणजे वडिलांचे तीन पगार तरी घालवायला हवेत. कसं शक्य आहे हे गरीब पालकांना? त्या उलट ह्या शिकवण्या करणाऱ्या प्राध्यापकांची आमदानी किती याचा हिशोब वाचकांना करता येईल. एका बॅचमध्ये ३० ते ४० विद्यार्थी. साधारणपणे तीन ते चार महिन्यात एक विषय संपवायचा की दुसरी बॅच सुरू.

'गणिताचे बादशह' म्हणून तीन प्राध्यापकांची नावे घेतली जातात. त्यांच्याकडे तर प्रत्येक शिकवणी वर्गाला ६५ जे ७० विद्यार्थी असतात. दिवसातून ६ ते ७ बॅचेसना शिकवणे हा त्यांच्या हातचा मळ. वर्षातून तीन वेळा अशा वर्गांचे आयोजन. प्रत्येक विद्यार्थ्याकडून ५०० ते ५५० रु. मिळणार. माझे तर डोळे फाटून जातात हा हिशोब करताना!

कला विभागाच्या प्राध्यापकांना अशी कमाई नाही म्हणून ते जळकुकडेपणा करतात नि विज्ञान व वाणिज्य विषयांच्या प्राध्यापकांची तक्रार करतात शासनाकडे, असाही सूर ऐकायला मिळतो. पण मला असं वाटतं की खरंच ही अशी अफाट संपत्ती गोळा करणाऱ्या प्राध्यापकांना कधीच असे वाटू नये का की विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्व जागृत करण्याची माझी जबाबदारी आहे आणि मी शासनाकडून नोकरीचा जो पगार घेतो त्याचा पुरेपूर

मोबदला महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना देणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. वर्गात नीट शिकवले, कोर्स पूर्ण केला तर आपल्या शिकवणी वर्गाला कोण येणार, हीच काळजी त्यांना सतावत असावी.

आर्थिक पाठबळ नसल्यामुळे शिकवणी वर्गाला जाऊ न शकणाऱ्या हुशार विद्यार्थ्याने ग्रंथालयाच्या भरवशावरच अभ्यास करायचा ठरवला तर तिथेही काय परिस्थिती आहे बघा. मी एकदा आमच्या ग्रंथपालांना 'नटसम्राट' हे नाटक अभ्यासासाठी मागितले तर त्यांनी दिले 'सैतान'. मी काही बोलू लागताच 'हवे असेल तर हेच घ्या, नाहीतर चालायला लागा' असा दरडावणीचा सूर त्यांच्या तोंडून बाहेर पडला. मग विज्ञान, गणित, अकाऊंट, इंग्रजी या विषयांची अभ्यासाची पुस्तके आम्हाला मिळू शकतील, अशी आशा तरी कशी करायची? प्राध्यापकांच्या नावे यातील बरीचशी पुस्तके वर्षभर असतात. याबद्दल प्राचार्यांनी त्यांच्यावर कारवाई करायला नको का?

माफ करा! कोळसा कितीही उगाळला तरी तो गोरा थोडीच होणार! नाही, हे मला कळतंय; पण शासनाच्या निर्णयाने आशा वाटू लागली आहे. राष्ट्राची एकता आणि अखंडता कायम राखण्यासाठी, हे उद्याचे आधारस्तंभ तयार करण्याची जबाबदारी या शिक्षक, प्राध्यापकांवर आहे. त्यांचाच आदर्श समोर ठेवून आजचे



विद्यार्थी उद्या आर्थिक शोषणाचा मार्ग स्वीकारू लागले तर काय होईल?

उडदामाजी काळे गोरे,
काय निवडावे निवडणारे
कुचलियाची वृक्षफळे
मधुर कोठून असतील?

असे असले तरी काही निस्वार्थी प्राध्यापक माझ्या पाहण्यात आहेत. कुठल्याही मोबदल्याची अपेक्षा न करता विद्यार्थ्यांना वेळीअवेळी अभ्यासाचेच मार्गदर्शन नव्हे तर आर्थिक मदत करणारे, मानसिक दिलासा देणारे प्राध्यापकही अमरावतीत आहेत. पण ते किती? तर एका हाताच्या बोटावर मोजण्याइतके किंवा एखादा कमीच. अशा प्राध्यापकांबद्दल आम्हा सर्वच विद्यार्थ्यांना अंतःकरणपूर्वक आदर वाटतो. असा आदर्श सगळ्याच प्राध्यापकांनी पुढच्या पिढीसमोर ठेवला तर राष्ट्र सुजलाम सुफलाम नाही का होणार?

आणखी एक विचार व्यक्त करतो. ही शिकवणी वर्गाच्या साह्याने अफाट संपत्ती जमवणारी प्राध्यापक, शिक्षक मंडळी महाविद्यालयातील किंवा हायस्कूलमधील जागा का अडवून ठेवतात? दिवसेंदिवस बेकारी वाढतेय. एम.एससी., एम.कॉम., एम.ए. इंग्रजी झालेल्या अनेक नवतरुणांना नोकऱ्या मिळत नाहीत. तर या शिकवणी वर्गाच्या बादशहांनी त्यांच्यावर एवढे उपकार करायला

हिंसाचार, बलात्कार, खून, नशापाणी हे सर्व तरुणांच्या हातून घडते हे सत्य आहे. पण का? समाजात त्याला कोणते स्थान आहे? त्याच्या सत्प्रवृत्तीला, प्रामाणिकपणाला, हुशारीला संघटन कौशल्याला, कलेला काही वाव आहे का? कॉप्या करून, प्राध्यापकांना पैसे देऊन गुण वाढवून मेरीट लिस्टमध्ये येणारे विद्यार्थी या खऱ्या अभ्यासू मंडळींवर अन्याय नाही का करत?

वर्गात प्रामाणिकपणे न शिकविता दिवसरात्र ट्युशनचे क्लासेस चालविणारे कितीतरी प्राध्यापक बंगले उभारतात, गाड्या घेतात आणि आपल्या मुलांना परदेशात शिकायला, मजा मारायला पाठवतात. हे दृष्य आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या हुशार, प्रामाणिक विद्यार्थ्याला किती असह्य वेदना देत असेल याचा विचार कुणी करणार आहे की नाही? काही प्राध्यापक त्यांना नेमून दिलेले तासही वर्गात शिकवत नाहीत पण त्यांच्याकडे पहाटे ५ पासून रात्री ११ वाजेपर्यंत ट्युशनच्या बॅचेस सुरू असतात, हे उघड सत्य आहे. मग वर्गात शिकवायला त्यांना शक्ती राहीलच कशी? पण नोकरीसाठी एक जागा अडवून शासनाचे अडीच–तीन हजार रुपये दरमहा पगारापोटी हडप करण्याचा यांना काही अधिकार आहे का?

विद्यार्थ्यांनी सत्यशील असावे, प्रमाणिक असावे, इमानदार असावे, सत्यवादी असावे, असे सांगणारे हे



# आजचा युवक आणि शिक्षणपद्धती

लहान मुले अनुकरणातून शिकतात. आजचा विद्यार्थीही याला अपवाद नाही. थोरामोठ्यांचा, आपल्या पालकांचा, शिक्षकांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच तो आपले वर्तन करीत असतो. आजच्या समाजातील उपरोक्त थोर मंडळींच्या कर्तृत्वावर दृष्टी टाकली तर कोणते आदर्श विद्यार्थ्यांसमोर येतात हे स्पष्ट सांगायला हवे का? इंग्रजांच्या काळापासून चालत आलेली कारकून निर्माण करणारी शिक्षण पद्धती आजच्या युवकांना निराशेच्या गर्तेत लोटत आहे. व्यवसायाभिमुख शिक्षण अजूनही दिले जात नाही. त्यामुळे डिग्र्या घेतलेल्या सुशिक्षित बेकारांची संख्या दिवसागणिक वाटते आहे. त्यातूनच गुंडगिरीची प्रवृत्ती निर्माण होत आहे. निवडणुकांच्या निमित्ताने राजकारणाचा धुडगुसही शिक्षण संस्थांतून वाढला आहे.

आजचा युवक दिशाहीन झाला आहे. बेजबाबदारपणे वागू लागला आहे. बलात्कारी, हिंसाचारी झाला आहे. अभ्यासाव्यतिरिक्त इतर भानगडीतच त्याला रस वाटतो. असे अनेक आरोप आज विद्यार्थ्यांवर, तरुणांवर केले जातात. पण ही राष्ट्राची नवी पिढी अशी का वागते, याचा विचार करायला नको का? आईच्या पोटातून

जन्माला येताच कोणतेही बालक दुर्गुणी नसते. आजूबाजूचे वातावरण त्याला तसे बनवते.

प्राथमिक शाळेमध्येही दारू पिणारे शिक्षक, स्वत: अभ्यास न करता मार्गदर्शक वाचून विद्यार्थ्यांना प्रश्नोत्तरे लिहून देणारे शिक्षक, वर्गात बसण्याऐवजी शिक्षकमंडळीत तंबाखू, बिडी, दारू, सट्टा, तीनपत्ती, चित्रपट, लॉटरी आदींच्या गप्पा मारणारे शिक्षक आणि विद्यार्थ्यांची लहानशी चूक झाली तरी त्याला समजावून न सांगता घाणेरड्या शिव्या देणारे शिक्षक असे हे दृष्य मुलाला रोज पाहायला मिळते.

महाविद्यालयात प्रवेश मिळाल्यावर आणखी भयानक दृष्ये त्याला पाहायला मिळतात. शैक्षणिक संस्थांमधील भ्रष्टाचार त्याला उघड्या डोळ्यांनी बघावा लागतो. जो उठतो तो महाविद्यालय सुरू करतो. केवळ आर्थिक लोभापायी बेजबाबदारपणे या संस्था चालवल्या जातात हे त्याला कळत का नाही? अनेक प्राध्यापकांची आणि कारकून, चपराशाचीसुद्धा नेमणूक कुठे अध्यक्षांचा नातेवाईक तर कुठे इतर पदाधिकाऱ्याचा नातेवाईक म्हणून केली जाते. अनेकदा तर दहा, पंधरा हजार रुपये घेऊन प्राध्यापकांच्या नेमणुकी केल्या जातात. मग जो जास्त डोनेशन देईल त्याला नोकरी या न्यायाने शिकवता न आले तरी चालते. प्राध्यापकही मी इतके पैसे दिले आहेत, तेव्हा माझी नोकरी कायम असा सोयीस्कर



विचार करून शिकविण्याच्या बाबतीत बेजबाबदारीने वागतात. राखीव जागांच्या हक्कामुळे तर फक्त जातीच्या सर्टिफिकेटवर नेमणुका होतात. शिकवण्याचे कौशल्य असलेल्या प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होणाऱ्या तरुणांवर सरासर अन्याय केला जातो. प्रामाणिकपणे परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांवरही असाच अन्याय केला जातो आणि मग निराशेपोटी हा विद्यार्थी गैरकृत्य करायला प्रवृत्त होतो. त्याला ह्या न्यूनगंडाने पछाडलेले असते की आपण कितीही हुशार असलो, आपल्याला नोकरीची नितांत गरज असली तरी आपल्याजवळ राखीव जातीचे प्रमाणपत्र नाही. खूप डोनेशन आपण देऊ शकत नाही. म्हणून आपल्याला समाजात कुठेच जागा नाही, या नैराश्यातून तो वाममार्गाला लागतो. गुंडांच्या सान्निध्यात सापडतो आणि मग त्याच्या हातून नको ते गुन्हे होऊ लागतात. यासाठी जबाबदार कोण? आजचा सडलेला समाजच नाही का?

राजकारणी लोकांचा, उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार आणि त्यातून उभे राहणारे त्यांचे बंगले, मोटारी, गावोगावी असणाऱ्या इस्टेटी ह सर्व आजच्या तरुणाला प्रत्यक्ष वर्तमानपत्रे, चित्रपट, टी.व्ही. या मार्गाने पहायला मिळते. मग तोच मार्ग तरुणांनी अवलंबला की आजचे तरुण बिघडले, वाया गेले असा आरडाओरडा सुरू होतो.

आहे. स्वत:चे कार्यालय सोडून, जनतेच्या समस्यांना आणि कामकाजाला बगल देऊन ही मंडळी शाळा–महाविद्यालयांमध्ये या देशाचे आपण फार मोठे जबाबदार अधिकारी झालो आहोत, अशा आविर्भावात सुटाबुटात वावरत आहेत. या कामात कसूर केल्यास त्यांच्यावरही कारवाई करणार असल्याचे संकेत शासनाने दिले असल्याने त्यांची अवस्थाही 'धरलं तर चावतं आणि सोडलं तर पळतं' अशी झाली आहे. परिणामी ते बैठे राहण्यापेक्षा फिरत्या भूमिकेत अधिक दिसत आहेत.

ही संपूर्ण यंत्रणा शासनाने कॉपी पकडण्यासाठी लावली आहे, असा गैरसमज सामान्य जनतेचा, पालकांचा होईल; परंतु असा कुठलाही शासन निर्णय, अध्यादेश, आदेश, नियम, परिनियम, विनियम पारीत झालेला नाही आणि स्कूल कोडही बदलण्यात आलेला नाही. तरी देखील शासनाने नियमबाह्य त्यांना या कामी जुंपले आहे. पटवारी सात बारा देईनासे झाले आहेत. दुष्काळी भागात पाण्याचा प्रश्न सोडवायला जिल्हाधिकाऱ्यांपासून, तहसिलदार, नायब तहसिलदार कार्यालयात उपस्थित नाहीत. महसूल विभागाची कामे ठप्प झाली आहेत. शेतकऱ्यांसह दीन–दलितांची नाडवणूक होत आहे. आता शिक्षण विभागाला टाळे ठोकून शासनाने अन्य यंत्रणांमार्फतच शिक्षणप्रणाली राबवावी, इतका अविश्वास शिक्षकांवर दाखविल्या गेल्याने शिक्षकांसह संस्थाचालकंमध्ये रोष



प्राध्यापक स्वत: कसे आहेत? अत्यंत हीन मनोवृत्तीचे आणखी एक उदाहरण देतो. जे विद्यार्थी आपल्याकडे ट्युशनला येत नाहीत, त्यांनी कितीही उत्कृष्ट गृहपाठ केला असेल तरी त्याला सही द्यायची नाही किंवा कमी गुण द्यायचे आणि आपल्याकडे ट्युशनला येणारा विद्यार्थी कितीही 'ढ' असला, त्याने जेमतेमच गृहपाठ लिहिला तरी त्याला भरपूर गुण देऊन उच्च श्रेणीत आणावयाचे असा त्यांचा खाक्या असतो. गरीब, प्रामाणिक, होतकरू आणि अभ्यासू विद्यार्थ्यांच्या–तरुणांच्या मनात या गोष्टीचा काहीच परिणाम होत नसेल, असे कोणीही सज्जन म्हणणार नाही. आपल्या लाडक्या विद्यार्थ्यांना परीक्षेत कॉपी करू द्यायची आणि एखाद्यावर उगीचच कुठल्यातरी जुन्या अपमानाचा सूड उगवायचा असेही वागणारे प्राध्यापक आहेत. त्यांचाच कित्ता गिरवून 'मैभी तुम्हे देख लुंगा, चौक में आना' अशी दमदाटी करणारे गुंड विद्यार्थी निर्माण होतात. म्हणजेच शिक्षकांनाही असुरक्षितता वाटते; पण ह्या सगळ्या अनर्थाला कारण आदर्श म्हणून पाहावे, अशा व्यक्तीच आजकाल दिसत नाहीत विद्यार्थ्यांना.

असे असले तरी सगळेच तरुण विद्यार्थी वाया गेले असे म्हणता येणार नाही. खरेतर मूठभर गुंड प्रवृत्तीच्या मुलांमुळे इतर मुलेही बदनाम होतात. एक सडका आंबा टोपलीभर आंबे नासवून टाकतो; पण त्या

ढीगभर आंब्यांना एक सडका आंबा दुरुस्त करता येत नाही. हाच न्याय आज शिक्षणक्षेत्राला लागू होतो असे वाटते. तरुण पिढीच्या बाबतीतही तसेच म्हणावे लागते. आजूबाजूला सरकारी, निमसरकारी खाजगी अशा सर्वच क्षेत्रात 'तो करतो मग मी का नको करू?' या न्यायाने भ्रष्टाचार, अनीती बोकाळली आहे. मग अनुकरण कुणाचे करायचे?

आमचे थोर पुढारी, आमदार, खासदार, प्राचार्य, कलेक्टर, कुलगुरू, कुलसचिव वगैरे उच्चपदस्थ मंडळी, राष्ट्रप्रेम, प्रामाणिकपणा, श्रमाची प्रतिष्ठा, गरिबांचा कैवार, विज्ञानाची प्रगती, देशहित अशा अनेक विषयांवर अगदी कळकळीने भाषणे ठोकतात; पण प्रत्यक्षात यांचे आचरण तसेच असते का याचा शोध घेतला तर? जाऊ द्या, कोळसा कितीही उगाळला तेवढा काळाच; पण म्हणून आम्ही निराश होणार नाही. आम्हाला उद्याचा भारत घडवायचा आहे. तेव्हा या खाचखळग्यांना बाजूला सारून आम्ही प्रगतीचा मार्ग चोखाळणारच आहोत.

(लेखन – अमरावती १९८६
पूर्वप्रसिद्धी – 'तंत्रसंगम' वार्षिकांक, रुरल इन्स्टिट्युट, अमरावती, १९८६–८७)



# कॉपीमुक्त अभियान
# हेतू चांगला, मार्ग चुकला

सध्या कॉपीमुक्त अभियानाचा ज्वर संपूर्ण महाराष्ट्रात पसरलेला आहे. अगदी जिल्हाधिकाऱ्यांपासून पंचायत समितीच्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यापर्यंत संपूर्ण शासकीय यंत्रणा या कामी वेठीस धरलेली आहे. या अभियानाचा हेतू चांगला असला तरी मार्ग मात्र चुकलेला आहे.

राजकारणी आणि शिक्षणतज्ज्ञ या एकाच नाण्याच्या दोन बाजू कधीच होऊ शकणार नाहीत. मात्र आपण फार मोठे शिक्षणाचे जाणकार आहोत आणि मनात येईल ती योजना वाटेल त्या मार्गाने राबवू शकतो, असा गैरसमज राज्यकर्त्यांपैकी कोणी केला तर त्यांची कशी उचलबांगडी होते, हे महाराष्ट्राने यापूर्वी अनेकदा अनुभवले आहे.

दहावी–बारावीच्या परीक्षांकरिता कॉपीमुक्त अभियान सुरू आहे. अनेक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांना स्वत: जिल्हाधिकारी भेट देत आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयापासून तहसिल कार्यालय, पंचायत समिती, महसूल विभाग यांमध्ये कार्यरत तहसिलदार, नायब तहसिलदार, विस्तार अधिकारी, पटवारी यांसह कार्यरत अन्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती 'बैठे पथक' या गोंडस नामकरण केलेल्या फिरत्या पथकात करण्यात आली

करायची? २० टक्क्यांपेक्षा जास्त अनुपस्थिती असणाऱ्या शाळांची मान्यता रद्द करायची तर कुठली नियमावली किंवा अधिनियम वापरावयाचा? २१ ते ४९ टक्क्यांपर्यंत अनुपस्थिती असणाऱ्या शाळांतील शिक्षक अतिरिक्त करून समायोजित करायचे कसे? शाळांची मान्यता काढायची तर १९८१ च्या सेवाशर्ती नियमावलीनुसार कर्मचाऱ्यांच्या सेवासंरक्षणाचे काय? ५० टक्क्यांपेक्षा जास्त अनुपस्थितीच्या शाळेतील शिक्षकांच्या, मुख्याध्यापकांच्या सेवा समाप्त करायच्या तर विद्यार्थीसंख्येवरच पदनिश्चिती केली जाते आणि संचमान्यतेनुसार शिक्षक ठरतात किंवा अतिरिक्त ठरल्यास इतरत्र समायोजित केले जातात, मग शिक्षण उपसंचालकांनी केलेली संचमान्यता खोटी ठरवायची का? की संचमान्यतेची प्रकियाच रद्द करायची? शिवाय सेवा समाप्त केलेले शिक्षक उद्या न्यायालयात दाद मागण्यास गेले तर विद्यार्थी गैरहजर होते म्हणून नोकरीवरून काढले असे शासनाचे म्हणणे हास्यास्पद ठरेल व परत शिक्षकांना रुजू करून त्यांना सर्व थकबाकी देण्याचा निर्णय न्यायालय देईल.

अशा संस्थाचालकांवर, मुख्याध्यापकांवर, शिक्षकांवर फौजदारी गुन्हे दाखल करा, असे म्हणणे म्हणजे ‘उलटा चोर कोतवाल को डाटे’ असेच समजावे लागेल. एकीकडे एकही विद्यार्थी शाळाबाह्य राहू नये, म्हणून दुर्गम भागातही शिक्षणाची गंगा पोचवा, सक्तीचे प्राथमिक शिक्षण करा अशा केंद्रसरकारच्या सूचना, भारतावर आलेले जागतिक दडपण यांचा विचार करता अशा शाळा बंद करणे म्हणजे मा. सर्वोच्च न्यायालयाचाही अवमान केल्यासारखे



आहे.

आज बहुतांश शाळा–महाविद्यालये ही राजकारणाशी संबंधितांची आहेत. अशा ठिकाणी बैठे पथक बैठेच राहते. नाश्ता, भोजन, शीत पेय यांवर ताव मारण्यात ही पथके रममाण झाल्याच्या बातम्या ऐकायला आणि वाचायला मिळतात. अशा ठिकाणी ‘मुक्त कॉपी अभियान’ चालते. उपाशी तापाशी शासकीय यंत्रणेला हा पिकनिक फारच भावतो आणि विशिष्ट ठिकाणी आपली ड्युटी लावून घेण्याची स्पर्धा निर्माण होते. हे कर्मचारी चुकीचे काम करत आहे, असे कोणालाच वाटत नाही. कारण या देशातल्या वरच्या पातळीवरून झिरपत येणाऱ्या भ्रष्टाचाराला रोखणे अण्णा हजारेंसह देशाच्या लाखो नागरिकांना शक्य झाले नाही, तिथे हे दावणीला बांधलेले कर्मचारी तरी प्रामाणिकतेची कुठली लढाई लढू शकणार आहेत?

(लेखन – फेब्रुवारी २०१३
पूर्वप्रसिद्धी – दै. लोकदूत, यवतमाळ २७–२–२०१३)

# पटपडताळणीमागचे षडयंत्र

कुठल्याही समस्येचे निराकरण करावयाचे असल्यास त्या समस्येच्या मुळाशी जावे लागते. गेल्या वर्षी झालेल्या शालेय व कनिष्ठ महाविद्यालयीन पटपडताळणीच्या संदर्भात वृत्तपत्र आणि दूरचित्रवाहिन्यांवरून ज्या बातम्या प्रकाशित आणि प्रसारित झाल्या, त्यावरून महाराष्ट्रातील शिक्षणसंस्था, संस्थाचालक, मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक हे प्रचलित शिक्षण व्यवस्थेचे फार मोठे गुन्हेगार आहेत, असे चित्र निर्माण झाले किंवा जाणूनबुजून तसा भास निर्माण केल्या गेला. ह्या घटकांची प्रतिमा मलीन करून शासन आपले कर्तव्य उत्कृष्टपणे पार पाडत आहे, असे समाजमनावर बिंबवण्याचा हा प्रयत्न होता. त्यात शासनाला काही प्रमाणात यश मिळालेही; परंतु या हव्यासापोटी ज्या नवीन समस्या निर्माण झाल्या, त्यांचे निराकरण अद्यापही झाले नाही आणि नव्याने पटपडताळणीची तयारी शासनाने सुरू केलेली आहे.

लालफितशाहीत काम करणारा अधिकारीवर्ग आपल्या विभागाच्या मंत्रीमहोदयांची दिशाभूल करून भ्रष्टाचाराचे नवे मार्ग कसे शोधतो, त्याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. नव्याने एखाद्या खात्याचा प्रभार घेतल्यानंतर काय नवीन करू आणि काय नको, असे झालेल्या मंत्रीमहोदयांना अधिकाऱ्यांचा आणि कर्मचाऱ्यांचा हा गनिमी कावा लक्षात येत नाही आणि त्याची परिणती अशा समस्यांमध्ये होते.

वर्षभरातून केवळ एक दिवस होणाऱ्या पटपडताळणीत गैरहजर विद्यार्थी म्हणजे 'बोगस विद्यार्थी' अशी नवी व्याख्या



शासनाने केली. मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ व नियमावली १९४९, म.खा.शा. कर्मचारी (सेवाशर्ती) अधिनियम १९७७, नियमावली १९८१ आणि माध्यमिक शाळा संहिता यांचे पुरेसे अध्ययन न करता अनेक निर्णय घेतले गेले. ह्या विविध नियमावलींमध्ये बदल करण्याकरिता कुठलीही प्रक्रिया न अवलंबता मंत्रीमंडळाची मंजुरी न घेता प्रसारमाध्यमांपुढे भाष्य केले, तेच नियम म्हणून सांगितले आणि महाराष्ट्राच्या पुरोगामी जनतेने त्यावर विश्वास ठेवला.

१० ते २० टक्क्यांपर्यंत अनुपस्थिती असणाऱ्या शाळांची जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पुन्हा पटपडताळणी करा, २० टक्क्यांपेक्षा जास्त अनुपस्थिती असणाऱ्या शाळांची मान्यता रद्द करा, २१ ते ४९ टक्क्यांपर्यंत अनुपस्थिती असणाऱ्या शाळांमधील होणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांचे समायोजन करा, ५० टक्क्यांपेक्षा जास्त अनुपस्थिती असणाऱ्या शाळांवर, शिक्षणसंस्था चालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करा, अशा शाळांची पटपडताळणी करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करून त्यांना निलंबित करा, अशा शाळांच्या प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करा असे परस्पर विरोधी हिटलरी आदेश दिले गेले. यापैकी एकाही आदेशाची अंमलबजावणी करणे शासनाला नियमात बसवून शक्य नाही, ही वस्तुस्थिती आहे.

जिल्हाधिकाऱ्याने २० टक्क्यांपेक्षा कमी उपस्थिती असलेल्या शाळांची वारंवार फेरतपासणी करायला जाणे म्हणजे वर्षातले त्यांनी किती महिने याच कामी घालवायचे? मग इतर कामे केव्हा

# नेट–सेट, एम.फिल., पीएच.डी.

'दै. तरुण भारत'च्या २८ जून २०१० च्या अंकात डॉ. अ.ल. देशपांडे यांचा 'नेट-सेटच्या कुबड्या' हा प्रासंगिक लेख, प्रा.डॉ. के.के. मदान यांचे मनोगत तर ५ जुलै २०१० च्या अंकातील प्रा. केशव मेंढे यांचा 'नेट-सेट एलिजिबिलिटी; तर एम. फिल., पीएच.डी. डिग्री' हा प्रतिक्रियात्मक लेख वाचला. हे दोन्ही लेख आणि पत्र नेट-सेट परीक्षेसंदर्भातील माहिती देण्यासाठी नसून जातिभेदाच्या भिंती बळकट करण्याच्या उद्देशाने लिहिले गेले आहेत की काय, अशी शंका येते.

शतकानुशतकापासून उपेक्षित राहिलेल्या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अपार कष्ट सोसले. उच्चवर्णीयांची मक्तेदारी असलेल्या सर्व क्षेत्रात तत्कालीन अस्पृश्यांना संधी मिळावी म्हणून आरक्षणाची तरतूद केली गेली. मनुष्यबळ विकास मंत्रालयानेही स्वांतत्र्योत्तर काळात डॉ. आंबेडकरांच्या विचारांची कुठेही पायमल्ली होऊ दिली नाही. डॉ. भालचंद्र मुणगेकर किंवा डॉ. सुखदेव थोरात यांनी यूजीसीचे अध्यक्षपद भूषवतानाच जातीयतेला थारा मिळू नये यासाठीच प्रयत्न केले. नेट-सेटच्या उत्तीर्णतेसाठी वर्गवारीनुसार गुणांची अट टाकली गेल्यावर अनेकांनी विरोध केला होता. त्या विरोधातूनच पीएच.डी., एम.फिल. ही प्राध्यापकपदासाठी पात्रता समजली गेली. त्याचे संपूर्ण श्रेय डॉ. मुणगेकरांना द्यावे लागेल.

पुढे विविध सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होत असताना त्यांना कटू अनुभव आले आणि त्याची परिणती डॉ. थोरांताच्या



होईल.

पटपडताळणीची ही नाट्यसंहिता नेमकी कुणाकरिता लिहिली गेली, याचाही विचार केला पाहिजे. पटपडताळणी करण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालयापासून प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक शिक्षणविभाग, शिक्षण संचालक व उपसंचालक कार्यालय, डाएट, पंचायत समिती आणि महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांना वेठीस धरले गेले. तपासणी करीत असताना आजूबाजूच्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांच्या शिक्षकांनाही सोबत घेतले गेले. ही माणसे निवडताना हितसंबंध जोपासले गेले. पूर्वग्रहदूषित मानसिकतेने आणि आपण कोणीतरी मोठे 'इनिस्पेक्टर' झालो अशा आविर्भावात धाड टाकल्यासारखा हपापलेपणा दाखवला गेला. काही जवळच्या किंवा राजकीय वरदहस्तांच्या शाळांच्या तपासण्या नावापुरत्याच ठेवून दारू-मटणाच्या पार्ट्या झोडल्या गेल्या. पुढील दारातून शाई लावून विद्यार्थी बाहेर काढून शाई पुसून परत मागील दाराने आत शिरवले गेले व पटसंख्या वाढवली गेली. सोयीस्कररीत्या अहवाल पाठवले गेले. त्याकरिता आगतस्वागत, फराळपाणी आणि पाकिटांचे निकष जोडले गेले. यामध्ये शिक्षण उपसंचालक कार्यालय, शिक्षण विभाग, मुख्याध्यापक, शिक्षक यांना आपापल्यापरीने कसरत करावी लागली. यात मरण ओढावले ते प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या शिक्षकांचे, त्यांच्या शाळांचे. ज्यांना बोगस काम जमले, ते तरले. प्रामाणिकतेची हार झाली.

पटपडताळीमागच्या षडयंत्राचे सखोल अध्ययन केले तर लक्षात येते की या तपासणीच्या नावाखाली जुन्या अनुदानित शाळा

व कनिष्ठ महाविद्यालयांना बंद करणे व त्या ठिकाणी आर्थिक व्यवहार करून भरमसाठ नवीन संस्थांना परवानगी देणे, पुढे त्यांच्या 'कायम विनाअनुदानित'मधील 'कायम' शब्द काढणे व कालांतराने त्यांना अनुदानित करणे हा प्रमुख उद्देश आहे. अशा अधिकाधिक शाळा नवीन राजकारण्यांच्या आहेत.

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची अनुपस्थिती हा आजच्या काळात गंभीर गुन्हा मानता येईल का? मोठमोठ्या राजकारण्यांपासून, डॉक्टर, इंजिनियरच्या मुलांपासून सामान्य घरातलीही मुले ११ वी, १२ वीचे वर्ग नियमित न करता कोचिंग क्लासेसमध्ये जातात. पीईटी, पीएमटीसारख्या परीक्षांची तयारी पॅकेज घेऊन करतात. शासनाला ही अनुपस्थिती खरोखर गंभीर वाटत असेल, तर प्रथम संपूर्ण महाराष्ट्रातले सर्व खाजगी शिकवणीवर्ग कायद्याने बंद करावे. अगदी स्पर्धात्मक परीक्षांपासून सर्वच प्रकारचे जे शिक्षण द्यायचे ते शाळा-महाविद्यालयातच द्यावे, असा आदेश काढून त्याची कडक अंमलबजावणी कशी होईल याकडे लक्ष द्यावे. नवीन शाळा, महाविद्यालये देताना पाच किलोमीटर परिसरातील अन्य शिक्षण संस्थांचे नाहरकत प्रमाणपत्र घेण्याचा नियम अस्तित्वात असूनही त्याची अंमलबजावणी होत नाही. आर्थिक व्यवहार करून ह्याकडे कानाडोळा करू नये. मागेल त्याला शाळा-महाविद्यालये वाटल्याने विद्यार्थी आणण्यासाठी चढाओढ लागते. विद्यार्थी पैसे देऊन, उत्तीर्णतेची हमी देऊन आणले जातात आणि ते केवळ कागदावरच राहतात. शिष्यवृत्ती हडपल्या जातात व शिक्षणाचा दर्जा ढासळतो. या सर्व प्रकाराला शासनयंत्रणा जबाबदार आहे.



येत्या काळात उच्चशिक्षण क्षेत्रातही पटपडताळणी होणार आहे. आजी-माजी शिक्षणमंत्र्यांपासून सर्वच मंत्री, आमदार, खासदार यांनी शिक्षणाचा धंदा सुरू केला असून त्यांच्या शिक्षण संस्थांचे तपासणी अहवाल उत्तमच राहतील. मात्र प्रामाणिकपणे ज्ञानदान करणाऱ्या शिक्षणसंस्थांचे मरण आहे. आज लाखात उलाढाल आहे, उद्या कोट्यवधींची होईल. प्रचंड प्रमाणातील सवलतींची सक्ती, विद्यार्थ्यांना निष्क्रिय बनविण्याची ही चाल आंतरराष्ट्रीय स्तरावरून होते आहे. शाळा-महाविद्यालये वाटपाचा बाजार, शिष्यवृत्ती घोटाळे, खाजगी शिकवणी वर्ग आणि राज्यकर्त्यांचा शिक्षण क्षेत्रातील धुडगूस जोपर्यंत बंद होणार नाही, स्पर्धापरीक्षांसह सर्व प्रकारचे मार्गदर्शन शाळामहाविद्यालयांतून होणार नाही, आपला पाल्य नियमित शाळा-महाविद्यालयात जावा, ही मानसिकता जोपर्यंत पालकांची होणार नाही, तोपर्यंत भ्रष्टाचारासाठी निर्माण झालेली बोगस पटपडताळणीसारखी षडयंत्रे आपल्या देशातून हद्दपार होणार नाहीत.

**(लेखन – सप्टेंबर २०१२**

**पूर्वप्रसिद्धी** – दै. तरुण भारत १३-१०-२०१२
दै. लोकदूत १४-१०-२०१२
दै. देशोन्नती, अकोला, दि. १२-१०-२०१२)

ठरेल. डॉ. वि.भि. कोलतेही कितीतरी अभिप्रायांवर, पत्रांवर, लेखांवर 'प्रा. डॉ.' वगैरे लिहिण्याच्या भानगडीत पडत नसत. राम शेवाळकरही नेहमीच 'प्राचार्य' लिहीत नसत. म्हणून ही माणसे तुच्छ ठरलीत का?

मला नेट परीक्षा उत्तीर्ण करून, बी.एड., पीएच.डी. करून तप उलटलं. पण मी स्वतःला बुद्धिमान समजत नाही. आपल्यासारख्या अभ्यासकांच्या लेखांतून सतत शिकत राहतो. विविध विद्यापीठांचे विविध परीक्षांचे पेपर, थिसिस मला तपासावे लागतात. अनेक मुलाखती, प्लेसमेंट कमिट्यांवर जावे लागते. माझ्याही संस्थेत प्राध्यापकांच्या नियुक्त्या कराव्या लागतात; पण जातीयतेच्या दृष्टिकोनातून कधी पाहिले नाही. 'टॅलेंट' सर्च करीत असताना त्यांनी मिळवलेल्या डिग्र्या आणि प्रमाणपत्रे केवळ पात्रता म्हणून बघायची असतात. शाळेची किंवा महाविद्यालयाची कागदी प्रमाणपत्रे नसलेले अनेक नामवंत या जगाने पाहिले. मग तो आइनस्टाईन असो की न्यूटन, महात्मा ज्योतीराव फुले असोत की राष्ट्रसंत तुकडोजी महाराज किंवा संत गाडगेबाबा असोत. खरा हिरा कागदावरून नव्हे तर क्षणाक्षणाला त्याच्याकडून व्यक्त होणाऱ्या प्रत्येक विचारांतून व गुणांतून पारखला जातो. कधी तो मौल्यवान तिजोरीत गवसतो तर कधी चक्क कोळशाच्या खाणीत. शेवटी हिरा तो हिराच असतो. तो कुठे आढळला हे गौण असते.

**(लेखन – जून २०१०**

**पूर्वप्रसिद्धी – दै. तरुण भारत, नागपूर ११–७–२०१०)**



काळात प्राध्यापक पदासाठी एम.फिल.ची पात्रता नाकारून पीएच.डी.ची पात्रता काही काळ ग्राह्य धरली गेली. तरीही सामाजिक असंतोष कमी झाला नाही, तेव्हा अर्जून सिंगांनंतर मनुष्यबळ विकास मंत्री कपिल सिब्बल यांना हस्तक्षेप करावा लागला. त्यातही राजकारण आडवे आले. अमरावती मतदार संघातून राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांचे चिरंजीव श्री. रावसाहेब शेखावत यांना काँग्रेसने उमेदवारी देऊन काँग्रेसचेच तत्कालीन ऊर्जा राज्यमंत्री श्री. सुनील देशमुख यांना हादरा दिला. शिक्षक आमदार व नुटाचे सर्वेसर्वा आदरणीय श्री. बीटीभाऊ देशमुख हे सुनील देशमुखांचे अगदी जवळचे तर राष्ट्रपतींचे पती व शिक्षण क्षेत्रात नावलौकिक असणारे आदरणीय डॉ. देविसिंह शेखावत यांच्यापासून दुरावले गेले. अशा स्थितीत प्राध्यापकांचा संप ४४ दिवस चालला. १९९१ नंतर लागलेल्या व अनेक वर्षे नोकरी झालेल्या नेट-सेटग्रस्त प्राध्यापकांसाठी या परीक्षेतून सूट देण्यात यावी अशी मागणी शिक्षक संघटनांनी केली होती. वैयक्तिक द्वेषातून या प्राध्यापकांना टांगणीवर ठेवत राष्ट्रपती भवनातून हस्तक्षेप केला गेला व नेट-सेटपासून सुटका नसल्याचे सांगण्यात आले तसेच यूजीसीने त्यांना सूट कशाच्या आधारावर दिली, अशी विचारणा केली गेली.

या सर्व प्रकरणात यूजीसी तोंडघशी पडले. म्हणजेच डॉ. थोरात अडचणीत आले. मग कोणाकडून कोणावर अन्याय झाला? या तीनही लेखकांनी नीट अभ्यास केला तर लक्षात येईल की एकंदरीतच माणसामाणसांत भेदभाव करणारी शिक्षण पद्धती आपल्या देशात जाणीवपूर्वक राज्यकर्त्यांकडून निर्माण केली गेली

आहे. वास्तविक उच्चवर्णीय आणि अनुसूचित जाती-जमातींमध्ये एकमेकांप्रती असणारा हा विखार आहे. या दोन्हीमध्ये संख्येने अधिक असलेला बहुजनसमाज भरडला जातो आहे. आता नेट-सेट उत्तीर्णतेसाठी असणारी टक्केवारी पहा.

| उत्तीर्णतेसाठी आवश्यक गुण | | | | |
|---|---|---|---|---|
| | **पेपर १** | **पेपर २** | **पेपर १ + २** | **पेपर ३ (जेआरएफसाठी)** |
| **खुला प्रवर्ग** | ४० | ४० | १००(५० टक्के) | १००(५० टक्के) |
| **ओबीसी** | ३५ | ३५ | ९० (४५ टक्के) | ९० (४५ टक्के) |
| **एस.सी./एस.टी.** | ३५ | ३५ | ८० (४० टक्के) | ८० (४० टक्के) |

पहिले दोन पेपर वस्तुनिष्ठ प्रत्येकी १०० गुणांचे तर तिसरा डिस्क्रिप्टिव्ह पेपर २०० गुणांचा असतो. पहिले दोन्ही पेपर संगणकीय प्रणालीद्वारे तर तिसऱ्या पेपरचे मानवी मूल्यांकन केले जाते. पहिल्या दोन पेपरमध्ये उत्तीर्ण असल्यासच तिसरा पेपर तपासला जातो.

या पद्धतीवर टीकाकार सतत टीका करतात. प्राध्यापक पदाची पात्रता पदव्युत्तर परीक्षेत उच्च द्वितीय श्रेणी व नेट-सेट उत्तीर्ण ही आहे; पण उत्तीर्णतेच्या गुणांमध्ये वर्गवारीनुसार फरक आहे. खुला प्रवर्ग व ओबीसींकरिता पदव्युत्तर परीक्षेत ५५ टक्के गुणांची अट तर एस.सी./ एस.टी. करिता ५० टक्के गुणांची अट हीसुद्धा जातीय सलोख्याचे वातावरण बिघडवते आहे, असा आरोप होत असतो. तिसरा पेपर तपासणारे हे विशिष्ट समाजाचे असतात, एसटीचे फार कमी उमेदवार ही परीक्षा देतात व



फायदा केवळ एससी प्रवर्गालाच होतो, असाही आरोप सतत होत असतो. ह्या आरोपांत तथ्य किती आणि फार्स किती यावर भाष्य करणे म्हणजे दोन्ही समाजांच्या भावना भडकविण्याचे कार्य ठरेल.

वरच्या पातळीवरील राजकारणी सतत सवलती देऊन विशिष्ट समाजाला आणखी पंगू बनवित असतात, हे जरी मान्य केले तरी आणखी काही काळ अशा सवलती मागासवर्गीयांना देणे गरजेचे आहे. अजूनही जागृत मूठभर लोकांपर्यंत खरे फायदे जातात आणि खेड्यापाड्यातला खरा मागासलेला 'माणूस' हा 'माणूस' म्हणूनही जगू शकत नाही.

जर आपल्याला समाजासमाजात तेढ निर्माण करायची नसेल तर डॉ. अ.ल. देशपांडे सरांसारख्या उच्चविद्याविभूषितांनी नेट-सेट परीक्षा उत्तीर्णांवर टोकाच्या भूमिकेतून टीका करू नये. पीएच.डी. किंवा एम.फिल. झालेला काय किंवा नेट-सेट झालेला काय प्राध्यापक हा मूळातच हाडाचा शिक्षक असावा लागतो. त्याने किती वर्ष संशोधन केले हे महत्त्वाचे नसून तो विद्यार्थी कसे घडवतो, तो आपल्या शिक्षकी ध्येयाप्रती किती प्रामाणिक आहे, याला महत्त्व असते. प्रा. डॉ. के.के. मदान व प्रा. केशव मेंढे यांनीही नेट-सेट न झालेल्यांप्रती एवढी तुच्छता लेखू नये, अन्य समाजाप्रती इतकी जहाल विषारी भाषा वापरू नये. सर्वांना स्पर्धात्मक परीक्षांचे तंत्र कळते असे नाही. ते महामूर्ख असतात असेही नाही आणि हे तंत्र न कळणारे स्पर्धात्मक परीक्षा कधी उत्तीर्णच होत नाही, असेही नाही. तसेच 'प्रा.' पहिले व नंतर 'डॉ.' लिहिण्याचा सल्ला देणे दुसऱ्यांना कमी लेखण्यासारखे

विचार पटले नाहीत किंवा जहाल वाटले तरी अतिरेकी, नक्षलवादी तयार होण्यामागची, दररोजचे मोर्चे, तोडफोड, लुटालूट, गुन्हेगारी यामागची कारणे तपासली, तर शासनाने वरील उपायांची अंमलबजावणी करणे काळाची गरज आहे, हे मान्य होईल. जर सुदृढ, एकसंध, भेदभावविरहित भारताची निर्मिती करावयाची असेल आणि 'माणूस' म्हणून जगायचे असेल तर 'जात' नावाच्या राक्षसाची हकालपट्टी करण्यासाठी राज्यकर्त्यांसह प्रत्येक नागरिकाने स्वार्थ सोडून पुढे सरसावण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

**(लेखन — जून २०१०**
**पूर्वप्रसिद्धी — दै. लोकमत, नागपूर, जुलै २०१०)**



# जातीचे राजकारण

दै. लोकमतच्या २७ जून २०१० च्या 'मंथन'मध्ये प्रकाशित पूनम महाजन यांचा *'जाती'शरण* हा लेख म्हणजे राजकारण आणि संस्कारांचा वारसा असलेल्या एका परिपक्व लेखिकेच्या सशक्त विचारांचा आविष्कार आहे, हे प्रथमदर्शनीच लक्षात येते. त्यातून अभ्यासकांसह सामान्यजनांच्या मनातल्या अनेक विचारांना, प्रश्नांना धुमारे फुटतात.

जग कितीही पुढे गेले, आपल्या राज्याने कितीही पुरोगामित्वाच्या, प्रगतीच्या आणि एकात्मतेच्या बढाया मारल्या तरी आपण एका बाबतीत सतत अपयशी ठरलो आहोत. ती बाब म्हणजे जातीला दिले जाणारे अनावश्यक महत्त्व. स्वातंत्र्यलढ्यात तळमळीने कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांच्या कार्याला, विचारवंतांच्या प्रामाणिक विचारांना तिलांजली देत राज्यकर्त्यांनी स्वार्थासाठी जातीचे राजकारण आजही सुरूच ठेवले आहे.

२०११ ची जनगणना जातिनिहाय असावी का, या प्रश्नावर सतत परस्परविरोधी मतप्रवाहांचा भडिमार होत आहे. मागासवर्गीय, इतर मागासवर्गीयांमधील सामान्य माणसे जातिनिहाय जनगणनेची मागणी करीत नसून केवळ राजकारण करू इच्छिणाऱ्या धूर्त कोल्ह्यांचा तो डाव आहे, हे आता पुढे येऊ लागले आहे. अशी जनगणना झाली तर काही बाबी निश्चितच समोर येतील. आपल्या मागे कुठल्या भागात किती जातभाई आहेत, हे पुढाऱ्यांना समजू शकेल. त्यानुसार ते रणनीती आखतील. स्वजातीसाठी झटतील, परजातींना आमिषे दाखवतील. विद्यमान आरक्षण प्रणालीत

वर्गवारीनुसार दिलेले आरक्षण योग्य आहे की अयोग्य हे जनसामान्यांनाही समजेल. त्याही वर्गवारीत मोजक्याच काही जातींना फायदा होतो का, काही जाती अजूनही सुविधांपासून वंचित आहेत का, हेदेखील समजेल.

पण या कसरतीमुळे फार गंभीर प्रश्न निर्माण होतील. आजच जाती-जातीत वाढणारी तेढ आणि शासकीय फायदे घेण्यासाठी विशिष्ट जातींची बनावट प्रमाणपत्रे, व्हॅलिडिटी आणण्याचे प्रयत्न बघितले की भविष्यात येथे अनेक मोठमोठे संघर्ष घडून येण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी माणसामाणसातला दुरावा वाढेल. 'जातीसाठी खावी माती' म्हणणाऱ्यांचे दिवस संपून जातील तर 'खाण्यासाठी जात मिळवावी' अशा नव्या घोषणा दिल्या जातील.

फार पूर्वीही इथे कर्तृत्वावर, गुणांवर आधारित वर्णव्यवस्था होती, जन्माने नाही. ज्याला जे कार्य जमायचे त्यावरून त्याचा वर्ण ठरायचा. लढू शकणारा सैनिक तो क्षत्रिय, ज्ञानदान करणारा ब्राह्मण, व्यापार करणारा वैश्य तर इतर कामे करणारा शूद्र असे ढोबळमानाने ठरविले गेले. त्याही काळात राज्यकर्त्यांनी स्वतःच्या सोयी बघत पिढीजात धंदा, वडिलांचा वर्ण मुलाला जोडणे सुरू केले आणि घात झाला. आज बापाची जात ती मुलाची जात ठरते. स्वार्थासाठी राज्यकर्त्यांसह समाजानेही या बाबीला विरोध करण्यासाठी फार मोठा लढा दिल्याचे उदाहरण नाही. 'भेदाभेद भ्रम अमंगळ' म्हणणाऱ्या तुकोबांपासून तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा अशा अनेक संतांनी जातिव्यवस्थेवर



आपल्या कीर्तन-प्रवचनांतून फार मोठे प्रहार केले होते; पण दुर्दैवाने त्यांचा वैचारिक वारसा चालवायला आज कोणीही नाही.

सामान्य माणसाला आज काय हवे आहे? दोन वेळचे भोजन, नोकरी, व्यवसाय, वीज, पाणी, न्याय, सुरक्षा आणि समाधान. यापैकी त्याला एकही गोष्ट आज धड मिळत नाही. सूर्याची किरणे, वातावरणातील हवा, आभाळातला पाऊस, झाडाच्या सावल्या, पक्षांचा किलबिलाट आपला उपभोग घेऊ देण्यासाठी माणसाची जात विचारत नाहीत. शहरातले श्रीमंत आणि डोंगरवनांत राहणाऱ्या आदिवासींमध्ये ते भेद करीत नाहीत. 'जात नाही ती जात' असे म्हणून पळवाट काढण्यापेक्षा काही उपाय खंबीरपणे अमलात आणण्याची गरज आहे.

१. जातीचा उल्लेख शाळा-महाविद्यालयातील दाखल्यासह कुठल्याही कागदपत्रांमध्ये करण्यावर बंदी आणली जावी.
२. विशिष्ट हेतूपूर्वक कुणी जात विचारली तर त्याच्यावर खटला भरण्यासाठी 'ॲट्रॉसिटी'सारखा कायदा असावा.
३. सर्वच क्षेत्रात जातनिहाय आरक्षण न ठेवता केवळ श्रीमंत आणि गरीब या दोनच वर्गवारी ठेवून शिष्यवृत्तीसह सर्व सवलती कोणत्याही जातींतील फक्त गरिबांनाच द्याव्यात.
४. आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करणाऱ्यांसाठी, त्यापैकी केवळ एक अपत्य असणाऱ्यांसाठी आणि त्यातही केवळ मुलगी असणाऱ्यांसाठी भरघोस बक्षिसे शासनाने द्यावीत, नोकरीत विशेष प्राधान्य द्यावे.

वर्षानुवर्षे ठरावीक परिघात जीवन जगणाऱ्या अनेकांना हे

# श्री क्षेत्र चिंतामणीला गंगेच्या आगमनाची प्रतीक्षा

अखंड भारतातील जी एकवीस गणेशस्थानं गणेशपुराणात वर्णिली आहेत, त्यातील एक स्थान म्हणजे विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील श्री क्षेत्र चिंतामणी कळंब. पश्चिम महाराष्ट्रात ज्या गणेशमूर्तींची अष्टविनायकात नावे आहेत, त्यात ही कळंबनगरीची मूर्ती नाही; परंतु अठरा पुराणांपैकी आठव्या शतकात भृगू ऋषींनी रचलेल्या गणेशपुराणात आणि त्यानंतर मुद्‌गल ऋषींच्या मुद्‌गलपुराणात या गणपतीच्या स्थापनेच्या आणि महात्म्याच्या कथा आलेल्या आहेत. वैदर्भीय अष्टविनायकांत श्री चिंतामणीचा समावेश होतो.

यवतमाळ-नागपूर मार्गावर यवतमाळपासून सुमारे २१ किलोमीटर अंतरावर असलेल्या कळंबच्या चिंतामणीसंदर्भात अनेक कथा आहेत. या गणेशमूर्तीच्या स्थापनेबाबत गणेशपुराणातील कथा अशी की ब्रह्मदेवांनी आपल्या सुस्वरूप अहिल्येच्या विवाहासाठी 'पण' जाहीर केला, की जो कोणी पृथ्वीप्रदक्षिणा करून सर्वात आधी सभामंडपात पोचेल, त्यालाच अहिल्या पत्नी म्हणून प्राप्त होईल. 'पण' ऐकताच सगळेच आपापल्या वाहनाने पृथ्वीप्रदक्षिणा करण्यास त्वरेने निघाले. आर्यावर्तातील गौतम ऋषींनी गंगेवर जाऊन शुद्धोदक स्नान केले आणि आश्रमातील प्रसूतशील गाईला मनोभावे प्रदक्षिणा घातली. त्यानंतर स्वतःभोवती एक गिरकी घेऊन ते ब्रह्मदेवासमोर उभे ठाकले. त्यांनी लगेच अहिल्येची



# विद्यार्थी मिळेल का हो बाजारी?

## ग्रामीण भागातील कनिष्ठ महाविद्यालयांची अजूनही विद्यार्थ्यांकरिता भटकंती

दहावीच्या अभूतपूर्व निकालामुळे यंदा ११ वी प्रवेशाकरिता विद्यार्थी शोधण्याची पाळी शिक्षकांवर येणार नाही, असे गृहित धरले गेले तरी शहराकडचा ओढा आणि नवीन कनिष्ठ महाविद्यालयांच्या मान्यतेमुळे ग्रामीण भागातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना पुन्हा 'विद्यार्थी मिळेल का हो बाजारी?' म्हणत भटकंती करावी लागणार आहे.

या वर्षी यवतमाळ जिल्ह्याचाही दहावीचा निकाल मोठ्या प्रमाणावर लागला किंबहूना लावून घेण्यात आला. जिल्ह्याची प्रवेश क्षमता कमी आणि उत्तीर्णतेचे प्रमाण जास्ती असा देखावा निर्माण करून शिक्षण विभागाने हितसंबंध राखत वाढीव तुकड्या किंवा वाढीव प्रवेशक्षमता देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. मात्र ग्रामीण भागातील पुढील शिक्षणाकरिता असलेली उदासीनता, मुलींचे होणारे विवाह आणि परिणामी त्यातून होणारी गळती या बाबींचा विचार केला तर याही वर्षी ग्रामीण महाविद्यालयांसाठी प्रवेश स्थिती फारशी चांगली नाही. कळंब येथील इंदिरा महाविद्यालयात आजही एक संपूर्ण तुकडी रिक्त आहे. मात्र परिसरातील शाळा दहावीची टीसी सोडत नसल्याने आणि स्वतःच शिक्षण विभागातील

अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संगनमत करून स्वतःजवळील ११ वीच्या प्रवेश क्षमता वाढवून घेण्याचा खटाटोप करतात. परिणामी विद्यार्थ्यांना चांगल्या महाविद्यालयांत जाऊन शिक्षण घेण्याच्या वाटा बंद होतात. यासंदर्भात वरिष्ठ महाविद्यालयाशी जोडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी शिक्षणाधिकारी (उच्च माध्य.), यवतमाळ, मा. शिक्षण उपसंचालक, अमरावती, शिक्षण संचालनालय, पुणे व मा. शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदन देऊन कुठल्याही प्रकारे ग्रामीण भागातील महाविद्यालयांवर अन्याय होता कामा नये व त्यांची विद्यार्थी संख्या पूर्ण झाल्याशिवाय गैरमार्गाने अन्य शाळांना जोडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांना विद्यार्थीसंख्येची वाढ किंवा तुकडी वाटप अवैध मार्गाने करू नये, असे कळविले आहे.

दरवर्षी शासन नव्याने आपल्या हितसंबंधांनुसार कनिष्ठ महाविद्यालयांचे वाटप करीत असते. पुढाऱ्यांच्या शिक्षणसंस्थांच्या गजबजाटात मिशनरींप्रमाणे कार्य करणाऱ्या शिक्षणसंस्थांना अखेरची घरघर लागल्याची परिस्थिती आज निर्माण झाली आहे. अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये तर सोडाच पण कायम विनाअनुदानित संस्थांमध्येही नोकरी मिळणे दुरापास्त होत चालले आहे. अशा स्थितीत आपले महाविद्यालय आणि नोकरी टिकवण्यासाठी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विद्यार्थ्यांच्या शोधात भटकंतीशिवाय दुसरा उपाय नाही.

पुण्यामुंबईसारख्या मोठ्या शहरांप्रमाणे आज यवतमाळमध्येही ग्रामीण भागातील पालक आणि विद्यार्थ्यांचा ओढा वाढला आहे.



या उलट ग्रामीण भागात विद्यार्थ्यांना घरोघरी जाऊन शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन, त्यांच्या पालकांना विविध आमिषे दाखवून प्रवेशासाठी उद्युक्त करावे लागते. प्रसंगी त्यांची टीसी ताब्यात घेऊन त्यांचा फॉर्म स्वतःच भरून त्यांना परीक्षेकरिता हजरही करण्याची भूमिका शिक्षकांना निभवावी लागते. स्वतः खर्च करून असे प्रवेश मिळवावे लागतात. सदर विद्यार्थ्यांच्या उत्तीर्णतेची हमी पालकांना द्यावी लागते.

शासनाने घेतलेला दहावीत २ विषयांत नापासांना एटीकेटीने ११ वीत प्रवेश देण्याचा निर्णय नव्याने उघडत चाललेल्या कनिष्ठ महाविद्यालयांसाठी आनंदी आनंद देणारा असला तरी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा ढासळवत जाणारा आहे. पुढची निर्माण होणारी ग्रामीण भागातील पिढी ही शैक्षणिकदृष्ट्या मागासलेली तयार होणार आहे. पुढेही शिक्षणक्षेत्रात राज्यकर्त्यांच्या अशाच हस्तक्षेपातून आठवीपर्यंतच कशाला, दहावीची परीक्षाही रद्द होईल आणि शिक्षणाची प्रमाणपत्रे दुकानातून मिळणाऱ्या किराणा मालाप्रमाणे मिळू लागतील. पण तेव्हाही 'विद्यार्थी मिळेल का हो बाजारी?' असे ओरडत शिक्षकांची आणि संस्थाचालकांची भटकंती सुरूच राहील.

**(लेखन — जून २०१०**
**पूर्वप्रसिद्धी — दै. सकाळ, यवतमाळ, दि. २०–६–२०१०)**

आहेत.

गणेशकुंड इंद्राच्या काळातील असावे, अशी श्रद्धा ठेवून भक्त ह्या गणेशकुंडातील पाणी गंगेचे तीर्थ म्हणून प्राशन करीत. गणपतीच्या पादप्रक्षालनार्थ दर बारा वर्षांनी गंगा येते, गंगास्नानाने सर्व पापे धुतली जातात असा भक्तजनांचा समज आहे. सर्वांची पापं धुणारी गंगा माता स्वतःही पापसंपृक्त होते आणि नाइलाजाने ज्या चिंतामणीच्या कृपेने इंद्राची पापे धुतली गेली, त्या चिंतामणीलाच स्पर्श करून स्वतः पापमुक्त होते. आज ह्या कुंडावर काचेचे झाकण लावलेले आहे, जेणेकरून भक्तांनी त्यात फुले, पैसे टाकून पाणी दूषित होऊ नये.

ही गंगा आली की पाण्याची पातळी वाढू लागते. मंदिरातील ह्या कुंडातून पाणी झिरपू लागते. काही दिवसांतच या पाण्याचा स्पर्श चिंतामणी मूर्तीला झाला की पाणी ओसरू लागते असे सांगतात. आतापर्यंत **१९१८, १९३३, १९४८, १९५८, १९७०, १८८३, १९९५** या वर्षांत गंगा आली होती. यावरून तंतोतंत बारा वर्षांनी गंगा अवतरत नाही, असे लक्षात येते. सतत दोन किंवा वर्ष भरपूर पाऊस झाला तर दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्षी ही गंगा अवतरत असावी. मात्र आपण मंदिरात उतरतो, त्याहीपेक्षा खोल असणारी ही विहीर दरवर्षीच्या पावसाने तुडुंब भरून वाहत का नाही, श्रीचिंतामणीचा पदस्पर्श होईपर्यंत पाण्याची पातळी वाढते आणि नंतर ती आपोआप कमी का होते, हे कोडेच आहे.

**१९९५** मध्ये सप्टेंबर महिन्यात अवतरलेल्या या गंगेची



मागणी केली. आपल्या बुद्धिचातुर्याने शास्त्रार्थ विशद करून अर्धप्रसूत गाईस प्रदक्षिणा घालणाऱ्याला पृथ्वीप्रदक्षिणेचे पुण्य लाभते, तसेच सगळे विश्व आपल्यातच सामावलेले असल्यामुळे स्वतःभोवती गिरकी घेऊन विश्वप्रदक्षिणा पार पडते, हे त्यांनी सभामंडपातील सर्वांना पटवून दिले. ब्रह्मदेवांनी ते मान्य करून अहिल्येचा गौतमाशी विवाह लावून दिला. त्यानंतर लवकरच धावपळ करत इंद्रदेव सभामंडपात इतर सर्वांच्या आधी पोचले; पण येताच अहिल्या गौतमांशी विवाहबद्ध झाल्याचे पाहून ते संतप्त झाले.

पुढे एके दिवशी गौतम ऋषी स्नानसंध्या करण्यासाठी नदीवर गेले असता इंद्राने गौतमवेशात त्यांच्या आश्रमात जाऊन अहिल्येशी जारकर्म केले. गुपचूप चोरपावलांनी इंद्रदेव आश्रमाबाहेर पडत असताना गौतमांनी पाहिले आणि इंद्रदेवाला शाप दिला की 'तुझ्या शरीराला सहस्र भगे पडतील आणि तू विद्रूप कुष्ठरोगी होशील.' नकळत अहिल्येनेही हे पाप केल्याने तिलाही 'तू शिळा होऊन पडशील' असा शाप दिला.

कुष्ठाने पीडित इंद्र लज्जित झाल्यामुळे देवलोकांत गेला नाही. देवांच्या राजाची ही अवस्था पाहून देवगुरू बृहस्पती इंद्राला घेऊन गौतमाकडे गेले आणि त्यांची क्षमा मागितली. गौतमांनी उःशाप दिला की 'कदंबनगरीत जाऊन गणेशाच्या षडाक्षरी मंत्राचा जप कर.' त्याप्रमाणे भगांकित इंद्राने बारा वर्षे कदंब वृक्षाखाली बसून तपश्चर्या केली. भगवान श्री गणेश प्रसन्न झाले. त्यांनी अंकुशाने त्या ठिकाणी एक कुंड निर्माण केले व स्वर्गीची

गंगा त्या कुंडात प्रवाहित केली. त्या गंगाजलाने स्नान केल्यावर इंद्राची त्वचा पूर्ववत सुकुमार नितळ झाली. त्याचे शरीर अधिक तेज:पुंज झाले पुन्हा स्वर्गातील देवाधिदेव म्हणून त्याला मान्यता मिळाली.

गौतम ऋषींच्या शापातून मुक्त झाल्यावर चिंतामणी देवतेची स्थापना जेव्हा इंद्राने केली, तेव्हा चिंतामणीपूजनासाठी पृथ्वीवरील पाणी कसे वापरावे, हा प्रश्न पडल्याने इंद्राने स्वर्गातूनच श्री गंगेला आवाहन केले आणि पूजनानंतर तिला दर बारा वर्षानंतर श्री चिंतामणीला स्नान घालण्याची आज्ञा केली, अशीही आख्यायिका आहे.

ज्याच्या कृपेने इंद्राला पूर्वपद लाभले, त्याच्या स्फटिकवत् अंगुष्ठमात्र मूर्तीची स्थापना इंद्राने तपश्चर्येच्या जागीच केली, ती ही गणेशमूर्ती - श्री चिंतामणी. भक्तांच्या चित्तातील इच्छा पूर्ण करणारा - श्री गजानन.  नंतरच्या काळात भाविक भक्तांनी चढवलेल्या शेंदूरलेपनामुळे मूळ मूर्तीचे स्वरूप बदलले.

जमीन सपाटीपासून सुमारे पस्तीस फूट खोल जागेत हे मंदिर असल्यामुळे दुरून कळसही दिसत नाही. जवळ पोचल्यावर रस्त्यावर उभे राहिले असता मंदिराच्या प्रवेशद्वाराऐवजी कळस दिसतो. मंदिराचा संपूर्ण परिसर बाहेरून शिवपिंडीप्रमाणे भासतो. तत्कालीन शिल्पकारांनी ही रचना अत्यंत कल्पकतेने केली असावी. मंदिरात प्रवेशासाठी तसे तीन मार्ग आहेत. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारातून आत शिरल्यावर समोरच चतुर्मुखी गणेशमूर्ती दिसते. एकाच दगडात चारही दिशेला गणेशमुखे असून त्यांचे



हात एकमेकांत मिसळलेले आहेत. ही मूर्ती गावाच्या उत्तरेकडे प्राचीन गढीत खोदकाम करताना सापडली होती. या मूर्तीच्या पुढ्यात भव्य सभामंडप आहे. त्याची निर्मिती स्व. नारायणराव राजहंस उर्फ बालगंधर्वांनी केली आहे. यवतमाळ येथे त्या काळात झालेल्या त्यांच्या एका कार्यक्रमाचे सगळे उत्पन्न त्यांनी या मंदिरास दिले. त्यांचे औदार्य पाहून भगवान भिकू नावाच्या गवंड्याने कुठलाही मोबदला न घेता हा सभामंडप बालगंधर्वांच्या देणगीतून बांधून दिला. मंदिरात उतरण्याच्या पहिल्याच पायरीवर संगमरवरी फरशी बसवलेली होती. त्यावर सौ. जनाबाई मा. मांडवकर यांनी मंदिरास **३०–७–१९५७** रोजी ३०१ रुपयांची देणगी दिल्याचे कोरले आहे. सर्व भक्ताचे पाय त्यावर पडत असल्याने ती सध्या प्रवेशद्वाराजवळ डावीकडे भिंतीवर बसवली आहे.

मंदिरात शिरून एकोणतीस पायऱ्या उतरल्यावर समोर बाहेरून अष्टकोनी व आतून चौकोनी असे कुंड आहे. त्याला श्रीगणेश कुंड असे म्हणतात. इंद्र आणि अन्य असंख्य भक्तांचा कुष्ठरोग दूर करणारे हे महातीर्थ असलेले कुंड. हे कुंड म्हणजे एकप्रकारची निमुळती विहीरच आहे. गणेशकुंडासमोरील गाभाऱ्यात श्री चिंतामणीची मूर्ती आहे. दक्षिणाभिमुख असलेली ही गणेशमूर्ती जगात एकमेव असावी, असे काही अभ्यासक म्हणतात. कदाचित इंद्रदेव तपश्चर्येला उत्तरेकडे तोंड करून बसले असावे, त्यांच्यासमोर श्रीगणेश प्रगटले असावे, म्हणून गणेशमूर्तीचे तोंड दक्षिणेकडे असावे. या मूर्तीला चार हात, गजमुख आणि शूर्पकर्ण

म्हणून त्यांना बाहेरही चांगली संधी मिळू शकते. राष्ट्रपातळीवरील कार्यालये, हॉटेल व्यवसाय, बहुराष्ट्रीय कंपन्या यांनाही अशा द्विभाषी इंटरप्रिटरची सतत गरज असते.

मानसशास्त्र विषय घेणाऱ्यांना आज मानसोपचार समुपदेशनाचे क्षेत्र उपलब्ध आहे. मोठमोठ्या शाळा, कारखाने, व्यसनमुक्ती केंद्र, शासकीय कार्यालये एवढेच कशाला क्रीडा क्षेत्रातही त्यांना चांगली संधी आहे. वाढत्या ताणतणावात महानगरांमधील प्रौढ व्यक्ती तर मानसोपचार घेतातच; पण आपल्या मुलांनाही सोबत आणून त्यांच्या अभ्यासाच्या व जीवनात यशस्वी होण्याच्या दृष्टीने अशा समुपदेशकांकडे हजेरी लावतात.

भूगोलाबरोबर खगोलशास्त्र, लोकसंख्याशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास, पुरातत्तवशास्त्राचा अभ्यास करणाऱ्यांना हवामान विभाग, पर्यटनक्षेत्र, वास्तुशास्त्रविभाग अशा ठिकाणी नोकरी मिळू शकते किंवा मार्गदर्शक म्हणूनही संधी असते.

राज्यशास्त्राचे विद्यार्थी राजकारणात तर येतातच पण आज त्यांनी, लोकप्रशासनाचा, पत्रकारितेचा अभ्यासक्रम त्याला जोडला तर राजकीय भाष्य अथवा आकडेवारी विश्लेषण करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांप्रमाणेच प्रसारमाध्यमांसारख्या वाढत्या क्षेत्रात त्यांना संधी खुणावत आहेत. आशियातील राजकारण अभ्यासकांना युरोपातही खूप मागणी आहे.

जात, धर्म, लोकसंख्या, आरक्षण, जीवनप्रणाली, सामाजिक चालीरीती अशा सर्व बार्बीचा अभ्यास करणारे समाजशास्त्राचे विद्यार्थी मानववंशशास्त्र, लोकसंख्याशास्त्र, पत्रकारिता, मास



दूरदुरून आलेल्या भाविकांनी पूजा केली व तीर्थ नेले. नोटांची पुडकी, सोने, नाणी, फुले गंगेला अर्पण केली. सुमारे वीस-बावीस दिवस चिंतामणी मंदिरातील चौकात पाणी होते. मोटर लावून पाणी उपसले तरी लगेच ते पाझरून येई. भाविकांच्या पूजेची फुले, पाने, नारळ, दुर्वा यांमुळे पाणी दूषित होऊन जनतेला त्रास होऊ नये, त्यासाठी ते सारखे उपसावे लागे.

या घटनेला आता सतरा वर्षे पूर्ण झाली आहेत. श्री गणेशोत्सव जवळ आलेला आहे. गेल्या वर्षी कळंबमध्ये चांगला पाऊस झाला होता. यंदा पावसाने सरासरी ओलांडली आहे. जमिनीतील पाण्याची पातळी अपेक्षेपेक्षा वाढलेली आहे. चिंतामणी मंदिरातील गंगेच्या आगमनाचे उगमस्थळ असलेल्या कुंडातून अद्याप पाणी झिरपू लागलेले नाही; परंतु श्रद्धा आणि विज्ञानवादी दृष्टिकोनाची सांगड घातल्यास यंदा श्रीगंगेचे आगमन होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. श्री चिंतामणीचे भक्त आणि श्रद्धाळू यंदा गंगेच्या आगमनाची प्रतीक्षा करीत आहेत, एवढे मात्र खरे!

**(लेखन – जुलै २०१०**
**पूर्वप्रसिद्धी** – दै. तरुण भारत, नागपूर १९–९–२०१०
**दै. लोकदूत, यवतमाळ २७–७–२०१०)**

# कला शाखा खुणावतेय

अभ्यासू आणि हुशार विद्यार्थ्यांनी विज्ञान शाखेकडे वळायचे, नसेलच जमत तर वाणिज्य शाखा घ्यायची आणि अगदीच 'ढ' असेल तर कला व समाजविज्ञान शाखेत प्रवेश घ्यायचा, असे म्हणण्याचे दिवस आता संपले आहेत. कला शाखेत जाऊन पुढे काय 'मास्तरकी' नाहीतर 'बाबूगिरी' करावी लागते, असा आरोप करणाऱ्या पिढीला आश्चर्याने तोंडात बोटे घालावी लागतील, इतक्या संधी या शाखेने आज उपलब्ध करून दिल्या आहेत.

आपला मुलगा डॉक्टर नाहीतर इंजिनियर व्हावा, असे पारंपरिक स्वप्न पाहणाऱ्या बहुतांश पालकांना निराश व्हावे लागते आणि नाइलाजाने का होईना; पण आपल्या पाल्याला कला व समाजविज्ञान शाखेत टाकावे लागते. ज्याला या शाखेचे महत्त्व कळले, तो जीवनात यशस्वी होतो आणि रडतराऊत 'एटीकेटी'च्या फेऱ्यातच 'पंचवार्षिक' योजनांची गणितं मांडत बसतात.

महानगरे वगळता महाराष्ट्रातील सुमारे ७० टक्के विद्यार्थी कला शाखा निवडतात. त्यात खूप पैसा नसलेले, डोनेशन देऊ न शकणारे, सामान्य घरातले पण केवळ पुस्तकी किडे नसलेले विद्यार्थी अधिक असतात. काही नोकरी-व्यवसाय करीत शिक्षण घेऊ इच्छिणारे असतात. काही मराठीच्या कवितांत, काही शूरांच्या इतिहासात तर काही भौगोलिक रचनांमध्य रमणारे, काही मानवी मनाचा वेध घेणारे तर काही समाजाचा अभ्यास करू पाहणारे असे वैविध्यसंपन्न विचारांचे विद्यार्थी या शाखेत 'इस्टमनकलर'प्रमाणे असतात. त्यांना न्यूटनच्या तीनही नियमांशी



काही देणंघेणं नसतं किंवा सल्फ्युरिक ॲसिडचे प्रयोग करण्याची गरज नसते. बेडकाचे किंवा गांडुळांचे डिसेक्शन करणे तर दूरच झूरळ आणि पाली पाहूनही दूर पळणारे हे विद्यार्थी कला शाखेत राहूनही यशाची शिखरे गाठतात, भल्याभल्यांची बोलती बंद करतात आणि सुखाचा संसारही करतात. मुलांवर संस्कारही उत्तम करू शकतात. जीवनाचे अर्थशास्त्र आणि समाजाचे मानसशास्त्र तर विज्ञान शाखेपेक्षा याच विद्यार्थ्यांकडून शिकावे!

खेड्यापाड्यातल्या मुलामुलींना विज्ञान, अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय शाखांचे शिक्षण मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. आपल्या मुली दूर शहरात पाठवायची तयारी पालकांची नसते. उच्चशिक्षणाची गंगा खेड्यात कधी पोचतच नाही. ती आपला मार्ग शहरांतूनच शोधते. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना जवळची वाटणारी ती एकच शाखा असते - कला शाखा.

कला शाखेतून पुढे शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी तर निर्माण होतातच पण आयएएस, आयपीएससारखे अधिकारीही जास्तीत जास्त याच शाखेमधून आलेले असतात. एमपीएससी, यूपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षा देणारे व उत्तीर्ण होणाऱ्यांप्रमाणेच कायदेपंडित, इतिहासकार, तत्त्ववेत्ते, मानसोपचारतज्ज्ञ, हवामानतज्ज्ञ, तहसिलदार, पोलीस, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, आमदार, खासदार आणि मंत्रालय, जिल्हा परिषद, नगरपालिकांमध्ये काम करणारे जास्तीत जास्त याच शाखेतून आलेले असतात.

कला शाखेतून उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी परकीय भाषेची निवड केली तर परदेशातल्या वकालती किंवा भाषांतरकार

# मातृभाषेतून उच्च शिक्षण

मूल जन्माला आले की ते रडते. त्या रडण्याला भाषा नसते. हळूहळू आजूबाजूच्या वातावरणाचा त्याच्यावर प्रभाव पडतो आणि त्याच्या सभोवताल बोलली जाणारी भाषा ते आत्मसात करते. यामध्ये सर्वाधिक प्रभाव त्याच्या मातृभाषेचा असतो आणि मातृभाषेतून सांगितलेली कुठलीही गोष्ट ते परिसरातल्या अन्य कुठल्याही भाषेपेक्षा अधिक गतीने आकलन करू शकते.

यशवंतराव चव्हाणांनी भाषेची त्रिसूत्री सांगतानाच मातृभाषेतून उच्च शिक्षणाची गरज मांडली होती. आजही आपण आपल्यावर दीडशे वर्ष राज्य केलेल्या इंग्रजांचीच भाषेतच उच्चशिक्षण घेतो आहोत. कला, वाणिज्य शाखेमधील काही विषय वगळले तर विज्ञान, अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय शाखांचे शिक्षण आजही मातृभाषेत उपलब्ध नाही.

या संदर्भात दक्षिणेकडील हिंदीविरोधी राज्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तामीळनाडूमध्ये आज अभियांत्रिकी शाखेचा अभ्यासक्रम तामीळ भाषेत सुरू झाला आहे आणि लवकरच 'एमबीबीएस'सारखा अभ्यासक्रमही मातृभाषेतून शिकवला जाण्याचे संकेत त्यांनी दिले आहे. तामीळ लोकांची हिंदी कच्ची असते; पण इंग्रजी फार चांगली. तरीदेखील त्यांनी मातृभाषेतून हे शिक्षण देण्याची योजना आखली. त्यांच्या भाषेत अभ्यासाची पुस्तके तयार केली; यामागे भाषाद्वेष असावा, अशी शंका बाळगण्याचे कारण नाही. मातृभाषेतून दिलेले शिक्षण आपल्या मेंदूप्रमाणेच हृदयालाही अधिक भिडते, हे अनेक भाषातज्ञ, मानसशास्त्रज्ञ आणि वैद्यकीय शास्त्रज्ञांनी मान्य केले आहे.



कम्युनिकेशनचा अभ्यास करून शासकीय कार्यालयांमध्ये किंवा अनेक स्वयंसेवी संस्थांमध्ये स्थान मिळवू शकतात.

वित्त आणि माणूस यांचा संबंध तुटणारा नाही. तेव्हा संख्याशास्त्राची जाण असणारे अर्थशास्त्राचे अभ्यासक सर्वच क्षेत्रात हवे असतात. अगदी मंत्रालयापासून इंडस्ट्रीपर्यंत आणि बँकांपासून तर मार्केटिंगपर्यंत असे कोणतेच क्षेत्र नाही की जिथे अर्थशास्त्राच्या अभ्यासकांची गरज नाही. शेअर मार्केटमध्ये तर अशा अभ्यासकांना फार मागणी असते.

लोककला, नाट्यशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना रंगभूमी, चित्रपट, विविध वाहिन्यांवर संधी असतेच, पण हीच संधी भाषा किंवा वाङ्मयाच्या विद्यार्थ्यांनाही उपलब्ध असते. शिक्षकी पेशाबरोबरच प्रकाशन व्यवसाय, संगणक व्यवसाय, वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरचित्रवाणी, दूरभाष कंपन्या यांमध्ये भाषेची उत्तम जाण असणाऱ्यांनाच संधी मिळते. शासकीय, निमशासकीय कार्यालये, विविध प्राधिकरणांमध्ये नोकरीकरिता किंवा विशेष करून स्वीय सहायकांच्या जागेवरील नियुक्तीसाठी भाषेवर प्रभुत्व आहे किंवा नाही, हे प्रथम तपासले जाते.

तहसिलदार, फौजदार किंवा जिल्हाधिकारी अशा पदांवरील अधिकाधिक विद्यार्थी हे कला शाखेचे असतात. कलेक्टर होण्यासाठी युपीएससीची परीक्षा द्यावी लागते. पूर्वपरीक्षा व मुख्य परीक्षेतही याच शाखेच्या विद्यार्थ्यांचा अधिक भरणा असतो. विज्ञान शाखेप्रमाणे ही शाखा खर्चिक नसल्याने सामान्य आर्थिक स्थितीतील विद्यार्थी या शाखेकडे सहज वळतात. अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय शिक्षणाकडे

वळणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे खर्चामुळे कंबरडे मोडते. यामुळे व प्रचंड ताण न झेपल्याने अनेक विद्यार्थी ते शिक्षण सोडून पुन्हा सामान्य अभ्यासक्रमाच्या शाखांकडे वळतात. कला शाखेच्या विद्यार्थ्यांना विज्ञान किंवा वाणिज्य शाखेप्रमाणे शिकवण्या लावण्याची गरज नसते. प्रात्यक्षिक आणि अन्य विशेष अभ्यास किंवा सर्वच वर्ग दिवसभर करण्याची गरज नसल्याने स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी त्यांना बराच वेळ उपलब्ध होतो. कला शाखेतील अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, भूगोल, मानसशास्त्र अशा विविध विषयांचा अभ्यास आयएएससह युपीएससी व एमपीएससीच्या अन्य स्पर्धा परीक्षांच्या अत्यंत उपयोगी ठरतो.

विज्ञान शाखेसाठी इंग्रजी माध्यम घ्यावे लागते. अनेक विद्यार्थ्यांना इंग्रजीचीच भीती वाटते. मोठमोठ्या पदांच्या स्पर्धा परीक्षा व मुलाखतीसुद्धा मराठी माध्यमातही देता येतात, त्यामुळे कला शाखेच्या विद्यार्थ्यांना हाही एक फायदा होतो. अन्य शाखांमध्ये विद्यार्थ्यांना जे छंद जोपासता येत नाहीत, ते कला शाखेत उपलब्ध वेळेमुळे जोपासता येतात. अवांतर वाचन करता येते. राष्ट्रीय सेवा योजनेत किंवा महाविद्यालयातील अन्य अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमांमध्ये सहभागी होऊन व्यक्तिमत्त्व विकास साधता येतो. तो पुढे विविध मुलाखतींमध्ये कामी पडतो.

एकंदरीत कला शाखेच्या विद्यार्थ्यांना उज्ज्वल भवितव्य आहे. रूक्ष जीवनात विरंगुळा निर्माण करणारे, भन्नाट कल्पनाशक्ती असणारे उजव्या मेंदूचे कला शाखेचे विद्यार्थी साहित्य, चित्रपट, संगीत, नृत्य, नाट्य अशा विविध कला क्षेत्रात आपला ठसा



उमटवू शकतात. दोन अधिक दोन बरोबर आयुष्यभर चारच सांगणाऱ्या, झाडावरचे सफरचंद कायम पृथ्वीकडेच झेपावणाऱ्या किंवा तीच ती रसायनांची सूत्रे सांगून चौकटीतले आयुष्य कुरवाळणाऱ्या अभ्यासक्रमांपेक्षा आकाशाला गवसणी घालण्याची भव्यदिव्य स्वप्ने बघत वास्तव जीवनाला बदलण्याची सतत भाषा बोलणाऱ्या या कला शाखेच्या अठरापगडांच्या उद्याच्या रंगीबेरंगी पगड्या खुणावत आहेत. संधी आहेत, हुडकून काढा. 'कॅच द ट्रेन, डोन्ट मिस इट' एवढंच सांगणं.

**(लेखन – जुलै २०१०, सुधारणा जून २०१९**

**पूर्वप्रसिद्धी** – दै. तरुण भारत, नागपूर १९–९–२०१०

**दै. लोकदूत, यवतमाळ २७–७–२०१०**

**सुधारित** – दै. तरुण भारत, नागपूर ३–७–२०१९)

गोड बासुंदीसोबतच मिरची भजे, मसाले भात, ताक, लोणचं, पापड अशा अनेक पदार्थांचा आस्वाद चाखताना जी लज्जत जिभेवर रेंगाळते, तशीच अनेक आवडीच्या विषयांची चव चाखण्याची ऐच्छिक संधी विद्यार्थ्यांना मिळू शकेल. तेव्हा या नव्या बदलाला पालकांसह प्राध्यापक आणि शिक्षणसंस्थांनी सामोरे जाऊन आणखी दर्जेदार विद्यार्थी किंबहुना भारताचे गुणसंपन्न नागरिक घडविण्याच्या कामी हातभार लावण्याची गरज आहे.

ꕥꕥꕥ

**(लेखन – जुलै २०१०**

**पूर्वप्रसिद्धी** – दै. सकाळ, यवतमाळ **२७–६–२०१०)**



वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी या दोन्ही शाखा महत्त्वाच्याच. हे शिक्षण घेतलेले विद्यार्थी अत्यंत महत्त्वाच्या भूमिका बजावत असतात. त्यांनी घेतलेले शिक्षण हे त्यांना परिपूर्ण अवगत झालेले असावे. त्यांच्या मेंदूप्रमाणेच ते थेट त्यांच्या अंतःकरणातही पक्के व्हायला हवे. त्यांच्या हातून चुका होता कामा नये. परकीय इंग्रजीतून अशा ज्ञानाला ग्रहण करण्यास आणि आकलनास जितके कठीण जाईल, त्यापेक्षा कितीतरी पटीने मातृभाषेतून ग्रहण केल्यास ते सोपे जाईल. मातृभाषेतून शिकलेले डॉक्टर, इंजिनिअर परदेशात टिकतील का? परराज्यात टिकतील का? बाहेरून आलेल्या कंपन्यांमध्ये काम करू शकतील का? वैद्यकीय क्षेत्रातले नवनवीन ज्ञान मिळवू शकतील का? या सर्वांचे उत्तर 'होय' असेच आहे. चिनी, जपानी, फ्रेंच, जर्मन डॉक्टर, इंजिनिअर कोणत्या भाषेत शिक्षण घेतात? त्यांच्या मातृभाषेतूनच ना? जगात कुठेही गेले तरी त्यांच्याच भाषेत बोलतात ना? आणि जगावर सर्वच क्षेत्रात आज जपानी आणि चिनींचे वर्चस्व आहे. युरोपातही इंग्रजी जितकी चांगली बोलली जात नाही, तितकी आपले विद्यार्थी सर्वत्र बोलतात. जगभरात इंग्रजी बोलणाऱ्यांची नव्हे तर प्रत्येक क्षेत्रात दर्जेदार तज्ज्ञांची कमतरता आहे. तेव्हा कामचलावू इंग्रजी येत असली की ज्या वातावरणात आपली मुले जातील तिथली भाषा सहज ग्रहण आणि आकलन करून त्यांचा वापर करू शकतील. मात्र त्यांना मिळणारे ज्ञान मातृभाषेतून दिले तर ते त्यांच्या क्षेत्रात निश्चितच 'मास्टर' ठरतील.

ꕥꕥꕥ

**(लेखन – जूलै २०१२**

**पूर्वप्रसिद्धी** – दै. **लोकदूत, यवतमाळ १५–७–२०१२)**

# आंतरविद्याशाखा व विषय निवडीचे स्वातंत्र्य

डॉक्टरसाहेबांनी शस्त्रक्रिया यशस्वी केली; परंतु त्यांनी बिलाबाबत रुग्णाच्या नातेवाइकांशी केलेल्या असभ्य व्यवहारामुळे 'तुम्हाला समाजाचे मानसशास्त्र समजत नाही' असे त्यांच्या सहकारी डॉक्टर मित्रांनी सुनावले, तेव्हा त्यांनाही सामाजिक मानसशास्त्राचे अध्ययन करणे किती आवश्यक आहे, हे पटले. आज केवळ एका विषयात 'स्पेशलायझेशन' करून जीवनात यशस्वी होता येत नाही. एका विषयाबरोबरच अनेक विषयांचा किमान स्पर्श असणे गरजेचे झाले आहे. नुसते इंजिनिअरिंग केले; पण एमबीए नाही म्हणून नामवंत कंपन्या गुणसंपन्न उमेदवारांना नाकारतात. विज्ञानाचा प्राध्यापक झाला; पण विद्यार्थ्यांच्या सामाजिक समस्यांचे ज्ञान नाही, शास्त्रज्ञ झाला; पण बायकोचे मानसशास्त्र आणि कुटुंबाचे अर्थशास्त्र समजले नाही म्हणून जीवनात अपयशी ठरलेल्यांची संख्या अधिक आहे. अशा पार्श्वभूमीवर केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री कपिल सिब्बल यांच्या आंतरविद्याशाखा व विषय निवडीचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना देण्याच्या योजनेमुळे एक क्रांतिकारी पाऊल शिक्षणक्षेत्रात पडते आहे.

कला शाखेच्या विद्यार्थ्याला आवडीचा विज्ञान किंवा वाणिज्य शाखेतील एखादा विषय किंवा वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या हळव्या मनाच्या विद्यार्थिनीला सुंदर कविता आळवण्यासाठी मराठीसारखा विषय अशा भन्नाट वाटणाऱ्या कल्पनेला प्रत्यक्षात येण्यासाठी फार



दिवस वाट पाहावी लागणार नाही. वर्ग ११ वी पासून पदवीस्तरापर्यंत विविध ज्ञानशाखा लवकरच सर्वांसाठी खुल्या होतील.

जगात अनेक देशांमध्ये असे अभ्यासक्रम निवडता येतात. सीबीएसई आणि आयसीएसईच्या कनिष्ठ महाविद्यालयीन अभ्यासक्रमात अशी सुविधा आहे. १९९० मध्ये पुणे विद्यापीठाने असा प्रयोग केला होता. अमरावती विद्यापीठानेही केंद्राकडून भविष्यात येणाऱ्या यासंदर्भातील आदेशाची अंमलबजावणी करण्याचा सकारात्मक दृष्टिकोनातून अभ्यास सुरू केला आहे.

मात्र यामध्ये काही अडचणी उद्‌भवू शकतात. आंतरराष्ट्रीय मान्यता असलेले क्रेडीट रेटींग सिस्टिम काही विद्यापीठांमध्ये आहे. विविध विद्यापीठांमध्ये एकाच विषयाचा अभ्यासक्रम, गुणदान पद्धती निरनिराळी आहे. पण हा अभ्यासक्रम, गुणदानपद्धत देशभर समान होणार असल्याचे संकेत यूजीसीने दिले आहेत. चौकटीत जगण्याची सवय झालेल्या पालकांना, प्राध्यापकांना, शिक्षण संस्थांना हा नवा ट्रेंड कठीण वाटेल. वेळापत्रक मोजक्या वेळेत बसणार नाही. एकाच महाविद्यालयात अनेक विषय एकाच वेळी चालवता येणार नाहीत. कदाचित आंतर विद्याशाखेचा निवडलेला विषय 'सेल्फ मोड' मध्ये विद्यार्थ्यांना शिकावा लागेल.

असे असले तरी विद्यार्थ्यांना मात्र ही एक वेगळ्या अनुभवाची व आनंदाची पर्वणी ठरेल. नकोसा किंवा कठीण वाटणारा पेपर बाजूला ठेवून मनाच्या कुठल्याशा कोपऱ्यात घर करून बसलेला एखादा आवडीचा वेगळाच विषय निवडता येईल. समस्या असतील तरच उपाय शोधता येतील. सुग्रास भोजनात

काही आर्थिक लाभाच्या योजना आखल्या नाहीत तर त्यातून बाहेर पडणारी तरुण पिढी शैक्षणिक, सामाजिक आणि मानसिकदृष्ट्या कुठल्या दर्जाची राहील, याचा विचार होणे मात्र नितांत आवश्यक आहे.

**(लेखन – जुलै २०१०**
**पूर्वप्रसिद्धी – दै. सकाळ, यवतमाळ, ११–८–२०१०**
**दै. लोकदूत, यवतमाळ ८–७–२०१२)**



# विनाअनुदानित शिक्षण संस्थांच्या समस्या

शासनाने भुलाबाईच्या सणात वाटल्या जाणाऱ्या खिरापतीप्रमाणे शाळा-महाविद्यालयांची खैरात करण्याची परंपरा सुरूच ठेवली आहे. त्यात पूर्वीपेक्षा वेळोवेळी बदल करीत 'अनुदानित' त्यानंतर 'विनाअनुदानित' आणि आज 'कायम विनाअनुदानित' संस्थांना परवानगी देण्याचे कार्य अबाधित ठेवले आहे. कुणालाही नाराज करायचे नाही, कार्यकर्त्यांना आणि खरेदीदारांना शाळा-महाविद्यालये वाटायची. पुढे ती आदिवासी, नक्षलवादी किंवा विशेष मागास क्षेत्रातील म्हणून सिद्ध करायची आणि 'कायम विनाअनुदानित'मधून 'कायम' शब्द वगळायचा, पुढे एकदम १०० टक्के किंवा २५, ५०, ७५ टक्क्यांचे सूत्र वापरून जवळच्यांना शासकीय अनुदान द्यायचे आणि दूरच्यांना 'कायम विनाअनुदान' तत्त्वावर ठेवायचे, हे राजकारण नित्यनेमाने सुरू असते.

अशा या परिस्थितीत विनाअनुदान तत्त्वावर चालणाऱ्या शिक्षण संस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. महाराष्ट्रातल्या ३ हजार ६०० विनाअनुदानित शाळांच्या बाबतीत विचार केला तर गणवेश, पाठ्यपुस्तके, मध्यान्ह आहार या सर्व हक्काच्या बाबींचा लाभ विद्यार्थ्यांना मिळत नाहीत. शिक्षकांना, कर्मचाऱ्यांना वेतन मिळत नाही. अशा शिक्षकांची व कर्मचाऱ्यांची संख्या सत्तर हजाराच्या जवळपास तर विद्यार्थ्यांची संख्या लाखोंच्या घरात

आहे.

काही शाळांमध्ये काही तुकड्या अनुदानित असतात, तर विद्यार्थीसंख्या वाढल्याने नव्याने सुरू केलेल्या काही तुकड्या कायम विनाअनुदानित. अशा ठिकाणी अनुदानित तुकडीच्या विद्यार्थ्यांना गणवेश, पुस्तके, आहार मिळतो, मात्र त्यांच्याच बाजूच्या विनाअनुदानित तुकडीतील विद्यार्थी या लाभापासून वंचित राहतात. हा भेदभाव नव्हे काय? एक तर विनाअनुदानित वाढीव तुकड्यांना मान्यता देऊ नये, दिल्या तर त्यांच्यात भेदभाव वाढेल, असे निर्णय घेऊ नये. पण असे घडत नाही. अल्पसंख्यक विभागाच्या वतीने सध्या देशभर अल्पसंख्यकांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्तीसह गणवेशासारख्या अनेक योजना आखण्यात आल्या आहेत; पण प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नाही.

महाविद्यालयीन शिक्षणातही अशाच समस्या आहेत. वैद्यकीय, अभियांत्रिकी अशा निवडक शाखा सोडल्या तर अन्य पारंपरिक कला, वाणिज्य, विज्ञान शाखा असणाऱ्या विनाअनुदानित महाविद्यालयांची समस्याही बिकट आहे. केवळ शिष्यवृत्तीच्या भरवशावर ही महाविद्यालये सुरू आहेत. पात्र प्राध्यापक अल्प वेतनात काम करण्यास येत नाहीत. कर्मचाऱ्यांना पुरेसे वेतन नाही. विद्यार्थ्यांना सोयीसुविधा मिळत नाहीत. संस्थेच्या इमारती नाहीत. नियमित प्राचार्य नाहीत. अशा अवस्थेतले विनाअनुदानित संस्थांमधील शिक्षण हे कुठल्या दर्जाचे राहील? या सर्वात दुःखदायक म्हणजे कायम विनाअनुदानित महाविद्यालयांतील किंवा तुकडीतील



गरीब विद्यार्थ्यांना ईबीसी सवलत नाकारली जाते. अनेक ठिकाणी अनुदानित अभ्यासक्रम किंवा शिक्षणसुविधा नाहीत, हा या देशातील गरिबांचा दोष आहे का? जीओआयसारख्या (भारत सरकार) शिष्यवृत्ती जर बहुतेक सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांना सहज दिल्या जात असतील तर उच्चवर्णीय किंवा अन्य सवलतीत बसू न शकणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना केवळ ते कायम विनाअनुदानित तुकडीत आहेत, म्हणून ईबीसी सवलत नाकारणारे शासन माणसामाणसातील जातिभेदाच्या भिंती आणखी मजबूत करीत आहे, असेच म्हणावे लागेल.

महाराष्ट्रात खाजगी शिक्षण संस्थांचे प्रमाण अन्य राज्यांच्या तुलनेने फार जास्त आहे. गुजरात, कर्नाटक अशी काही राज्ये सोडल्यास अनेक राज्यांमध्ये बहुतेक शाळा-महाविद्यालये शासकीय आहेत. शासकीय शिक्षण संस्थांकडे आणि खाजगी शिक्षण संस्थांकडे पाहण्याचा शासकीय दृष्टिकोन वेगवेगळा असतो. महाराष्ट्रातील अनुदानित शाळा-महाविद्यालयांचे वेतनेतर अनुदान बंद झाल्याला आज एक दशक पूर्ण होत आहे. अनुदानित संस्थांमध्येही आर्थिक समस्या आहेत; पण किमान वेतन अनुदान येत असल्याने शिक्षक व कर्मचारी उपाशी नाहीत. यूजीसीकडून मिळणाऱ्या अनुदानामुळे तितकी गंभीर समस्या नाही. त्यात इमारतीसह काही नवनवीन प्रकल्प राबवता येतात; पण विनाअनुदान तत्त्वावरच्या असूनही प्रामाणिकपणे ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या शिक्षणसंस्थांच्या समस्यांचे वेळीच निराकरण केले गेले नाही, विद्यार्थ्यांसह या संस्थांकरिता

वाद्यांचा आवाज हा फार मोठा नसायचा.

कालांतराने बँड आले. त्यात पाश्चिमात्त्यांकडून आलेली काही वाद्ये समाविष्ट झाली. इलेक्ट्रॉनिक हार्मोनियम सह बॅटरीवर किंवा विजेवर चालणारी वाद्ये आणि मोठा आवाज देणाऱ्या भोंग्यांचा समावेश झाला. हा आवाज पारंपरिक वाद्यांपेक्षा खूपच मोठा होता. विवाह, मिरवणुका यांमध्ये अशा बँडचा वापर वाढला. त्याच्या तालावर नृत्य करणाऱ्यांची संख्याही वाढली.

आज बँड वाजवणाऱ्यांच्या पोटावर पाय देत त्यांची जागा जागा डीजेने घेतली आहे. सीडी गेल्या. डीव्हीडी आल्या. असंख्य गाणी त्यात कोंबलेली. काही मूळ, काही रिमिक्स. गोल भोंगे गेले, भव्य आकाराचे स्पीकर्स आले. त्यातून येणारा भला मोठा आवाज. सर्व धर्मीयांच्या कुठल्याही कार्यक्रमात, मिरवणुकीत डीजे दिसू लागले. हळद, लग्न, मौंज, वाढदिवसांसारख्या खाजगी कार्यक्रमांमध्येही डीजेने आपले स्थान निश्चित केले. पूर्वी हत्तीवर बसून राजे महाराजे यायचे, त्याप्रमाणे निवडून आलेले उमेदवार खुल्या मोटारींवर उभे राहून मिरवणूक काढू लागले. पूर्वी राजा आल्याची खबर देणाऱ्या वाजंत्र्यांऐवजी पुढारी किंवा नवरदेव आल्याची खबर देण्यासाठी आता कर्णकर्कश डीजे अवतरले. त्यावर थिरकणारे धुंद कार्यकर्ते किंवा वऱ्हाडी डीजे नसेल तर उपस्थितही राहत नाही, हा अनुभव पुढाऱ्यांना आणि वधुवरपित्यांना असल्याने त्यांनी ह्या नव्या बदलाचे स्वागत केले. समाधानाची एकच बाब की सर्वोच्च न्यायालयाने रात्री दहापर्यंतच अशा कर्णकर्कशतेला परवानगी दिली आहे. पण न्यायालयाचा आदेश न मानणाऱ्यांना गंभीर शिक्षा होत नसल्याने हा आदेश कुणीही



# एक शिक्षकी शाळा

एक शिक्षकी शाळांची समस्या किती गंभीर आहे, याची जाण शासनाला खरोखरच नाही काय, हा प्रश्न ग्रामीण भागातील छोट्या गावांमधील पालकांना सतत पडत असतो. आज शहरी शिक्षण आणि ग्रामीण शिक्षण यांतील दरी कमी होण्याऐवजी वाढतच आहे. शहरात आलेल्या श्रीमंतांसाठी असणाऱ्या सीबीएसई, आयसीएसई शाळांची शासनमान्य लाट आणि दुसरीकडे जनसामान्यांच्या पाल्यांसाठी असलेल्या ग्रामीण भागातील शाळांमधील सोयीसुविधांची तुलना करणेच शक्य नाही. त्यात भरीस भर की काय एक शिक्षकी शाळांच्या प्रयोगाने शिक्षणाची गंगा खेड्यापाड्यात पोचली तरी शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी त्यातून काय मिळवले असा प्रश्न करण्यापेक्षा काय गमावले, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

महाराष्ट्रात आज चार हजारावर एक शिक्षकी शाळा आहेत. त्यापैकी औरंगाबाद-जालना भागात सर्वाधिक तर मुंबई, अकोला आणि भंडाऱ्यात एकही एक शिक्षकी शाळा नाही. लातूर-उस्मानाबादेतील शाळांची संख्या पंचवीसाच्या आत असून सोलापूर विभागाने प्रयत्नपूर्वक गेल्या दोन वर्षांत आपल्या विभागातील ४०० एकशिक्षकी शाळांची संख्या घटवून एक वर आणली आहे. यवतमाळमध्ये आजही १०४ एक शिक्षकी शाळा आहेत. या सर्व शाळांमधून एकच शिक्षक खिचडी, पुस्तके, गणवेश, वर्गखोलीचे बांधकाम आणि शिक्षण विभागाने नेमून दिलेल्या कामांसोबतच

ज्ञानदानाचे कार्य कसे करीत असेल, याची कल्पना सामान्यांनाही करता येऊ शकेल.

लोकशाही आघाडीचे सरकार असताना इ.स. २००० मध्ये प्रत्येक वर्गासाठी एक शिक्षक उपलब्ध करून दिल्या जाईल, असे आश्वासन दिले होते. मात्र आज प्रत्येक वर्ग तर सोडाच पण एक शिक्षकी शाळांना द्विशिक्षकी करण्याची योजनाही नसल्याचे शिक्षणमंत्र्यांनी जाहीर केले. डीएड होऊन आणि सीईटी उत्तीर्ण करून पात्र उमेदवार 'शिक्षण सेवक' होण्याची स्वप्ने बघत हजारोंच्या संख्येने उपलब्ध आहेत, मात्र मोजक्या जागांवर भरती करून इतर पात्र उमेदवारांना परतीची वाट दाखवणारे शासन खेड्यापाड्यातल्या प्राथमिक शिक्षणाप्रती किती उदासीन आहे, हे यावरून लक्षात येईल. एकीकडे सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचे केंद्र शासनाचे धोरण, एकही विद्यार्थी शालाबाह्य राहता कामा नये, असा आदेश आणि दुसरीकडे एकशिक्षकी शाळांमध्ये दुसरा शिक्षक नेमण्याचीही तयारी नाही, अशा अवस्थेत आहे तो शिक्षकही राब राब राबून शेवटी आजारी पडेल, नाहीतर शिक्षकाशिवायच मुलांना शिक्षण घेण्याच्या नवीन प्रथेचा उदय होईल. तशाही आठवीपर्यंत परीक्षा रद्द झाल्याच आहेत. मात्र 'शायनिंग इंडिया'तल्या ग्रामीण भागातील विद्यार्थी अशा परिस्थितीत खरंच चमकतील का, याचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल.

**(लेखन – जुलै २०१०**
**पूर्वप्रसिद्धी – दै. सकाळ, नागपूर, दि. ४–८–२०१०)**



# वाजंत्री, बँड आणि डीजे

या वर्षीच्या शाळांचा पहिला दिवस. शिक्षणाच्या नावावर चाललेल्या शासकीय आणि राज्यकर्त्यांच्या धुडगुसामुळे भेदरलेल्या शिक्षकांची अधिकाधिक विद्यार्थ्यांना शाळेत आणण्याची केविलवाणी धडपड सुरू होती. विदर्भाच्या ग्रामीण भागातील अनेक शाळांमध्ये गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले जात होते. काही ठिकाणी प्रभातफेरी काढून विद्यार्थी आणि पालकांना शिक्षणाप्रती आकृष्ट केले गेले. देसाईगंज तालुक्यातील मोहटोला किन्हाळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने बँड लावून प्रभातफेरी काढली गेली. पण त्याच वेळी एक दुर्दैवी घटना घडली. गावातल्या नामदेव राईसमिलमधून धान पिसाई करून नेत असलेल्या एका बैलबंडीचे बैल बँडच्या आवाजाने उधळले आणि आपल्या आजोबांसोबत ही प्रभात फेरी पाहणाऱ्या पाच वर्षांच्या पूनम धर्माजी वाघधरे या चिमुरडीच्या मानेवरून बंडीचे चाक गेल्याने तिला जीव गमवावा लागला. या प्रभातफेरीत सरपंच, उपसरपंच, ग्रामशिक्षण समितीचे पदाधिकारी होते; पण सर्वच हतबल. कोणी काहीच करू शकले नाही. या सर्व प्रकाराचे दोषारोपण कोणावर करणार?

पूर्वी गावागावात वाजंत्री असायची. बाजाची पेटी, तबला, ढोलकी, पिपाणी अशा काही पारंपरिक वाद्यांसह ही मंडळी गावातील विवाहप्रसंगांसह विविध कार्यक्रमांमध्ये मनोरंजन, परंपरा किंवा दवंडी देण्याच्या उद्देशाने आपली हजेरी लावत. अलुतेदार-बलुतेदार पद्धतीमुळे त्यांचे ते कर्तव्य असे. त्यांच्या

करणारे अधिकारी आणि कर्मचारी, समाजसेवेचे मुखवटे घातलेल्या संघटना आणि खुद्द न्यायालयात काम करणारे सन्माननीयही आले. या बोर्डाच्या अभ्यासक्रमांना, शिक्षणसंस्थांना अनुदान नाही. भरपूर पैसा उकळून दिवसातले सहा-सात तास शाळेत राबवून उर्वरित वेळात ट्युशन क्लासेसमध्ये टाकायला लावून पुस्तकी किडे बनविणारे हे अभ्यासक्रम. पैकीच्या पैकी गुणदान करण्याची त्यांची पद्धत. एवढा अभ्यास केल्यावर व गुणदानाची पद्धत बदलल्यावर आमच्या खेड्यातला गंगारामही ९०—९५ टक्के गुण मिळवेल.

एसएससी बोर्डाचा अभ्यासक्रम कोण निवडतात? चांद्यापासून बांद्यापर्यंतचे सामान्य नागरिकांचे पाल्य. ज्यांच्याकडे खूप पैसा नाही, लग्गे नाहीत, शेतात किंवा कुठेतरी ते कष्ट करतात आणि आपल्या मुलांनाही काम करून शिकण्याची सवय लावतात. फी भरायला पैसे नाहीत. अनुदानावरच्या साध्या मराठी शाळांमध्ये मुलांना टाकतात. पण म्हणून ते कमी दर्जाचे ठरत नाहीत. एसी मोटारीतून पिझ्झा खात फिरणाऱ्या श्रीमंतांच्या या पाल्यांना खरा हिंदुस्थान कधीच कळणार नाही; पण आमचे गावाकडचे सोम्या-गोम्या जीवनानुभवात निश्चितच वरचढ ठरतील. अशा या सामान्य मराठी जनतेकरिता असलेल्या ह्या एसएससीचे बोर्डाविषयी राज्यकर्त्यांना कळवळा तरी का राहील? विनाअनुदानित इंग्रजी शाळांना धंदा करण्यासाठी मान्यता द्यायच्या आणि राज्य शासनाचा अभ्यासक्रम राबवणाऱ्या, संस्कृतीची जपणूक करणाऱ्या पण पैसा कमावून न देणाऱ्या शाळांची संख्या कमी करायची हा नियोजित घाट हाणून पाडण्याकरिता या राज्यात आज कोणीही शिल्लक नाही.



गंभीरतेने घेताना दिसत नाही.

या सर्व प्रकाराने आज माणसाच्या शरीरावर किती घातक परिणाम होत आहेत, हे बोलायला दोन-चार सामाजिक संघटनांशिवाय कोणीही तयार नाही. ८० डेसिबल्सच्या वरचा आवाज आपल्या कानांनाच घातक ठरतो, असे नसून आपल्या हृदयासह मेंदूवरही त्याचे दुष्परिणाम होतात. अतिशय मोठ्या आवाजाने अनियंत्रित रक्तदाब, डोकेदुखी, छाती धडधडणे किंवा छातीत दुखणे यांसह माणूस ठार बहिराही होऊ शकतो.

समधुर आवाजातील वाजंत्री आज लुप्त झाली आहेत. बँड कालबाह्य होत आहेत. परिवर्तनाच्या नियमाला अनुसरून डीजे आले; पण सोबत असंख्य व्याधी घेऊन. नृत्य करावे, सुमधुर संगीत ऐकावे. त्याही कलाच आहेत. पण आज त्याचे जे स्वरूप झाले आहे, त्याचा परिपूर्ण विचार करण्याची आवश्यकता आहे. हजारो वॅटच्या डीजेच्या अनियंत्रित वापरामुळे तुम्हाला व्याधी तर जडतीलच पण तुमच्या आजूबाजूने जाणाऱ्यांना, शेजाऱ्यांनाही त्या आपल्या बाहुपाशात घेतील, याची जाण ठेवावी. आजचे डीजेचे वाढते फॅड बघितले तर उद्या हेच डीजे अंत्ययात्रेतसुद्धा अवतरतील आणि तिथेही धुंद होऊन नवीन पिढी नृत्याचे आविष्कार सादर करतील, अशी भीती व्यक्त करायला हरकत नसावी.

**(लेखन — जुलै २०१०**
**पूर्वप्रसिद्धी — दै. लोकदूत, यवतमाळ, जुलै २०१२)**

# विद्यार्थी पास, शासन नापास, तरी पालकांना आस

अभूतपूर्व अशा निकालाने एसएससी बोर्डाचे १६ लाख विद्यार्थी दहावीत पास झाले; पण सलग तिसऱ्या वर्षी राज्य शासन ११ वी प्रवेशाबाबत न्यायालयीन लढाईमध्ये नापास झाले. तरीदेखील 'मेरे मुर्गीकी एकही टांग' म्हणणाऱ्या शासनकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात जाण्याचे जाहीर केल्याने 'बेस्ट ऑफ फाइव्ह'सह उत्तम गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक आजही ११ वी प्रवेशाबाबत आस ठेवून आहेत.

वर्षानुवर्षे त्याच कार्यालयात काम करणारे बोर्ड आणि मंत्रालयातील अधिकारी तसेच बाबूगिरी करणाऱ्या सल्लागारांनी शिक्षणमंत्र्यांसह राज्यकर्त्यांना असे अफलातून सल्ले देणे सुरू केले की गेले तीनही वर्ष शासनाला 'ठेच बसूनही शाहणे' होता आले नाही. पहिल्या वर्षी अत्यंत कठीण अशी गणितं मांडून पर्सेंटाईल सूत्र आणले गेले. या सूत्राचा नीट अभ्यास मंत्र्यांना तर सोडाच पण अनेक शिक्षणतज्ज्ञांनाही करता आला नाही. गेल्या वर्षी **९०:१०** कोट्याचा पर्याय दिला गेला. इंजिनिअरिंग, डी.एड. अशा अभ्यासक्रमांत स्थानिक विद्यापीठनिहाय हा कोटा ७०:३० असतो. पुणे विद्यापीठात जवळपास **९३** टक्क्यांपर्यंत स्थानिकांना प्राधान्य देता येते तर सीबीएसई तर्फे घेतल्या जाणाऱ्या एआयईईई मध्ये राज्यातील विद्यार्थ्यांना **१५** टक्के कोटा दिला जातो. म्हणजे विद्यार्थी आणि विभाग यावरील कोटापद्धत चुकीची नसली तरी शासनाला **९०:१०** हे सूत्र न्यायालयात पटवून देता आले नाही



आणि शासन तेव्हाही तोंडघशी पडले.

या वर्षी फेब्रुवारीमध्ये 'बेस्ट फाईव्ह'चा शासननिर्णय काढला गेला. अंमलबजावणीसाठी मात्र ६ जून पर्यंत वाट बघावी लागली. पालकांसह विद्यार्थ्यांनीही त्याच सूत्राला पुढे ठेवून अभ्यास केला आणि पाच विषयात उत्तमोत्तम गुण मिळवले आणि तशा गुणपत्रिका प्राप्तही केल्या. राज्यातील एसएससीच्या विद्यार्थ्यांना चांगल्या महाविद्यालयांमध्ये ११ वी प्रवेशासाठी उत्तम संधी होती; परंतु याही वर्षी 'आयसीएसई'सारख्या केंद्रीय मंडळाने राज्यशासनाच्या निर्णयाला न्यायालयात आव्हान दिले. बोर्डांमध्ये भेदभाव करणाऱ्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांमध्ये असमानता वाढीस लागेल, निर्णय घ्यायचे तर वर्षाच्या सुरुवातीला घ्यावेत असे फटकारत न्यायालयाने राज्यशासनाला चपराक दिली. नेहमीप्रमाणे कमी अभ्यास केल्यामुळे राज्याचे विधितज्ज्ञ आणि खुद्द शिक्षण मंत्रीही समाधानकारक स्पष्टीकरण देऊ न शकल्याने न्यायालयीन लढाईत नापास झाले.

**२००७–०८** मधील पर्सेंटाईल सूत्र, **२००८–०९** मधील कोटा सूत्र आणि **२००९–१०** मधील 'बेस्ट फाईव्ह' सूत्र या तीन वर्षांत राबवले गेले. श्री. वसंत पुरके, श्री. राधाकृष्ण विखे पाटील आणि बाळासाहेब थोरात हे तीन अभ्यासू मंत्री या विभागाने दिले तरीही राज्य शासनाच्या 'एसएससी' विरोधात दिल्लीकडची 'सीबीएसई', 'आयसीएसई' ही मंडळे न्यायालयात जिंकतात, त्यामागे आणखीही एक कारण आहे. मुळात बदली होणाऱ्या केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी निर्माण झालेला हा केंद्रीय अभ्यासक्रम आज कोणाची मुले घेतात? अर्थातच उच्च मध्यमवर्गीयांची. त्यात मंत्री, आमदार, मंत्रालयात, बोर्डात काम

# राजकारण्यांच्या शिक्षणसंस्था : एक प्रश्नचिन्ह

स्वातंत्र्यलढ्यात सर्वस्व पणाला लावणाऱ्या लो. टिळक, आगरकर, सावरकर, म. गांधी, नेहरू या थोर नेत्यांच्या किती शिक्षण संस्था होत्या? स्वातंत्र्यानंतरही प्रारंभीच्या राज्यकर्त्यांची किती शाळा-महाविद्यालये होती? कितीजणांना स्वतःला 'शिक्षणसम्राट' म्हणून मान्यता मिळविण्याचा मोह होता? या प्रश्नाचे उत्तर बहुधा शून्यच येईल. पण आज पावसाळ्यात उगवणाऱ्या कुत्र्यांच्या छत्र्यांप्रमाणे राजकारण्यांच्या शिक्षण संस्था आणि शाळा-महाविद्यालयांची पैदास बघितली तर देशावर प्रेम करणारे कुठलेही संवेदनशील मन विषण्ण झाल्याशिवाय राहणार नाही.

पूर्वी शाळा-महाविद्यालये मोजकी होती. शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना दूर दूर जावे लागे. शिक्षणसाठी विद्यार्थी जसे कष्ट उपसत, तसेच शिक्षकही हाडाचे असत. विद्यार्थ्यांना दैवत मानून अत्यल्प मानधनातही ज्ञानदानाशिवाय दुसरे ध्येय ते ठेवत नसत. आयुष्यात पुढे विद्यार्थी अशा आदर्श शिक्षकांना विसरत नसत. शिष्यवृत्तीसारखे प्रकार नसल्याने इकडून तिकडून पैसा आणून शिक्षण घेतले जाई. आपल्या पालकांनी घेतलेल्या कर्जाची आणि कष्टांची जाणीव ठेवून विद्यार्थीही खूप अभ्यास करीत. त्यातून गुणसंपन्न विद्यार्थी घडत.

आज राज्यकर्त्यांनी शिक्षण क्षेत्रात धुडगूस घातल्याने शिक्षणाचा दर्जाच ढासळला आहे. त्यांच्यासाठी शिक्षण हा धंदा



या सर्व 'नौटंकी'मध्ये भरडला जातो तो ग्रामीण भागातला विद्यार्थी. पुण्यामुंबईसारख्या मोठ्या शहरांत प्रवेशाची समस्या आहे. तिथे केंद्रीय बोर्डांचे विद्यार्थी अधिक आहेत. बाकी महाराष्ट्राचे काय? पण या सर्व बाबींचा अभ्यास न करता १६ हजार विद्यार्थ्यांसाठी १६ लाख विद्यार्थ्यांना उंच उडवून हवेतच जुलैपर्यंत लटकवून ठेवलेल्या नाकर्त्या राज्य शासनाने आज सर्वोच्च न्यायालयात जाण्याचे ठरवले आहे. कदाचित कमी अभ्यासामुळे आणि या बाबतीत जिव्हाळा नसल्याने तिथेही ते नापास होतील; पण पालकांना आस आहे. कदाचित आपल्या भूमीपुत्रांची समस्या, जनसामान्यांच्या पाल्यांची कळकळ, दुःख दिल्ली दरबारी पोचेल आणि आज जरी नाही, तरी उद्या काहीतरी चांगला निर्णय मराठी मुलांसाठी येईल, अशी आशा सोडता कामा नये. लढाई चालूच ठेवावी लागेल.

या प्रकरणी वर्षाच्या सुरुवातीलाच काही उपाय बोर्डाने आणि शासनाने करावेत. संपूर्ण देशात एकसारखा अभ्यासक्रम राबवल्या जाण्याच्या दृष्टीने आपली ताकद लावावी किंवा आजच्या घडीला केंद्रीय बोर्डाप्रमाणे आपल्या अभ्यासक्रमाची आखणी आणि गुणदानपद्धतीचा अवलंब करावा. योगाभ्यास, क्रीडासारख्या विषयांत पैकीच्या पैकी गुण देणाऱ्या केंद्रीय बोर्डांप्रमाणे आपले विषय आणि गुणदान कठीण नाही. एकदा पाऊलवाट आखली की पुढे प्रशस्त मार्ग तयार होईल.

**(लेखन – जून २०१०**

**पूर्वप्रसिद्धी – दै. सकाळ, यवतमाळ, दि. २७–६–२०१०)**

# विद्यार्थी मिळेल का हो बाजारी?

दहावीच्या अभूतपूर्व निकालामुळे आणि 'बेस्ट ऑफ फाईव्ह'सह 'एटीकेटी'च्या निर्णयामुळे पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असले तरीदेखील **३८** नवीन कनिष्ठ महाविद्यालयांच्या मान्यतेमुळे पुन्हा शिक्षकांना 'विद्यार्थी मिळेल का हो बाजारी?' म्हणत भटकंती करावी लागणार आहे.

या वर्षी यवतमाळ जिल्ह्यातील **३०** हजार ६३८ विद्यार्थी दहावीत उत्तीर्ण झाले. जिल्ह्याची प्रवेश क्षमता **३१** हजार ३८० असल्याने पालकांसह विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये सहज प्रवेश मिळतील; परंतु रिक्त राहणाऱ्या ७४२ जागा आणि ग्रामीण भागातील पुढील शिक्षणाकरिता असलेली उदासीनता, मुलींचे होणारे विवाह आणि परिणामी त्यातून होणारी गळती या बाबींचा विचार केला तर शिक्षक आणि महाविद्यालयांसाठी 'रात्र वैऱ्याची आहे, डोळा लागता कामा नये' अशीच स्थिती झाली आहे.

दरवर्षी शासन नव्याने आपल्या हितसंबंधांनुसार कनिष्ठ महाविद्यालयांचे वाटप करीत असते. पुढाऱ्यांच्या शिक्षणसंस्थांच्या गजबजाटात मिशनरींप्रमाणे कार्य करणाऱ्या शिक्षणसंस्थांना अखेरची घरघर लागल्याची परिस्थिती आज निर्माण झाली आहे. अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये तर सोडाच पण कायम विनाअनुदानित संस्थांमध्येही नोकरी मिळणे दुरापास्त होत चालले आहे. अशा स्थितीत आपले महाविद्यालय आणि नोकरी टिकवण्यासाठी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विद्यार्थ्यांच्या शोधात भटकंतीशिवाय दुसरा उपाय नाही.



पुण्यामुंबईसारख्या मोठ्या शहरांव्यतिरिक्त छोट्या शहरात आणि विशेषतः ग्रामीण भागात विद्यार्थ्यांना घरोघरी जाऊन शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन, त्यांच्या पालकांना विविध आमिषे दाखवून प्रवेशासाठी उद्युक्त करावे लागते. प्रसंगी त्यांची टीसी ताब्यात घेऊन त्यांचा फॉर्म स्वतःच भरून त्यांना परीक्षेकरिता हजरही करण्याची भूमिका शिक्षकांना निभवावी लागते. काही वेळा स्वतःच्या खिशातून थोडी फार 'लाच' देऊनही असे प्रवेश मिळवावे लागतात. सदर विद्यार्थ्यांच्या उत्तीर्णतेची हमी द्यावी लागते. वरपासून खालपर्यंत अलिखित आदेशातून उत्कृष्ट निकाल आणण्याच्या या प्रकारापुढे शासनाची २० टक्के निकालाची अट आज तुच्छ वाटू लागली आहे.

शासनाने घेतलेला एटीकेटीचा निर्णय नव्याने उघडत चाललेल्या कनिष्ठ महाविद्यालयांसाठी आनंदी आनंद देणारा असला तरी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा ढासळवत जाणारा आहे. पुढची निर्माण होणारी ग्रामीण भागातील पिढी ही शैक्षणिकदृष्ट्या मागासलेली तयार होणार आहे. पुढेही शिक्षणक्षेत्रात राज्यकर्त्यांच्या अशाच हस्तक्षेपातून आठवीपर्यंतच कशाला, दहावीची परीक्षाही रद्द होईल आणि शिक्षणाची प्रमाणपत्रे दुकानातून मिळणाऱ्या किराणा मालाप्रमाणे मिळू लागतील. पण तेव्हाही 'विद्यार्थी मिळेल का हो बाजारी?' असे ओरडत शिक्षकांची आणि संस्थाचालकांची भटकंती सुरूच राहील.

**(लेखन – जून २०१०**

**पूर्वप्रसिद्धी – दै. सकाळ, यवतमाळ, दि. २०–६–२०१०)**

येथे इंदिरा महाविद्यालय, आर्णी येथे श्री महंत दत्तराम भारती महाविद्यालय, बाभूळगाव येथे शिवशक्ती महाविद्यालय, मारेगाव येथे कला महाविद्यालय, सवना येथे श्री विठ्ठल रुक्मिणी कलावाणिज्य महाविद्यालय, महागाव येथे कलावाणिज्य महाविद्यालय अशी महाविद्यालये पूर्वीपासूनच अस्तित्वात होते. शासन निर्णयानुसार त्यांना नव्याने विज्ञान शाखा दिली परंतु त्यासोबतच दिलेल्या राजकीय मंडळींच्या महाविद्यालयांनी विद्यार्थी मिळविण्यापासून तर शाखा व्यवस्थित चालविण्यापर्यंत असंख्य समस्या उभ्या झाल्या. आर्णीमध्ये एकेका विद्यार्थ्याच्या टीसीसाठी ३–३ हजार रुपयांचे वाटप करावे लागले, अशा बातम्या गेल्या वर्षी वृत्तपत्रातून झळकल्या होत्या. यावर्षीही विद्यार्थी पळविण्याची जणू शर्यतच जुन्या आणि नवीन महाविद्यालयांमध्ये लागली होती. आता मात्र प्रामाणिकपणे चालविल्या जाणाऱ्या जुन्या महाविद्यालयांनी या नवीन कागदावरच्या महाविद्यालयांच्या त्रासाला कंटाळून अनुदान मिळविण्याचा चंग बांधला आहे.

कायम प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर वृंद, स्वत:ची जागा, इमारत, प्रयोगशाळा व आवश्यक साहित्य, खेळ व क्रीडांसाठी पटांगण, खेळ साहित्य, ग्रंथालय, पुरेशी ग्रंथसंख्या, होस्टेल सुविधा, लेडीज, जेन्ट्स टॉयलेट सुविधा, कॉमन रूम, यूजीसीची २ एफ, १२ बी प्रमाणपत्रे,



झाला आहे. शाळा-महाविद्यालयाच्या मंजुरीच्या दरापासून तर शिक्षक, कर्मचारी यांच्या नियुक्त्या आणि विद्यार्थी डोनेशन या सर्वांचे दर संस्था निर्माण करणारे हे राजकारणी कंत्राटदार ठरवितात. ह्या राजकारणी संस्थाधीशांनाच आपले देव समजून शिक्षक आपल्या 'विद्यार्थी' नावाच्या पवित्र दैवताला विसरले. धंदा वाढीस लावण्यासाठी सर्वच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन त्यातून कमाई करण्याच्या प्रयत्नात राज्यकर्ते हे विसरून गेले (?) की यामुळे आपण दर्जाहीन शिक्षणव्यवस्था निर्माण करतो आहोत, विद्यार्थ्यांना पंगू बनवितो आहोत. याच शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा उपयोग निवडणूक काळात केला जातो. अशा परिस्थितीत खरा आदर्श शिक्षक, आदर्श विद्यार्थी अभावानेच आढळतो. विद्यार्थ्यांना शिक्षकांचे तर शिक्षकांना विद्यार्थ्यांचे नावही माहीत होत नाही.

प्रश्न एकच प्रडतो, की राज्यकर्त्यांना खरोखर शिक्षणसंस्थांची गरज आहे का? समाजकारण, देशसेवा करणारा एकही राजकारणी या देशात उरला नाही का? शिक्षणसम्राट होणे हे आपल्या पुढच्या निष्क्रिय पिढ्यांच्या पोटापाण्याच्या सोयीच्याच उद्देशाने आणि म्हातारवयात राजकारण जमले नाही तर गादीवर बसून तुंदिलतनूचे चोचले पुरवावे, या उद्देशाने केले असले तरी हे पवित्र शिक्षण क्षेत्रात राज्यकर्त्यांनी निर्माण केलेल्या भ्रष्टाचाराने आज बरबटले आहे. काही राजकारण्यांच्या तर स्मरणात राहणार नाही, इतक्या त्यांच्या शिक्षण संस्था आणि शाळा-महाविद्यालये आहेत, तर काही धूर्त मंडळी ती पार्टनरशिपमध्ये चालवितात.

यावर उपाय म्हणजे कुठलाही शासकीय नोकरीतील

कर्मचारी जसा सेवानिवृत्त होईपर्यंत शिक्षणसंस्था उभारू शकत नाही, तसेच यापुढे राजकीय पदावरच्या व्यक्तींना राजकीय निवृत्तीपर्यंत शिक्षणसंस्थांशी संबंध ठेवता येणार नाही, अशी कायद्यात तरतूद व्हावी. राजकीय व्यक्तींच्या शिक्षण संस्था ह्या जनतेच्या किंवा काळ्या पैशावर निर्माण झाल्या असल्याने त्या शासकीय म्हणून घोषित केल्या जाव्या. आमदार, खासदार किंवा मंत्र्यांसारख्या एखाद्या राजकीय पदावरील व्यक्तीचा अशा संस्थांशी संबंध आढळल्यास त्याला त्याच्या आमदार, खासदार किंवा मंत्रीपदाचा राजीनामा देण्यास भाग पाडले जावे. अशी कडक अंमलबजावणी जेव्हा होईल, तेव्हाच पुन्हा एकदा हे शिक्षणक्षेत्र पवित्र होईल आणि दर्जेदार शिक्षणाला प्रारंभ होईल.

**(लेखन – जून २०१०**

**पूर्वप्रसिद्धी – दै. लोकदूत, यवतमाळ, २०–६–२०१०)**



# जुन्या महाविद्यालयांची विज्ञान शाखेसाठी अनुदानाची मागणी

मंत्रीमंडळातील फेरबदलानंतरचे हिवाळी अधिवेशन, पदवीधर मतदार संघातून श्री. रणजीत पाटलांच्या विजयाने बदलेलेले वातावरण, विद्यापीठाच्या सिनेट निवडणुका आणि शिक्षण संचालनालयांनी विज्ञान शाखांसाठी मागितलेले अनुदान प्रस्ताव या सर्व पार्श्वभूमीवर जुन्या महाविद्यालयांनी २००९–१० या सत्रात सुरू केलेल्या विज्ञान शाखांसाठी अनुदान मिळविण्यासाठी कंबर कसली आहे.

प्रत्येक तालुक्यात अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांना अनुदानित विज्ञान शाखा देण्याच्या ४ फेब्रुवारी, २००८ च्या शासन निर्णयाचा आपापल्या परीने अर्थ लावून अनेक संस्थांनी प्रत्येक तालुक्यातून विज्ञान शाखेचे प्रस्ताव टाकले. राज्य शासनानेही निवडणुका डोळ्यांपुढे ठेवून मागेल त्याला महाविद्यालये दिली. आता या सर्व महाविद्यालयांनी अनुदानासाठी धडपड सुरू केली आहे.

यवतमाळ जिल्ह्यात कळंब, आर्णी, बाभूळगाव, मारेगाव, झरी अशा विविध ठिकाणी नवीन विज्ञान महाविद्यालये सुरू करण्यात आली. त्यात राजकीय वजन वापरणाऱ्यांची संख्या अधिक होती. यापैकी कळंब

अशी कमाईची दिवास्वप्ने बघितली जात आहेत. मात्र ३१ ऑक्टोबरपर्यंत कायम प्राचार्य नियुक्त न केल्यास विद्यार्थ्यांना परीक्षेस बसू न देण्याची आणि २०११–१२ मध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मान्यता न देण्याच्या मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करण्याचे विद्यापीठाने ठरविले आहे. अन्यथा विद्यापीठावर कारवाई करण्यात यावी, असेही मा. उच्च न्यायालयाने नमूद केले आहे.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू विभागीय आयुक्त श्री. प्रवीणसिंह परदेशी यांनी याबाबत नुकतीच संस्थाचालक आणि प्राचार्यांची सभा घेतली आणि याची कडक अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या. मात्र राजकारण्यांच्या खेळीत विभागीय आयुक्तांची शिस्त आणि उच्च न्यायालयाचा निर्णय मान्य होऊ शकेल का, हा प्रश्न जुन्या महाविद्यालयांना पडला आहे. शासन निर्णय हा जुन्या कार्यक्षम महाविद्यालयाच्या बाजूचा असला तरी राजकीय हस्तक्षेपामुळे जर ही कागदावरची महाविद्यालये अनुदान लाटण्याच्या शर्यतीत बनावट कागदपत्रांच्या साह्याने जिंकली तर न्यायालयात दाद मागण्याशिवाय दुसरा उपाय जुन्या महाविद्यालयांपुढे राहणार नाही.

विद्यापीठाने जाहीर केलेल्या काळ्या यादीत यवतमाळ जिल्ह्यातील ५१ महाविद्यालयांचा समावेश होता. त्यात सर्वाधिक म्हणजे १६ महाविद्यालये यवतमाळ



कायम संलग्नीकरण अशा अनेक अटी केवळ जुनी महाविद्यालयेच पूर्ण करू शकतात. मात्र कमाई आणि राजकारण करण्यासाठी कागदावर सुरू असलेल्या महाविद्यालयांच्या आमिषांना बळी न पडता शिक्षण संचालनालय व शासनाने प्रत्येक बाबींची शहानिशा करूनच अनुदान निर्णय घ्यावा तसेच विद्यापीठाच्या संलग्नीकरण समितीवर जाणाऱ्यांनीही पाकीटसंस्कृतीला बळी न पडता प्रामाणिकपणे तपासणी करावी आणि नव्याने निवडून येणाऱ्या विद्यापीठ प्राधीकरणावरील मंडळींनीही राजकीय हस्तक्षेपांना बळी न पडता विद्यापीठाच्या स्वच्छ कार्यप्रणालीला डाग लागू देऊ नये, अशी अपेक्षा या जुन्या महाविद्यालयांनी व्यक्त केली आहे.

(लेखन – जून २०१०
पूर्वप्रसिद्धी – यवतमाळमधील विविध वृत्तपत्रांतून बातमीस्वरूपात जून २०१०)

# कागदावरची महाविद्यालयेसुद्धा अनुदानाच्या शर्यतीत

**राज्य शासनाने** २००९–१० **या वर्षात केलेल्या विज्ञान महाविद्यालयांच्या खैरातीने उच्च शिक्षण** विभागापुढे अनेक प्रश्न उभे असतानाच आता या सर्व महाविद्यालयांनी अनुदानासाठी धडपड सुरू केली आहे. या शर्यतीत कागदावर असणारी परंतु विविध राजकीय पक्षांचे वरदहस्त असलेली अनेक महाविद्यालये आघाडीवर असून तालुकापातळीवर केवळ एकाच महाविद्यालयाला अनुदान मंजूर होणार असल्याने ही बाजी कोण मारणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

प्रत्येक तालुक्यात अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांना अनुदानित विज्ञान शाखा देण्याच्या ४ फेब्रुवारी, २००८ च्या शासन निर्णयाचा आपापल्या परीने अर्थ लावून अनेक संस्थांनी प्रत्येक तालुक्यातून विज्ञान शाखेचे प्रस्ताव टाकले. निवडणुका डोळ्यांपुढे ठेवून शासनाने मागेल त्याला विज्ञान महाविद्यालय दिले. परिणामी एकेका तालुक्यात ४–५ महाविद्यालयांनाही मान्यता दिली गेली. जिथे कनिष्ठ महाविद्यालयांचीच संख्या १ किंवा २ होती, अशा ठिकाणी इतकी विज्ञान महाविद्यालये चालतील कशी, याचा साधा विचारही विद्यापीठ, उच्च शिक्षण विभाग किंवा शासनाने केला



नाही. किंबहूना राजकीय हस्तक्षेपांमुळे ही महाविद्यालये सढळ हाताने वाटप केली गेली. एक किंवा दोन विद्याशाखा असलेल्या महाविद्यालयालाच प्राधान्याने अनुदानित विज्ञान शाखा देण्यात येईल असे शासन निर्णयात नमूद असतानाही उच्च शिक्षण विभागाच्या जाहिरातीनुसार ३१ ऑक्टोबर, २०१० पर्यंत मागितलेल्या अनुदान प्रस्तावांमध्ये केवळ कागदावर अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांनीही उडी घेतली आहे.

कायम प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर वृंद, स्वत:ची जागा, इमारत, प्रयोगशाळा व आवश्यक साहित्य, खेळ व क्रीडांसाठी पटांगण, खेळ साहित्य, ग्रंथालय, पुरेशी ग्रंथसंख्या, होस्टेल सुविधा, लेडीज, जेन्ट्स टॉयलेट सुविधा अशा अनेक अटी असतानाही शासनाच्या आणि विद्यापीठाच्या तपासणीत कागदावरच्या महाविद्यालयांनी येनकेनप्रकारेण आपल्या बाजूने कागदं तयार करून मान्यता व संलग्नीकरण मिळविले. परंतु प्रत्यक्षात महाविद्यालये अस्तित्वात नसतानाही अनुदान प्रस्तावासाठी मागितलेल्या व्हिडिओ सीडीत भव्य अशी महाविद्यालये दर्शविली गेली. ही महाविद्यालये नेमकी कुठे आहेत? त्यांचे विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, कार्यालय कुठे आहेत, ह्या प्रश्नाचे उत्तर शासनही देऊ शकत नाही, तरी राजकीय वरदहस्तामुळे आणि स्वत: राजकारण्यांची ही बहुतांश महाविद्यालये असल्याने अनुदान आपल्यालाच मिळणार,

व्यवसायाच्या दृष्टीने सुरू झालेल्या नवीन कायम विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये सदर पद भरायचे तर एवढे वेतन कुठून द्यायचे हा प्रश्न संस्थाचालकांपुढे पडला. शिवाय १५ वर्षांचा अनुभव, पीएच.डी. असणारे प्राध्यापक ५ तासांची सुखाची नोकरी सोडून २४ तास स्वत:हून 'आ बैल मुझे मार' कशाला म्हणतील? पुढाऱ्यांच्या महाविद्यालयात नोकरी करणे म्हणजे तारेवरची कसरत असते. अशा परिस्थितीत ६ महिन्यांनीही कायम प्राचार्य मिळण्याची शक्यता अत्यल्प असल्याने या महाविद्यालयांना पुन्हा न्यायालयाकडून मुदत वाढवून घेण्याशिवाय दुसरा उपाय राहणार नाही अन्यथा त्यांना ही महाविद्यालये चालवणे अशक्यप्राय होईल.

आज शहरातील विद्यार्थी व पालक जागृत झाल्यामुळे ते सर्व बाबींचा विचार करूनच प्रवेश घेतात. पण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या सर्व बाबींची तितकीशी जाणीव नसल्याने त्यांना प्रवेशासाठी उद्युक्त करणारी महाविद्यालये या यादीतील असली तर त्यांच्याही भवितव्यावर टांगती तलवार राहील. तेव्हा विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी महाविद्यालयाची परीक्षा करूनच आपल्या पाल्याला महाविद्यालयात प्रवेशित करण्याची गरज आज निर्माण झाली आहे.

ꕥꕥꕥ

(लेखन – जून २०१०

पूर्वप्रसिद्धी – यवतमाळमधील विविध वृत्तपत्रांतून बातमीस्वरूपात जून–जुलै २०१०)



तालुक्यातील आहेत. त्यानंतर कळंबमधील ५, दारव्हा, पुसद, दिग्रस व वणी तालुक्यातील प्रत्येकी ४, आर्णी व राळेगाव तालुक्यातील प्रत्येकी ३, केळापूर व झरी येथील प्रत्येकी २, उमरखेड, महागाव, मारेगाव व घाटंजीमधील १ महाविद्यालय या यादीत होते. यामधील केवळ ६ महाविद्यालये अनुदानित असून बाकी सर्व कायम विनाअनुदान तत्त्वावर सुरू होती व बहुतांश महाविद्यालये गेल्या दोन वर्षांत सुरू झालेली आहेत. त्यात बी.एड., बी.पी.एड., बी.सी.ए., बी.बी.ए असे व्यावसायिक अभ्यासक्रम आणि बी.एस्सी.सारखा पारंपरिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या महाविद्यालयांची संख्या अधिक होती. मात्र त्यातील बोटावर मोजता येणाऱ्या महाविद्यालयांनी कायम प्राचार्यांची नियुक्ती केली आहे. इतरांचे काय होईल आणि आता अनुदानाच्या घोडेबाजारात जुनी महाविद्यालये जिंकतील की कागदावरची बोगस महाविद्यालये, हा प्रश्न मात्र अनुत्तरीत आहे.

ꕥꕥꕥ

(लेखन – जून २०१०

पूर्वप्रसिद्धी – यवतमाळ व अमरावतीमधील विविध वृत्तपत्रांतून बातमीस्वरूपात जून–जुलै २०१०)

# यवतमाळ जिल्ह्यातील ५१ महाविद्यालयांवर टांगती तलवार

मा. उच्च न्यायालयातील याचिका क्र. २२१६/२००६ वरील निर्णय व शासन निर्णय क्र. संकीर्ण २००९/(४३५/०९) विशि ३ ची अंमलबजावणी न केल्यामुळे यवतमाळ जिल्ह्यातील ५१ महाविद्यालयांमधील विद्यार्थी प्रवेशावर टांगती तलवार निर्माण झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाने या महाविद्यालयांना ६ महिन्यांची मुदतवाढ दिली असली तरी त्यानंतर या संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर मात्र प्रश्नचिन्ह उभे झाले आहे.

मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करीत राज्य शासनाने सर्व अशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना ३१ मे २००९ पर्यंत कायमस्वरूपी प्राचार्य व अधिव्याख्यातांची नियुक्ती करण्याचे आदेश दिले. सर्व विद्यापीठांनीही या संदर्भात महाविद्यालयांना वारंवार निर्देश देऊनही व मा. सर्वोच्च न्यायालयाने ही मुदत ३१ मे २०१० पर्यंत वाढवूनही अनेक महाविद्यालयांनी त्याची अंमलबजावणी केली नाही. तेव्हा सर्व विद्यापीठांनी अशा महाविद्यालयांची काळी यादी इंटरनेटवर जाहीर केली व प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर बंदी आणली. अनेक संस्थाचालकांनी याविरोधात पुन्हा मा. सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आणि विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून मुदतवाढ मागितली. त्यानुसार पुन्हा ६ महिन्यांपर्यंत न्यायालयाने वाढ



दिली तरी तोपर्यंत या महाविद्यालयांना कायमस्वरूपी प्राचार्य मिळेल का, हे प्रश्नचिन्हच आहे.

विद्यापीठाने जाहीर केलेल्या यादीत यवतमाळ जिल्ह्यातील ५१ महाविद्यालयांचा समावेश असून त्यात सर्वाधिक म्हणजे १६ महाविद्यालये यवतमाळ तालुक्यातील आहेत. त्यानंतर कळंबमधील ५, दारव्हा, पुसद, दिग्रस व वणी तालुक्यातील प्रत्येकी ४, आर्णी व राळेगाव तालुक्यातील प्रत्येकी ३, केळापूर व झरी येथील प्रत्येकी २, उमरखेड, महागाव, मारेगाव व घाटंजीमधील १ महाविद्यालय या यादीत आहे. यामधील केवळ ६ महाविद्यालये अनुदानित असून बाकी सर्व कायम विनाअनुदान तत्त्वावर सुरू आहेत व बहुतांश महाविद्यालये गेल्या दोन वर्षांत सुरू झालेली आहेत. त्यात बी. एड., बी.पी.एड., बी.सी.ए., बी.बी.ए असे व्यावसायिक अभ्यासक्रम आणि बी.एस्सी.सारखा पारंपरिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या महाविद्यालयांची संख्या अधिक आहे.

४ फेब्रुवारी २००८ च्या शासन निर्णयाचा सोयीप्रमाणे अर्थ लावून अनेक संस्थांनी आणि पुढाऱ्यांनी गेल्या वर्षी शासनाकडून येनकेनप्रकारेण कितीतरी विज्ञान महाविद्यालये पदरात पाडून घेतली. पुरेशी विद्यार्थीसंख्या, कर्मचारी, स्वतःची जागा व अन्य सोयीसुविधा उपलब्ध नसतानाही या महाविद्यालयांना चालवण्याची परवानगी शासनाने व विद्यापीठाने दिली. एका एका तालुक्यात विज्ञान महाविद्यालयांची संख्या इतकी वाढली की संस्थाचालकांना विद्यार्थी आणण्याकरिता चांगलीच दमछाक होऊ लागली. हा सर्व प्रकार पाहता मा. न्यायालयाने दिलेला कायमस्वरूपी प्राचार्य भरण्याचा आदेश योग्यच होता परंतु

संधी आहे. शिवाय प्रमाणपत्र परीक्षा पास करणाऱ्यांना इन्शुरन्स एजंट म्हणूनही काम करता येते.

### टॅक्सेशन -

टॅक्स अकौंट, टॅक्स स्पेशालिस्ट, टॅक्स मॅनेजर, रेव्हेन्यू एजंट किंवा टॅक्स ॲडव्हायजर अशा विविध स्वरूपातील संधी वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना खुणावत असतात. टॅक्स भरणाऱ्यांची वाढती प्रचंड संख्या बघितली तर या क्षेत्रात अभ्यासू विद्यार्थ्यांना कष्ट करून कमाईची बरीच संधी आहे.

### रियल इस्टेट -

आज भारतात पैसा दिसू लागला आहे. रियल इस्टेटमध्ये पैसा गुंतवणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढते आहे. घर, फ्लॅट, दुकाने, प्रतिष्ठाने, अन्य प्रॉपर्टी अशा खरेदी विक्रीमध्ये जाणकारांची आवश्यकता असते. हे काम वाणिज्य शाखेचे विद्यार्थी चांगले करू शकतात. एखाद्या रियल इस्टेट एजन्सीत काम किंवा स्वतंत्र व्यवसायही करू शकतात.

याशिवाय परिवहन क्षेत्र, कायदा क्षेत्र, व्यवस्थापन अशी क्षेत्रेही वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध होतात. लोकसेवा आयोगाच्या, बँकांच्या स्पर्धा परीक्षाही वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना सोप्या जातात. प्रामाणिकता, चिकाटी आणि जिद्द असेल, थोडे कष्ट करून अभ्यास केला, बऱ्यापैकी गुण मिळवले तर असंख्य संस्था आणि कंपन्या वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांची वाट बघत असतात. छोटे उद्योग, प्रतिष्ठान एवढेच काय तर अगदी छोटी दुकानेसुद्धा वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी देण्यास



# वाणिज्य शाखेकडे वळण्याची गरज

वाणिज्य शाखेला प्रथम पसंती देणाऱ्या पुण्यामुंबईकडच्या विद्यार्थ्यांच्या तुलनेने विदर्भातील ग्रामीण भागातला विद्यार्थी वाणिज्य शाखेपासून अजूनही दूरच राहण्याचा प्रयत्न करताना दिसतो. पश्चिम महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्ये निर्माण झालेले मोठमोठे उद्योगधंदे पाहता त्या भागात साहजिकच वाणिज्य शाखेतील पदवीधरांना मागणी असते. मात्र विदर्भात हव्या त्या प्रमाणात कारखाने, विविध व्यवसाय हे निर्माण न झाल्याने इथे बी.कॉम. होणे म्हणजे बेकाम होण्यासारखे समजले गेले. म्हणून शहरे वगळता ग्रामीण महाविद्यालयांत वाणिज्य शाखांमधील विद्यार्थीसंख्या नगण्यच आहे. मात्र आज पुढे जाऊ इच्छिणाऱ्या, नोकरी व्यवसायात उतरू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना वाणिज्य शाखेचे महत्त्व पटवून देण्याची गरज निर्माण झाली आहे.

बारावी विज्ञान करणाऱ्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय, अभियांत्रिकी किंवा बीएससी अशा निवडक प्रवाहांकडे वळण्याची संधी असते; पण वाणिज्य शाखेत पदवीप्राप्त करणाऱ्यांना अनेक क्षेत्रात जाण्याची संधी असते, त्यांचाच हा थोडक्यात परिचय.

### सी.ए. किंवा चार्टर्ड अकौंटंट -

कंपन्या, कारखाने, संस्था, व्यावसायिक प्रतिष्ठान, देवस्थाने, शिक्षण संस्था अशा अनेक क्षेत्रातील आर्थिक व्यवहार करणाऱ्या घटकांना ऑडिट करावे लागते. त्याकरिता सी.ए. किंवा चार्टर्ड

अकौंटंटची गरज भासते. वाणिज्य शाखेतील विद्यार्थी सर्वात जास्त याच क्षेत्राला प्राधान्य देतात. या क्षेत्रात मान आणि कमाई भरपूर असते.

### कंपनी सेक्रेटरी -

कार्पोरेट सेक्टरमधील सक्षम व्यवस्थापन आणि कायदेशीर बाबी या गोष्टी सांभाळणारे तसेच कंपनीतील सर्व विभागांमध्ये समन्वय साधणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे कंपनी सेक्रेटरी. कंपनी सेक्रेटरीला संस्थेच्या, कंपनीच्या अकौंट्स, फायनान्ससोबतच कर्मचारी, प्रशासकीय कार्य यावरही लक्ष ठेवावे लागते. मोठमोठ्या संस्था, कारखाने, कंपन्या यांमध्ये हे पद भरले जाते. वेतनही भरपूर मिळते.

### फायनान्शियल ॲनालिस्ट -

कंपनीचे, संस्थेचे आर्थिक, गुंतागुंतीचे व्यवहार तपासणे, दुरुस्त करणे, या संदर्भात कंपनीच्या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणे अशी कामे फायनान्शियल ॲनालिस्टला करावी लागतात. गणित, संगणक यांत हुशार विद्यार्थी या क्षेत्राचा विचार करू शकतात.

### इन्व्हेस्टमेंट बँकींग -

विविध कंपन्यांना, संस्थांना आपला पैसा कुठेतरी गुंतवायचा असतो, तो वाढवायचा असतो, याकरिता मदत करणाऱ्या व्यक्तीची नियुक्ती या संस्था करतात. गुंतवणूक क्षेत्रातील नवे प्रवाह, फायदे, तोटे, धोके यांची माहिती देणे व योग्य ठिकाणी गुंतवणूक करून देणे, हे काम करणाऱ्या या व्यक्तींना चांगले वेतन दिले



जाते.

### कॉस्ट अँड वर्क अकौंटंट -

गणिताचा ज्या विद्यार्थ्यांचा अभ्यास चांगला आहे, त्याला या क्षेत्रात उतरून नाव व पैसा कमावण्याची संधी आहे. सी.ए. किंवा सी.एस. प्रमाणेच 'कॉस्ट अँड वर्क अकौंटंट'चा कोर्स असतो. बारावी किंवा पदवीनंतर हा कोर्स करता येतो. कंपन्यांप्रमाणेच चार्टर्ड अकौंटन्सीची कामे करणाऱ्या संस्थांमध्ये या विद्यार्थ्यांना संधी असते.

### फॉरेन्सिक अकौंटिंग -

देशात आर्थिक घोटाळ्यांचे, फसवणूक, लबाडी यांचे प्रमाण वाढते आहे. ते उघडकीस आणण्याचे काम फॉरेन्सिक अकौंटंट करतात. कपन्यांच्या आर्थिक बाबींवर लक्ष ठेवणारे म्हणून त्यांना 'वॉच डॉग' असे म्हणतात. हा कोर्स करणाऱ्यांना भारतात मरण नाही.

### शेअर मार्केट -

वाणिज्य शाखेत, व्यवसायात हुशार असणाऱ्यांना शेअर मार्केट किंवा कॅपिटल मार्केटमध्ये काम करण्याची संधी असते. स्टॉक एक्स्चेंज, म्युच्युअल फंड्स यांचा समावेश कॅपिटल मार्केटमध्ये होतो. नॅशनल स्टॉक एक्स्चेंजचे प्रमाणपत्र मिळाल्यावर या मार्केटमध्ये स्वतंत्र दलाल, डीलर म्हणूनही पाय रोवता येतात.

### इन्शुरन्स क्षेत्र -

इन्शुरन्स किंवा विमा क्षेत्रात आज करियरच्या संधी व्यापक झाल्या आहेत. बारावीनंतर जशी या क्षेत्रात संधी आहे, तसेच द्विपदवीधरांना असिस्टंट ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर बनण्याचीही

विद्यापीठाच्या विभाजनाचा विचार पुढे येणे गरजेचे आहे. अमरावती विभागात अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम व यवतमाळ असे पाच जिल्हे आहेत. भौगोलिकदृष्ट्या व दळणवळणाच्या सोयीसुविधांवर नजर टाकल्यास अमरावती, अकोला व बुलढाण्याचा एक गट व वाशिम आणि यवतमाळचा एक गट करता येईल. कारण यवतमाळ जिल्ह्यातील वणी, मुकुटबन, उमरखेड, मुळावा तर वाशिम जिल्ह्यातील वाशिम, वनोजा, रिसोड अशा दूरदूरच्या ठिकाणांहून विद्यार्थ्यांसह, महाविद्यालय प्रशासनाला अमरावती विद्यापीठात पोचण्यासाठी चांगलीच सर्कस करावी लागते. अमरावतीला येण्यासाठी अकोला जिल्ह्यातील अकोला, मुर्तिजापूर तर बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव, मलकापूर, नांदुरा अशा ठिकाणांहून रेल्वेमार्गाने फार कमी वेळात पोचता येते. शिवाय बुलढाणा आणि अकोला जिल्ह्यातील अनेक गावे महामार्गांनी, राज्यमार्गांनी सरळ अमरावतीशी जोडली असल्याने पहिल्या गटातील महाविद्यालयांना अमरावती हेच विद्यापीठ सोयीचे ठरते. बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा, देऊळगावराजा, साखरखेड, लोणार व मेहकर येथून अमरावतीला पोचणे थोडे वेळखाऊ असले तरी एस.टी. प्रमाणेच खाजगी प्रवासी गाड्या या मार्गावर अधिक आहेत. अकोला, बुलढाणा व वाशिमसाठी वेगळे विद्यापीठ करून अकोल्याला त्याची स्थापना करावी, असा एक विचारप्रवाह असला तरी वरील सर्व बाबींचा अभ्यास केल्यास दुसऱ्या गटातील यवतमाळ व वाशिम जिल्ह्याकरिता स्वतंत्र विद्यापीठ निर्माण होण्याची गरज आहे.



आतुर असतात. शिवाय स्वतंत्र व्यवसायाच्या संधीही आहेत. तेव्हा वाणिज्य शाखेकडे वैदर्भीय विद्यार्थ्यांनी वळण्याची आणि खुणावणाऱ्या संधींचा लाभ घेण्यास सुसज्ज होण्याची गरज आज निर्माण झाली आहे.

**(लेखन — जून २०१०**
**पूर्वप्रसिद्धी — दै. सकाळ, नागपूर, दि. ६—६—२०१०**
**दै. हिंदुस्थान, अमरावती दि. १०—७—२०१०**
**दै. विदर्भ मतदार, यवतमाळ, जुलै २०१०**
**दै. जनमाध्यम, अमरावती, जुलै २०१०**
**दै. लोकदूत, यवतमाळ, दि. ४—८—२०११)**

# अमरावती विद्यापीठाच्या विभाजनाची आवश्यकता

आज सर्वत्र 'खाउजा'चा (खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण) बोलबाला आहे. खुद्द शिक्षणमंत्र्यांनीही शैक्षणिक संस्थांकडे आज 'एज्युकेशनल फॅक्टरी' म्हणून बघितले जात असल्याचे प्रतिपादन केले आहे. शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी व्यापक मंथन सुरू आहे; परंतु एकीकडे 'क्वालिटी' आणि दुसरीकडे 'क्वांटिटी' अशा दोन परस्परविरोधी बाजूंमध्ये शिक्षणाची दशा वेगळ्या अंगाने प्रवास करू लागली आहे. या दोन्हींचा सुवर्णमध्य साधणे, हे आज आव्हान ठरू पाहत आहे. अशा पार्श्वभूमीवर मोठ्या विद्यापीठांचे विभाजन करून लहान विद्यापीठांच्या निर्मितीची आवश्यकता भासू लागली आहे.

विद्यापीठ विभाजनाची मागणी तशी नवीन नाही. नागपूर विद्यापीठाचा कार्यभार फार वाढला तेव्हा व्यापक मागणीतून **१९८३** साली अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली. पुन्हा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाची संख्या इतकी जास्त झाली, की 'गोंडवन विद्यापीठा'च्या रूपाने नवे विद्यापीठ निर्माण करावे लागले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा विचार केल्यास चारशेच्यावर अधिकृत महाविद्यालये संलग्नित असून दरवर्षी नव्याने महाविद्यालयांची भर पडतेच आहे आणि सहजगत्या त्यांना राजकीय दबावातून संलग्निकरण दिले जात आहे. 'क्वांटिटी'



आणि 'क्वालिटी'च्या भांडणात पहिल्याची सरशी करण्यात ही मंडळी जबाबदार आहेत व परिणामी दुसऱ्या आवश्यक तत्त्वाला तिलांजली दिली जात आहे.

अशा परिस्थितीत यूजीसीच्या **१५०** महाविद्यालयांमागे एक विद्यापीठ या निकषाची अंमलबजावणी कुठल्याही विद्यापीठात होताना दिसत नाही. विदर्भात आज नागपूर आणि अमरावती विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांच्या अफाट संख्येमुळे विद्यापीठ प्रशासनावर कामाचा प्रचंड ताण वाढत आहे. त्यातून कामकाजात होणाऱ्या चुका, विलंब, कागदपत्रे गहाळ होणे असे प्रकार वाढत आहेत. याला जबाबदार विद्यापीठाचे प्रशासन नसून राज्यकर्त्यांनी सुरू केलेली महाविद्यालयांची खैरात हे खरे कारण आहे.

यावर उपाय म्हणून विद्यापीठाची उपकेंद्रे हा प्रयोग काही ठिकाणी राबवल्या गेला; परंतु तो तितकासा यशस्वी ठरला नाही. उपकेंद्रात संकलित सर्व साहित्य मूळ विद्यापीठात नेणे, तिथून सर्व अंमलबजावणी करून त्याचा पाठपुरावा करणे या बाबींमध्ये जाणारा वेळ आणि दोहोंमधील ताळमेळाचा विचार करता विद्यार्थ्यांचा मूळ विद्यापीठात जाण्यायेण्याचा खर्च वगळता फारसा फायदा झालेला नाही. शिवाय त्यानुसार शिक्षण सहसंचालक कार्यालयांची उपकेंद्रे स्थापन झालेली नाहीत. म्हणजे महाविद्यालये, संस्था यांना त्यातून अत्यल्प फायदा झाला. तेव्हा यावर प्रभावी उपाय म्हणजे मोठ्या विद्यापीठांचे विभाजन करून लहान विद्यापीठांची निर्मिती करणे होय.

नागपूर विद्यापीठाचा प्रश्न मार्गी लागत असताना अमरावती

चाललेला विचारप्रवाह अशा अनेक कारणांनी कार्यरत शिक्षक प्रामाणिकपणे ज्ञानदान करतील, शिक्षण संस्था मिशनरींप्रमाणे या कार्यात स्वतःला झोकून देतील, विद्यार्थ्यांचा गुणवत्ताविकास घडून येईल अशी स्वप्ने ही दिवास्वप्नेच ठरतील.

कळंबच्या प्राथमिक शाळेत सुमारे साठ वर्षांपूर्वी जुन्या पिढीतील बनकर गुरुजी कार्यरत होते. त्याही काळात शिक्षकांना, संस्थांना शिक्षण विभागाचे काही अधिकारी आजच्यासारखाच त्रास केवळ मलाई खाण्यासाठी देत असत. अशाच एका स्वतःला खूप शाहणा व कडक समजणाऱ्या साहेबाने या प्राथमिक शाळेला भेट देऊन लिहिलेल्या शिक्षणशेऱ्यातील शंभर चुका बनकर गुरुजींनी काढल्या होत्या.

शेतीत किंवा अन्य उद्योगव्यवसायात कष्ट करून, झोपड्यांमधून, गिरिकंदरांतून, पोडांमधून किंवा तांड्यावरून येणारा विद्यार्थी डॉक्टर, इंजीनियर किंवा वकील बनेल अशी आशा करणे संयुक्तिक ठरत नसले तरी खरा कष्टकरी विद्यार्थी जीवनाच्या कुठल्या ना कुठल्या क्षेत्रात यशस्वी ठरतो, याचा अनुभवही कळंबनगरीने घेतला आहे. अगदी प्राथमिक शिक्षणापासून तर महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत कळंबमध्येच शिकलेले काही विद्यार्थी नामांकित उद्योजक, विधितज्ज्ञ, प्राचार्य, प्राध्यापक, संशोधक, साहित्यिक, समाजसेवक किंवा कंपनीतील मोठ्या पदांवर पोचलेले अधिकारी म्हणून आज कळंबचे नाव उज्ज्वल करीत आहेत.

वास्तविक शहरी आणि ग्रामीण शिक्षणातील वाढत जाणारी दरी कळंबच्या शिक्षणव्यवस्थेलाही आपल्या कवेत घेऊन बसली



आता नवीन विद्यापीठ यवतमाळला व्हावे की वाशिमला या प्रश्नावर मतभेद होतील; पण हा प्रश्न चर्चेने सोडवला जाऊ शकतो. पुढेमागे उमरखेड व वणी हे दोन नवीन जिल्हे अस्तित्वात येण्याची शक्यता आहे. यवतमाळ हे नागपूर-नांदेड राज्यमार्गावर आहे. तेव्हा यवतमाळ येथे हे विद्यापीठ झाल्यास अधिक सोयीचे ठरू शकते.

विद्यापीठातील विविध प्राधिकरणांवर वर्षानुवर्षे काम करणारे अभ्यासू, अनेक यंत्रणांमध्ये आपल्या आयुष्याची हयात घालवणाऱ्या किंवा राजकीय अस्तित्व टिकवू पाहणाऱ्या मंडळींना हे विभाजन नकोसे वाटेल; परंतु केवळ आपल्या स्वार्थाचा विचार न करता त्यांनी लाखो विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी, विविध महाविद्यालयाच्या प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांसाठी आणि वाढलेल्या विद्यापीठाच्या व्यापात काम करणाऱ्यांच्या तणावविरहित जीवनासाठी एक समाजकार्य या दृष्टीने या विषयाकडे पाहण्याची गरज आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या छोट्या विद्यापीठांच्या प्रगतीचा आलेख बघितल्यास विद्यापीठ विभाजनाच्या या विचारावर कुणाचाही विरोध नसावा.

**(लेखन — मे २०१०**

**पूर्वप्रसिद्धी — दै. तरुण भारत, नागपूर, दि. १३—७—२०१०**

**दै. हिंदुस्थान, अमरावती, दि. १०—७—२०१०**

**दै. सकाळ, नागपूर, दि. ३०—५—२०१०**

**दै. लोकदूत, यवतमाळ, दि. २९—५—२०१०)**

# बदलती शिक्षणव्यवस्था : दशा आणि दिशा

स्वातंत्र्यपूर्व काळात ज्या कळंब तालुक्यात केवळ प्राथमिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध होत्या तसेच चौथी व सातवीच्या बोर्डाच्या परीक्षा केंद्रांसाठी यवतमाळ, राळेगावसारख्या ठिकाणी जावे लागत होते, त्याच कळंबमध्ये आज कला, वाणिज्य, विज्ञान, समाजविज्ञान, शिक्षण, शारीरिक शिक्षणासोबतच व्यावसायिक अभ्यासक्रमातील उच्चशिक्षणाच्या संधी विद्यार्थ्यांकरिता परीक्षाकेंद्रांसह उपलब्ध झाल्या आहेत. मात्र शिक्षणाची द्वारे इतक्या विपुल प्रमाणात उघडली गेली तरी बदलत्या शिक्षणव्यवस्थेचा दर्जा उंचावला, असे म्हणता येत नाही.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मध्यप्रदेशाशी जोडलेले वऱ्हाडाचे आठ जिल्हे महाराष्ट्रात आले. १०+२+३ च्या आकृतिबंधाने शिक्षणव्यवस्थेला नवी दिशा मिळाली. उच्चमाध्यमिक शिक्षणापर्यंत पुणे शिक्षण मंडळाशी तर उच्च शिक्षणाच्या बाबतीत सुरुवातीला नागपूर विद्यापीठाशी आणि **१९८३** पासून अमरावती विद्यापीठाशी कळंबचा विद्यार्थी जोडला गेला. सुमारे दहा वर्षांपूर्वीपर्यंत या भागात बोटावर मोजण्याइतक्या शिक्षणसंस्था होत्या. आज मात्र ‘खाउजा’च्या (खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण) काळात पावसाळ्यात उगवणाऱ्या कुत्र्याच्या छत्र्यांप्रमाणे शिक्षणसंस्थांचे पीक या भागात आलेले आहे. उच्चमाध्यमिक शिक्षण देणाऱ्या डझनभर शाळा, अर्धा डझन आश्रमशाळा, जवळपास तितकीच



कनिष्ठ महाविद्यालये, त्यात उर्दू माध्यमाची शाळा, मुलींकरिता असलेली शाळा व कनिष्ठ महाविद्यालय आजच्या घडीला कळंब तालुक्यात सुरू आहेत. निवडणूकपूर्व शासनाच्या कृपेने चार वरिष्ठ विज्ञान महाविद्यालयांना मान्यता मिळाली. एकंदरीत, प्रामाणिकपणे अभ्यास करून विज्ञान किंवा वाणिज्य शाखेची पदवी मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध उद्योगधंद्यांमध्ये तर कला शाखेच्या विद्यार्थ्यांना प्रशासकीय सेवेमध्ये जाण्याची संधी आज उपलब्ध झाली आहे.

महाविद्यालयीन शिक्षणात शासकीय अनुदानाच्या बाबतीत बोलायचे तर केवळ एक वरिष्ठ महाविद्यालय व दोन कनिष्ठ महाविद्यालये शंभर टक्के अनुदानावर कार्यरत आहेत. कळंबची लोकसंख्या, उपलब्ध होणारे विद्यार्थी आणि आज शिक्षण देणाऱ्या संस्था यांचा ताळमेळ बसत नाही. शासनाने दिलेल्या शाळा, महाविद्यालयांच्या खैरातीमुळे आणि राजकारण्यांनी शिक्षणाचा बाजार मांडल्याने विद्यार्थी मिळवणे कठीण झाले आहे. अनुदान नाही, कायम शिक्षक नाही, आहेत त्यांना पुरेसे वेतन नाही, ‘शिक्षण सेवक’ नावाचे चपराशापेक्षा कमी वेतन असणारे शासननिर्मित गमतीदार पद, निकालाची अट, विद्यार्थ्यांच्या उत्तीर्णतेसाठी पालक आणि गावगुंडांकडून संस्थांना मिळणाऱ्या धमक्या, इमारतीविना, स्वतःच्या जागेविना असलेल्या संस्था, शिक्षण विभागाकडून खिसे भरण्यासाठी दिला जाणारा त्रास, गेल्या कित्येक वर्षांपासून बंद असलेले वेतनेतर अनुदान आणि कमी श्रमात अधिक मोबदला मिळवून अत्याधुनिक व ऐषोरामाचे जीवन जगण्याचा पसरत

कर्जाचा दर अधिक असल्याने तो कमी करण्याची गरज आहे. दर कमी केला तर संस्था मोडकळीस येतात आणि वाढवला तर शेतकरी. अशा अवस्थेत शेतकऱ्यांना प्राधान्य द्यायचे की सरकारी संस्थांना हे ठरविण्याची वेळ राज्यकर्त्यांवर आली आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी वेळ पडल्यास सहकार नेत्याला बाजूला करण्याची तयारी आपण ठेवली पाहिजे, असे केंद्रिय कृषीमंत्री शरद पवारांचे मत आहे.

ज्या राज्यात एकपीकपद्धती आहे, तेथील शेतकरी तुलनेने गरीब आहेत. विशेषतः पश्चिम विदर्भातील शेतकरी वर्षातून एकच पीक घेतात. दुहेरी पीक घेण्यासाठी पाण्याची गरज असते. या भागातील पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात खाली गेल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. येथील शेती पारंपरिक पद्धतीने केली जाते. सिंचनात नवीन तंत्रज्ञान सहसा आढळत नाही. सिंचनाच्या सोयी कमी असल्यामुळे योग्य वेळी पिकाला पाणी मिळत नाही. परिणामी पीक कमी येते. काही वेळा बियाण्यांची प्रत चांगली नसते. भारनियमनामुळे शेतीला वेळेवर पाणी देता येत नाही. याशिवाय उन्हाळा कडक असल्याने उन्हाळी पिकेही घेता येत नाहीत.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या ज्या प्रदेशात सर्वाधिक प्रमाणात झाल्या, त्या विदर्भाचा अनुशेष इ.स. **१९८२** मध्ये ५२७ कोटी रुपयांचा होता. **१९९०** मध्ये तो **१५५०** कोटी रुपयांचा झाला. **१९९२** मध्ये **२५४७** कोटी, **१९९४** मध्ये **४२६५** कोटी, २००४ मध्ये १००३२ कोटी रुपयांचा झाला आहे. हा अनुशेष



आहे. मोठ्या शहरांकडे धाव घेणारा विद्यार्थी, शासनाच्या कृपेने निर्माण झालेले शिक्षणाचे बाजारीकरण आणि उपरोक्त उल्लेखित कारणांमुळे एकंदरीतच शिक्षणव्यवस्थेची दशा अत्यंत वाईट झाली आहे. यावर उपाय म्हणजे जागतिक स्तरावर टिकू शकतील असे विद्यार्थी घडविण्यासाठी प्राथमिक शिक्षणापासून सुरुवात करावी लागेल. पालकांनी आपला पाल्य कॉपीच्या भरवशावर पास करून त्याला जीवनात अपंग बनविण्याचे ध्येय सोडून द्यावे. आहेत त्या संस्थांना शासनाने अनुदान देऊन नवीन शिक्षण संस्थांना कदापि मान्यता देऊ नये. राजकारण्यांना या क्षेत्रापासून अलिप्त ठेवावे. दर्जेदार शिक्षण देणाऱ्या संस्थांचा गौरव व्हावा. शिक्षक व शिक्षणसंस्थांनी धर्म, जाती, गरीब-श्रीमंत अशा भेदभावापासून आणि राजकारणापासून स्वतःला दूर ठेवावे. नवनवीन आव्हानांना व शिक्षणातील नव्या प्रवाहांना स्वीकारत, व्यावसायिक शिक्षण ही काळाची गरज असल्याचे मान्य करूनही विद्यादान हा व्यापार नसून ती एक समाजऋणातून मुक्त होण्यासाठी दिली जाणारी सेवा आहे, ही भावना उराशी बाळगून शिक्षणसंस्थांनी, शिक्षकांनी स्वकष्टातून उद्याच्या उज्ज्वल भारताची दिशा आजच निश्चित करणे आणि त्यासाठी कळंबनगरीच्या प्रत्येक घटकाने सज्ज होणे ही तातडीची गरज आहे.

**(लेखन – मे २०११**
**पूर्वप्रसिद्धी – दै. लोकमत, सिंहावलोकन, तालुका विशेष पुरवणी, मे २०११)**

# शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक चिंतन

सकाळी सकाळी वृत्तपत्र उघडले की नजर जाते ती आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत वाढ झालेल्या आकड्यावर. कुठल्याही प्रगत किंवा प्रगतिशील राष्ट्रासाठी शेतकऱ्यांच्या आत्महत्या भूषणावह नसतात. गेल्या दीड-दोन वर्षांपासून या विषयावर सातत्याने चर्चा होत आहे. कर्जबाजारीपणामुळे ह्या आत्महत्या होत आहेत, यावर बहुतेकांचे एकमत आहे. कर्जबाजारीपणा, नापिकी, दुष्काळ आणि अतिवृष्टी यांव्यतिरिक्त घरगुती भांडणे, इस्टेटीचे वाद, मानसिक असंतुलन, दारू, मटका, जुगार आदींच्या आहारी जाणे अशी कारणे शेतकऱ्यांना आत्महत्येच्या निर्णयापर्यंत सहसा पोचवत नाहीत, असा काहीसा सूर आढळतो. एक मत असे आहे की, जागतिक व्यापार संघटना आणि अमेरिकेची मर्जी राखण्याच्या आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरू आहे. तथ्य काय? शेतकरी एवढ्या मोठ्या संख्येने आत्महत्या का करीत आहेत? का बरे गावकरी गाव विकायला काढल्याच्या किंवा किडनी विकण्याच्या जाहिराती करीत आहेत? या सर्व प्रकाराला जबाबदार कोण? शासन, सावकार, सहकारी पतसंस्था, बँका की खुद्द शेतकरी? अशा या विविध प्रश्नांची आणि उपाययोजनांची चर्चा करण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात केला आहे.

पीकपद्धती, सिंचनाची सोय, अर्थपुरवठा, शेतमालासाठी



बाजारपेठ, जोडधंदे आणि शासकीय मदत या गोष्टींशी शेतकरीजीवन निगडित असते. महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्रप्रदेश, पंजाब या राज्यांतही शेतकरी आत्महत्या करीत आहेत. सिंचनाची सोय नसणाऱ्या ओरिसात आणि राजस्थानात आत्महत्या नाहीत; पण केरळमध्ये भरपूर पाणी असताना व एक्याण्णव टक्के सिंचनाची सोय असणाऱ्या पंजाबसारख्या राज्यात आत्महत्यांचे प्रमाण अधिक आहे. यामागचे मुख्य कारण म्हणजे तेथील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा होय. त्या राज्यांमध्ये सरकारने अधिक प्रमाणात कर्जवाटप केले आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक आत्महत्या पश्चिम विदर्भात झालेल्या आहेत आणि हा पट्टा संत्रा, सोयाबीनपेक्षाही जास्त प्रमाणात कापूस उत्पादकांचा आहे. म्हणूनच कापूस उत्पादक शेतकऱ्याला या लेखाच्या अथवा शोधनिबंधाच्या केंद्रस्थानी ठेवूनच विविध मते मांडली आहेत.

महाराष्ट्रात शेतकऱ्यांना कर्जवाटप सहसा सहकारी संस्थांमार्फत होते. मात्र राष्ट्रीय बँकांनी मोठ्या प्रमाणात कर्जवाटप केल्याने सहकारी संस्था मोडकळीस आल्या. ग्रामीण भागात लहान शेतकऱ्यांना त्या कर्ज देऊ शकत नव्हत्या, म्हणून शेतकरी खाजगी सावकारांकडे वळले. तिथे त्यांची मोठी लूट झाल्याने त्यांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला. केंद्र सरकारने जिल्हा बँका बळकट करण्यासाठी प्राध्यापक वैद्यनाथन समिती नेमली. ह्या समितीने केलेल्या शिफारशींनुसार सोळा हजार कोटींपैकी तेरा हजार कोटी रुपये केंद्र सरकार तर उर्वरित तीन हजार कोटी रुपये राज्य शासन देणार आहे. अंमलबजावणी व्हायची आहे. सहकारी बँकांकडून मिळणाऱ्या

मोठ्या हिमतीने, आशेने, कष्टाने शेतात पेरणी करावी आणि निसर्गराजाने फटका द्यावा. कधी अतोनात पाऊस, तर कधी कोरडा दुष्काळ. आभाळातलं पाणी असं शेतकऱ्याच्या डोळ्यात पाणी आणतं. जिवापाड कष्ट करूनही पीक हाती आलं नाही किंवा अपेक्षेपेक्षा खूपच कमी आलं, तर त्याने बिचाऱ्याने घरातील मंडळींना काय खाऊ घालावे? आणि सावकाराचे कर्ज कसे फेडावे? त्याच्यापुढे शेवटचा पर्याय राहतो, तो आत्महत्येचा!

मुलांच्या, घरातील वृद्धांच्या किंवा पत्नीच्या अंगावर फाटकी लक्तरे पाहून तो विषण्ण होतो. अशातच मायबाप सरकारने खेडोपाडी दारूचे गुत्ते उघडून दिले आहेत. मग दुःख विसरण्यासाठी कुणीतरी या बापड्याला दारू दुकानाचा रस्ता दाखवतो आणि नंतर त्याच्या दुर्गतीला पारावारच उरत नाही. दारूच्या नशेत घरच्या बायकोमुलांना मारहाण, अद्वातद्वा शिविगाळ हे प्रकार नित्याचे होऊन जातात. अखेरीस जगण्याचा कुठलाही मार्ग सापडत नाही, म्हणून तो आत्महत्येला जवळ करतो.

शासनाकडून शेतीविषयक योग्य मार्गदर्शन गरीब शेतकऱ्यांना मिळत नाही. नवनवीन शेतीचे प्रयोग शेतकऱ्यांपर्यंत पोचत नाहीत. सामाजिक प्रदूषण, राजकीय कंत्राटदारी यांमुळे अनैसर्गिक दुष्काळासारखी स्थिती निर्माण होते. अडाणी, अशिक्षित शेतकरी परंपरेने माहीत असलेली पिके घेत असतो. त्याऐवजी त्याच्या शेतीत इतर काही लागवड करून अधिक उत्पादन मिळविणे शक्य आहे किंवा नाही, हे कृषी खात्यातील मंडळी सांगू शकतात; पण खेड्यापाड्यांतून अशा कार्यालयात काम करणारे तज्ञ सहसा



देण्यासाठी शासन कायमच उदासीन राहिले आहे. परिणामी सिंचनाविना किंवा अल्प सिंचनामुळे शेतकऱ्यांवरची संकटे वाढतच आहेत. आत्महत्या करणारे शेतकरी बहुतेक कोरडवाहूचे कास्तकार होते. ते कर्जबाजारीही होते. जलसिंचनाचा अनुशेष असणाऱ्या जिल्ह्यांतील होते. मात्र ज्यांची शेते जलसिंचनक्षेत्रात येतात, ज्यांच्या शेताच्या कडेने पाटाचे पाणी वाहते, त्यामुळे चाराही भरपूर उपलब्ध असतो, त्यांनी गाईम्हशी आपल्या दाराशी बांधल्या आहेत, दूधदुभत्यासोबतच शेणखताचीही उपलब्धता तेथे होते आहे, अशा शेतकऱ्यांच्या मनात आत्महत्येचा विचार येत नाही.

विदर्भ पांढऱ्या सोन्याचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. पश्चिम विदर्भातील कापूस हे प्रमुख नगदी पीक आहे. कापसाच्या जोडीला ज्वारी, तूर अशीही पिके घेतली जातात. कापसाची लागवड साधारणपणे जून महिन्यात केली जाते. सहा ते सात महिन्यांनी पीक हाती येते. परिणामी त्या जमिनीत रब्बी हंगामात दुसरे पीक घेता येत नाही. ज्वारीवर अवेळी पावसाचा आणि तुरीवर किडीचा बऱ्याचदा दुष्परिणाम होतो व पिके बुडतात, म्हणून ही पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जात नाहीत.

सद्यस्थितीत कापसाचा सरासरी उत्पादन खर्च सतरा हजार रुपये प्रती हेक्टर येतो. सरासरी उत्पन्न १५ क्विंटल प्रती हेक्टर इतके असते. म्हणजे शेतकऱ्याला एका हेक्टरला २५५०० रुपये मिळतात. म्हणजे प्रती हेक्टर तो ८५०० रुपये नफा कमावतो. साधारण शेतकऱ्याकडे दोन हेक्टरपेक्षा अधिक जमीन नसते. म्हणजे त्याचे वार्षिक उत्पन्न १७००० होते. म्हणजेच राब

राब राबूनही त्याचे मासिक उत्पन्न जवळ जवळ १४१६ रुपये इतके अल्प असते. यातून शेतकरी कर्जाचे व्याजतरी फेडू शकेल का?

**२००५–०६** या सत्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्येला आणखी एक कारण म्हणजे बी.टी. कॉटनमुळे काही प्रमाणात, काही भागात आलेली नापिकी होय. आंध्रप्रदेश सरकारने बी.टी. कॉटनवर बंदी घातली, तर महाराष्ट्रात शासनाने शेतकऱ्यांना बी. टी. कॉटन लावण्यास प्रोत्साहित केले. बी.टी. कॉटनच्या अपयशाने आंध्रप्रदेश सरकारने कोट्यवधी रुपयांचा दावा ठोकला. महाराष्ट्र शासनाने मात्र दीर्घकाळ पावले उचलली नाहीत. आत्ता कुठे बी. टी. कॉटन उत्पादक व लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झालेल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना या वर्षापुरती प्रती हेक्टर एक हजार रुपये दोन हेक्टर मर्यादेपर्यंत मदत जाहीर केली आहे. अंमलबजावणीला अजून अवकाश आहे.

अल्पस्वल्प जमीन असणारे गरीब शेतकरी - त्यातही कोरडवाहू शेती असली, तर नेहमीच अडचणीत येतात. शिक्षणाचा अभाव असल्याने शेतीत राबण्याशिवाय उत्पन्नाचे दुसने साधन नाही. कुटुंबनियोजनाची जाणीव नसल्याने दोनपेक्षा अधिक संतती असलेल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह २-४ एकर शेतीच्या भरवशावर होणे कठीणच! तरीही थोडेफार कष्ट करू शकणारे सगळेच स्वतःच्या शेतावर राबत असतात. गरिबीमुळे बीबियाणे विकत घेणे, नांगरवखर भाड्याने आणणे ह्यासाठी आणि शेतीच्या मशागतीसाठी पैसा लागतो. राष्ट्रीय बँका सहसा अशा शेतकऱ्यांना



कर्जाऊ रक्कम देत नाहीत. सहकारी बँका, पतसंस्था स्वतःचे हित पाहून भरपूर व्याज आकारून कर्ज देतात. येथेही शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेणारे टपून बसलेले असतात. कमी रक्कम शेतकऱ्याच्या हाती सोपवून जास्त रकमेच्या कर्जावर सही घेतली जाते आणि मग असे भरमसाठ वाढत गेलेले कर्ज व्याजासह फेडणे जवळजवळ अशक्य होते.

राष्ट्रीय बँका किंवा सहकारी संस्थांकडे कर्ज थकित झाल्यावर दीनवाणा शेतकरी खाजगी सावकराची पायरी चढतो. इथेही तो भरपूर नागवला जातो. कर्जाची रक्कम चक्रवाढ व्याजाने वाढत जाते. स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन शेतकरी जमेल तेवढी रक्कम व्याजापोटी सावकाराच्या खिशात घालतो, तरीही मुद्दल फिटत नाही. अखेरीस त्याची शेतीही सावकार हडपतो. मग शेतकऱ्याला मरण जवळ करण्याशिवाय पर्याय राहत नाही.

एकंदरीत शासकीय भ्रष्ट यंत्रणा, व्यापारी, दलाल, कारखानदार, लुटणाऱ्या सहकारी बँका, पतसंस्था, सावकार या सर्वांनी शेतकऱ्याला गुलाम बनवून त्याचा जगण्याचा हक्क हिरावून घेतला आहे. भूविकास बँका, सहकारी संस्था इत्यादींकडून कर्ज घेताना कर्ज घेण्यासाठी प्रत्येक टप्प्यावर शेतकऱ्याला लाच द्यावी लागते. मलिदा खाणारे सर्वत्र आहेत. कष्ट करणारा शेतकरी फक्त नागवला जातो. वैध सावकारीच्या नावाखाली व्याजाची रसीद दीड टक्क्यांची दाखवायची आणि बिनारसीद साडेतीन टक्क्यांनी वसूल करायचे. ह्या व्यवहाराकडे शासन दुर्लक्ष का करते?

आहे. शेतकऱ्यांकरिता जाहीर केलेल्या पॅकेजमध्ये कापूस उत्पादकांना अग्रीम बोनस देण्याची तरतूद नाही. त्यामुळे पुन्हा कर्जाचा डोंगर नव्या स्वरूपात उभा राहील. शेतकऱ्यांना लाचार समजून मदत दिली जाते, हक्क म्हणून नाही. शेतकऱ्यांच्या शेतमालाला हक्क म्हणून योग्य भाव दिल्या गेला पाहिजे.

निवडणुकीपूर्वी कापसाला २७०० रुपये प्रतिक्विंटल भाव देण्याची गोष्ट करणारे शासन केवळ १७०० रुपये भाव देऊन शेतकऱ्यांची मान कापत आहे. ठरावीक कालावधीत (१५ दिवस, महिन्याभरात) कापसाचे शंभर टक्के चुकारे देण्याचे राज्यशासन जाहीर करते; परंतु दिलेला शब्द कधीच पाळत नाही. जाहीर केलेली पॅकेजेस कागदोपत्रीच राहतात. माहितीच्या संकलनातच वर्ष वर्ष निघून जातात. कर्जवसुली मात्र जोरात सुरू असते.

यावर्षी म्हणजे २००५-०६ या सत्रात कापूस एकाधिकार खरेदी योजनेअंतर्गत अल्पप्रमाणात कापूस खरेदी झाली आहे. केंद्राच्या हमीभावाप्रमाणे कापूसखरेदीचा राज्यसरकारचा निर्णय आणि बाजारात कापसाला मिळणारा जास्त भाव यांमुळे शासकीय खरेदीत घट झाली आहे.

नुकत्याच काही शासकीय घोषणा करण्यात आल्या. नागपुरात दोनशे कोटींचे मार्केट टर्मिनल, त्यातून वैदर्भीय शेतकऱ्यांच्या मालाला विदेशात बाजारपेठ उपलब्ध होईल. सहकारी बँकांच्या पुनरुज्जीवनासाठी तेरा हजार कोटी रुपये, पश्चिम विदर्भात पाण्यासाठी केंद्राकडून पन्नास टक्के निधी मिळणार. अद्याप ह्या केवळ घोषणाच राहिल्या आहेत. अंमलबजावणी अजूनही नाही.



श्रीमंत शेतकऱ्यांची 'हाजी हाजी' करून स्वतःच्या खिशात अतिरिक्त रक्कम टाकण्याच्याच विचाराची असतात. आपल्याला ज्या कामासाठी पगार मिळतो ते काम इमानदारीने करावे, असे सध्याच्या काळात कोणत्याच खात्यातील अधिकाऱ्यांपासून कर्मचाऱ्यापर्यंत कुणालाही वाटत नाही. भ्रष्टाचार आणि लाचलुचपतीने सगळ्या माणुसकीचा धिंगाणा झाला आहे. भरपूर पैसे देईल त्या शेतकऱ्यालाच शासकीय योजनांचा लाभ देणारे हे अस्तनीतले निखारेही काही प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्येला जबाबदार आहेतच.

शेतमालाचे भाव वाढत असल्याची भीती दाखवत सरकार गहू आणि कापसाची आयात करीत आहे. त्यामुळे देशात शेतमालाचे भाव पडतात. रोजगार हिरावण्याचे हे शासनाचे धोरण आहे. जगात कुठेही मुक्त अर्थव्यवस्था नाही. ती आहे म्हणणे म्हणजे शुद्ध फसवणूकच म्हटली पाहिजे. डेन्मार्कमध्ये शेतकऱ्यांना एक गाय पाळण्यास वार्षिक अकरा हजारांचे अनुदान मिळते. अमेरिकेत कापूस उत्पादकांना भरपूर अनुदान दिले जाते. भारतात मात्र अनुदान देण्यात सरकार कुचराई करते. शेतमालाचे भाव कमी होत आहे, ही विसंगती थोपविण्यास शासन काहीच पावले उचलत नाही. यातूनच शेतकरी तोट्यात जातो.

आपल्याच शेतात निर्माण केलेल्या पिकाची बिजवाई काढून कमी खर्चाची बिजवाई वापरणाऱ्या शेतकऱ्याला महागडे संकरित बियाणे वापरावे लागते. घरचे दागदागिने गहाणात अडकल्याने मिळेल त्या भावात गोधन कसायास विकावे लागते. परिणामी शेणखत उपलब्ध होत नाही. संकरित बियाणांना रासायनिक

खतांशिवाय पर्याय नाही, असा प्रचार केला जातो. काही वेळा मजुरांचे अडेलतट्टू धोरण आणि पिकवलेल्या मालाला अल्प बाजारभाव अशा अनेक कारणांमुळे कर्जबाजारीपणाला सुरुवात होते.

मोजके धनदांडगे शेतकरी सोडले तर बहुतेकांना शेतीसाठी दरवर्षी कर्ज काढावे लागते. शेतीत सुधारणा करण्यासाठी मध्यम आणि दीर्घ मुदतीच्या कर्जाचीही आवश्यकता असते. ही कर्जे सहज उपलब्ध व्हावीत, ही शासनाची जबाबदारी असते. शेतीखर्च आणि शेतीकर्ज यासंदर्भात शासनाची धोरणे निश्चित असावयास हवीत; पण १९९० पासून अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप न करण्याचे धोरण सर्वच सरकारांनी स्वीकारल्याने आपली अर्थव्यवस्था जागतिक बाजारांवर सोपविल्या गेलेली आहे. भारतात चैनीच्या वस्तू शून्य टक्क्यांपासून सहा टक्के व्याजदरापर्यंत मिळतात. गृहकर्जासाठी किंवा गाडी घेण्यासाठी केवळ सात ते आठ टक्के व्याजदरात कर्जपुरवठा होतो. टाटा, बिर्ला, अंबानींसारख्या अनेक व्यावसायिक भांडवलदारांना नऊ टक्के व्याजदराने कर्ज मिळते. शेतीला मात्र १२ टक्क्यांपासून १८ क्वचित २२ टक्क्यांपर्यंतही व्याजदर सरकारी-गैरसरकारी संस्थांकडून वसूल केल्या जातो. याउलट बहुतेक विकसित देशांमध्ये शेतीला २ ते ३ टक्के व्याजदराने कर्जपुरवठा केला जातो. चीनमध्ये हा कर्जपुरवठा शून्य टक्के व्याजदराने होतो. विकसित देशात शेतीसाठी दररोज जवळ जवळ एक अब्ज डॉलरचे अनुदान दिले जाते. युरोपियन देशात शेतमालाच्या किमतीच्या ३१ टक्के अनुदान शेतकऱ्यांना दिले जाते आणि



आपल्या देशात दामदुपटीने कर्जवसुली केली जाते. पाश्चिमात्य देशात शेतकऱ्यांना खत, बीबियाणे यांवर अनुदान तर मिळतेच; पण पाऊस झाला नाही किंवा अतिवृष्टी झाली तरी अनुदान मिळते. सरकारने शेतमालाचा कमी भाव ठरवला, तरीही त्या भावावर अनुदान देऊन सरकार शेतमाल खरेदी करते. आपल्याकडे सगळेच उलटे आहे.

महाराष्ट्रातील शेतीकरिता केल्या जाणाऱ्या कर्जपुरवठ्याचे आकडे बघितले, तर लक्षात येते की पश्चिम आणि दक्षिण महाराष्ट्रात केला जाणारा कर्जपुरवठा विदर्भ आणि मराठवाड्याच्या तुलनेने जास्त आहे. वास्तविक पाहता तो प्रदेश सिंचनाने युक्त आहे, तेथे सुबत्ता आहे. विदर्भ, मराठवाडा सतत दुष्काळाने, अवेळी पावसाने किंवा अतिवृष्टीने ग्रासलेला असतो. म्हणूनच दुर्बल अधिक दुर्बल होत आहेत, मागासलेले अधिकच मागासत आहेत. हा बाजारी अर्थव्यवस्थेचा परिणाम आहे.

एवढा मोठा कापूस आपल्या प्रदेशात निर्माण होत असूनही जागतिक बाजारपेठेत भारत हा सर्वात मोठा कापूस आयातदार देश आहे. इ.स. २००० मध्ये ४८८०५ टन कापसाची आयात अमेरिकेतून भारतात झाली. दरवर्षी ही आयात वाढतेच आहे. जागतिक बाजारपेठेत कापसाचे भाव फार कमी झाले आहेत. तिथे मोठ्या प्रमाणात अनुदान मिळते; पण आपल्या देशातील विशेषतः कापूस उत्पादकाने जगावे तरी कसे, हाच प्रश्न निर्माण झाला आहे.

सध्याचे जागतिकीकरण मोठ्या शोषक देशांच्या सोयीचे

करताना मानवाधिकार आयोगाने राज्याचे मुख्य सचिव, वित्त विभागाचे प्रधान सचिव, सहकार सचिव, कृषी आयुक्त, अमरावती विभागातील महसूल आयुक्त, यवतमाळ पोलीस अधीक्षक आणि अमरावती ग्रामीण अधीक्षक इत्यादींना नोटीस बजावून उत्तर सादर करण्याचा आदेश दिला. या प्रशासकीय अधिकाऱ्यांपैकी केवळ अमरावती विभागीय आयुक्तांनी तातडीने फॅक्सने उत्तर पाठविले, दुर्दैवाने ते वाचता येण्याजोगे नव्हते, त्यामुळे पुन्हा विभागाला खास दूत पाठवून उत्तर सादर करण्यास सांगण्यात आले. यवतमाळ जिल्हाधिकारी व नागपूर विभागीय आयुक्तांनी अहवाल सादरीकरणासाठी पंधरा दिवसांचा अवधी मागितला. इतरांनी (हा लेख लिहीपर्यंत) उत्तर पाठविण्याची तसदी घेतली नाही.

अशा ह्या कर्जबाजारीपणातून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येत काही सुखवस्तू शेतकरीही शेतीच्या नावाने कर्ज घेतात आणि त्यातून कधी मुलीचे लग्न, कधी घरातील तेरवी, कधी वर्षश्राद्ध, कधी एखादा मोठा सण, कधी वाढदिवस भव्य प्रमाणात साजरा करून त्या कर्जाचा दुरुपयोग करतात. शेतीसाठी तो पैसा वापरलाच जात नाही. मग उत्पादन नाही, म्हणून कर्ज फेडणे शेतकऱ्याच्या जिवावर येते. शेतकऱ्यांची ही मानसिकता बदलणे आवश्यक आहे.

आपल्या देशात पुरेसे पीक असताना शेतकऱ्याला योग्य भाव न देता शासन त्या वस्तू आयात करते. कापसाचे भाव शासन कमी करते. व्यापारी, दलाल शेतकऱ्यांकडून अगदी



आजच्या शेतकऱ्यांत पूर्वीच्या कष्टकऱ्यांसारखी कष्ट करण्याचीही तयारी दिसत नाही. कमी श्रमात जास्त मोबदला मिळविण्याची हाव माणसाला अधोगतीला नेते. पूर्वी अर्धपोटी, उपाशी राहून राबणारा शेतकरी शासकीय मदतीविना, पॅकेजविना धान्याच्या राशी निर्माण करीत होता; परंतु लाचारीने जगत नव्हता. आज सहकारी बँकांनी किंवा वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थांनी दिलेल्या अपमानास्पद वागणुकीमुळे हा स्वाभिमानी शेतकरी हतबल झाला आहे. यांतूनही तो आत्महत्येचा पर्याय स्वीकारतो आहे. दुसरीकडे शेतकऱ्यांची तरुण मुले थोडासा शाळा-कॉलेजचा वारा लागला की इतर श्रीमंत विद्यार्थ्यांप्रमाणे स्वप्ने रंगवू लागतात. शेतीत कष्ट करण्याऐवजी पानाच्या टपरीवर, दारूच्या गुत्त्यावर, तीनपत्ती वगैरेच्या अड्ड्यावर रममाण होतात. त्यामुळे शेतकऱ्याला एकट्यालाच राबावे लागते. परिणामी उत्पादन वाढत नाही आणि शेती तोट्यात येते. पूर्वी शेतकऱ्यांच्या गरजा मर्यादित होत्या. आता शहरीकरणामुळे आणि अनुकरणामुळे ग्रामीण भागातील नवीन पिढीच्या गरजा वाढल्या आहेत. वडिलोपार्जित शेतीमध्ये विभाजन होऊन शेतीची दरडोई उपलब्धता कमी झाली आहे. परिणामी बरेच शेतकरी अल्पभूधारक झाले असून शेतीतून मिळणारे उत्पन्न त्यांना पुरत नाही, हा मुद्दाही लक्षात घेतला पाहिजे. काही वेळा सिंचनाकरिता, कालव्यांकरिता अथवा रस्ते-महामार्ग निर्माण करण्याकरिता शासनातर्फे, कालवे व पाटबंधारे विभागातर्फे शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या जातात. त्यांचा पुरेसा मोबदला दिला जात नाही आणि तोही वेळेवर कधीच

नाही. कितीतरी वेळा संदर्भित कार्यालयांच्या पायऱ्या चढल्यावर, वर्षानुवर्षांच्या कोर्टकचेऱ्या केल्यावर नाममात्र रक्कम मिळते.

शासनाकडून जाहीर झालेल्या पॅकेजेसमधून प्रत्यक्ष गरजवंत शेतकऱ्यापर्यंत त्यातील रक्कम कधीच पोचत नाही. ज्याप्रमाणे बँकांमधील किंवा सहकारी संस्थांमधील कर्मचारी अथवा सावकार कमी रक्कम कर्ज म्हणून देऊन अधिक रकमेवर त्याचा अंगठा घेतात, तसेच शासनाने शेतकऱ्यांना दिलेली मदत पोचविणारे कर्मचारी झारीतील शुक्राचार्याप्रमाणे आपापला वाटा काढून घेतात व फारच थोडी रक्कम शेतकऱ्याच्या हाती देऊन मदत केल्याचा गाजावाजा मात्र वृत्तपत्रांतून भरपूर करतात.

दुष्काळ दबक्या पावलांनी माणसांच्या आयुष्यात येतो आणि तो जीवन जगण्याची ऊर्मीच संपवतो. कोट्यवधी रुपये जलसंधारणासाठी येतात आणि आलेही; पण त्यांचा योग्य विनियोग होत नाही. ग्रामीण तरुण पानटपऱ्यांभोवती फिरतो. संपूर्ण गाव कर्जबाजारी असते; पण पैसा कुठे गेला हे कुणीच सांगत नाही.

शेतीची समस्या हा राज्यशासनाचा प्रश्न की केंद्र सरकारचा, यावरही कलह माजतात. अगदी मुख्यमंत्र्यांपासून केंद्रीय कृषीमंत्र्यांपर्यंत परस्परांना दूषणे देण्यात धन्यता मानली जाते. मंत्र्यांचे, आमदारांचे, खासदारांचे वेतन वाढविण्याकरिता, त्यांना दहा-दहा लाखांच्या गाड्या शासनाकडून मिळाव्यात म्हणून ही सगळी मंडळी एकत्र येतात. मग विरोधीपक्षासह सर्वांची अळी मिळी गुपचिळी! व्यक्तिगत स्वार्थासाठी उच्चपदस्थांची ही एकी वाखाणण्याजोगी आहे. ज्यांच्यासाठी किंवा ज्यांच्या मतांच्या भरवशावर



आपल्याला ही पदे मिळाली आहेत, त्यांचे काय हाल होत आहेत, हे बघायला कुणालाच फुरसत नाही. शासकीय अधिकारी किंवा कर्मचारीही प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावण्यापेक्षा वरचा मलिदा मिळविण्यात मशगूल असतात, हे आता छुपे रहस्य राहिले नाही. रोजच्या वृत्तपत्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्येबरोबरच विविध खात्यातील उच्चपदस्थांच्या भ्रष्टाचाराच्या बातम्या नाहीत, असा एकही दिवस जात नाही.

'गाव विकणे आहे', 'किडनी विकणे आहे' अशा प्रकारच्या जाहिराती जोर धरत आहेत. गुराढोरांच्या पाठीवरही 'विकणे आहे'चे फलक लागलेले दिसतात. राष्ट्रपतींकडे कर्जबाजारीपणामुळे इच्छामरणाची मागणी करणारे शेतकरीही आढळतात. किडनी विक्री केंद्राच्या उद्घाटनासाठी राष्ट्रपती, पंतप्रधान यांनाही निमंत्रण दिले गेले. या सर्वांतून शेतकरी जीवनाचेच नव्हे, तर संपूर्ण ग्रामीण भागातील विदारक, स्फोटक चित्र समोर येते. ग्रामीणांचे दुखणे, त्यांच्यातला असंतोष प्रकट करण्याकरिता त्यांनी निवडलेला हा प्रतिकात्मक मार्ग आहे. अशा जाहिरातींतून अगतिकपणे आत्महत्या करण्यापेक्षा भीषणतेविरुद्ध दंड थोपटून उभे राहण्याची उमेद प्रगट होताना दिसते. सर्व गाव एकत्र येत आहे. हिंसेऐवजी दुःख वेशीवर टांगण्याचा गावकऱ्यांचा हा मार्ग लोकशाहीला पोषक आहे; परंतु शासन त्याची नेमकी किती दखल घेते?

शेतकऱ्यांच्या आत्महत्येप्रकरणी मानवाधिकार आयोगाने बजावलेल्या नोटिशीला उत्तर देण्यातही प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दिरंगाई केली. नुकत्याच एका जनहित याचिकेवर सुनावणी

पेन्शन बंद करून शेतकऱ्यांना पेन्शन योजना लागू करावी. शेतकऱ्याला विक्रीव्यवस्थेचे आजही पुरेसे ज्ञान नाही. कृषी उत्पन्न बाजार समित्या असो किंवा व्यापारी व्यवस्था, शेतकरी कायम विक्रीबाबत परावलंबी राहिलेला आहे. स्वतःच्या उत्पादनाची किंमत त्याला ठरविता येत नाही. हे परावलंबित्व संपविण्यासाठी नव्या धोरणांचा विचार व्हावा. टर्मिनल मार्केटद्वारे शेतमाल थेट विदेशात जाणार असला तरी जागतिक उत्पादनाशी शेतकऱ्याला स्पर्धा करावी लागणार आहे, म्हणून मालाचा दर्जाही उत्तम राखण्याकरिता मार्गदर्शनाची गरज आहे. एकंदरीत, अशा उपाययोजना केल्या नाहीत तर आधीच दारिद्र्याने गांजलेला, कर्जबाजारी झालेला, फसवणुकीने आणि भ्रष्टाचाराने त्रस्त झालेला शेतकरी आत्महत्येपासून परावृत्त होणे कठीण आहे.

निसर्गानेच फटकारले तर शेतकरी काय किंवा शासन काय हतबलच ठरणार; पण अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना आवश्यक तेवढीच मदत करून पुन्हा उभारीने जीवन जगण्यास समर्थ करणे, ही शासनाची जबाबदारी निश्चितच आहे. मानवाधिकार आयोग शेतकऱ्यांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार बहाल करण्याचा प्रयत्न करीत आहे. पण शासनाने आता शेतकऱ्यांना वाळीत टाकणे थांबवले पाहिजे. नक्षलवाद्यांच्या चळवळीप्रमाणे शेतकऱ्यांची चळवळ हिंसक झाली तर? शेतकऱ्यांची मुले अतिरेकी झाली तर प्रथम ती भ्रष्टाचारी आणि कृतघ्न शासनकर्त्यांना भुईसपाट करून टाकतील.

भ्रष्टाचार समूळ नष्ट होण्यासाठी उच्चपदस्थांपासून सर्वांचीच



कवडीमोल भावात धान्य, भाजीपाला, कापूस खरेदी करतात आणि चढ्या भावाने विकतात. पर्यायाने ते शेतकऱ्यालाही नागवतात व सामान्य उपभोक्त्यांनाही लुटत असतात. ह्यावरही शासनाने अंकुश ठेवला पाहिजे. शेतकरी मेला, म्हणून लाख-दोन लाख रुपये दिले म्हणजे आपले कर्तव्य संपले, असे शासनाला वाटू नये. उलट अशी दिलेली रक्कम शेतकऱ्याचे नातेवाईक शेतीच्या कामासाठीच वापरतात, याबाबत लक्ष ठेवले पाहिजे आणि मृतांच्या नातेवाइकांना योग्य मार्गदर्शनही केले पाहिजे.

कापसासह विविध कृषीमालाची भाव ठरविण्याची पद्धत सदोष असून ती बदलणे गरजेचे आहे. कृषी उत्पादनांना मिळणाऱ्या भावात ७० टक्के शेतकऱ्यांचा काहीच फायदा होत नाही. सध्याची कृषीमालाची हमी भाव ठरविण्याची पद्धत कालबाह्य झाली आहे. विदर्भातील कापूस उत्पादकांना उत्पादनखर्च भरपूर असून अल्प भाव मिळतो. कापसाच्या भावाचा संबंध महागाईच्या निर्देशांकाशी जुळविल्या जावा. शेतमालाचे भाव ठरविताना पेरणीपासून कापणीपर्यंतचा शेतीचा खर्च तज्ज्ञांकडून मागविला जातो. छोट्या, मध्यम आणि मोठ्या शेतीखर्चाची माहिती संकलित केली जाते. कृषी मंत्रालयाच्या तज्ज्ञांकडूनही ही माहिती मागविली जाते. कृषीमालाच्या ग्राहकांचे हित पाहिले जाते. राज्यसरकार आणि कृषी विद्यापीठ यांचे हित पाहून देशाच्या अर्थव्यवस्थेच्या समतोलाचा संबंध राखून शेतीमालाचे भाव ठरविले जातात.

उसाला, द्राक्षाला, दुधाला भाव वाढवून मिळतो; पण कापूस उत्पादक शेतकरी कोरडाच राहतो. वैदर्भीय कापूसपट्ट्यातील

शेतकऱ्यांच्या आत्महत्या पाहता विशेष बाब म्हणून सरकारला अग्रीम बोनस जाहीर करता येऊ शकतो; पण विदर्भातले आमदार, खासदार, मंत्री यांना इथल्या शेतकऱ्यांच्या दुःखाशी काही घेणेदेणे नाही. इ.स. **१९७२** मध्ये राज्यात भयंकर दुष्काळ पडला होता. मुख्यमंत्रीपदी वसंतराव नाईक होते. गावात कोणी भुकेने किंवा आत्महत्येने दगावला तर पोलीसपाटलाला जबाबदार धरले जाईल, असे त्यांनी जाहीर केले होते. त्यांच्यानंतर शेतकऱ्यांचा, गरिबांचा, ग्रामीणांचा कळवळा असणारा एकही मुख्यमंत्री किंवा साधा आमदारही झाला नाही, हे महाराष्ट्राचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.

शेतकऱ्यांनी मनापासून कष्ट करण्याची तयारी ठेवली पाहिजे. शासनाकडून आणि समाजसेवकांकडून त्यांना वेळोवेळी योग्य मार्गदर्शन झाले पाहिजे. कृषी महाविद्यालये, जिल्हा परिषद, पंचायत समिती यांच्यामार्फत शेतकरी मेळावे घेऊन आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना दिली जावी. शेतीविषयक होणाऱ्या नवनवीन प्रयोगांची आणि योजनांची माहिती शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातच मिळाली तर सोयीचे होईल. त्यासाठी शेतकरी शिक्षित असणेही महत्त्वाचे. पदवी मिळवल्यानंतर शेतकऱ्यांची तरुण मुले शेतीत कष्ट करण्याऐवजी नोकरीसाठी शहरात धावतात. शेतीत कष्ट करून माझ्या ज्ञानाचा फायदा सर्वांना करून देईन, असा संकल्प तरुण शेतकऱ्यांनी केला पाहिजे. शेतकऱ्यांनी वर्षातून किमान दोन पिके घेतली पाहिजेत. सध्या सोयाबीनकडे वाढता कल आहेच. संत्र्याच्या मध्ये गहू पेरणारेही शेतकरी आता दिसू लागले आहेत. खरीप हंगामात गहू, हरभरा, भाजीपाला, फळे,



फुले अशी पिकेही घ्यावीत. कडक उन्हाळ्यामुळे वैदर्भीय शेतकऱ्यांसाठी शीतगृहे उभारण्यासाठी शासकीय अनुदान मिळावे, जेणेकरून शेतकरी उन्हाळ्यात भाजीपाला, फळे, फुले अशी पिके घेऊ शकतील. शासनाची मदत किंवा विविध योजना शेतकऱ्यांपर्यंत खऱ्या अर्थाने आणि पूर्ण लाभाने पोचल्या पाहिजेत. मध्यस्थांनी प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावणे आवश्यक आहे. बोगस बीबियाणे, निःसत्त्व खते किंवा फवारणीची औषधे यांबाबत गुन्हेगारांना मोठमोठ्या शिक्षा झाल्या पाहिजेत. शासनाने कापसाचा भाव वाढवून द्यावा. परदेशी कापूस भारतात येऊ नये, म्हणून आयात कर वाढवावा. बीबियाणे, खते, रसायने सवलतीच्या दरात शेतकऱ्यांना द्यावी. शेतकऱ्याच्या मालाचे पैसे हप्ते न पाडता एकरकमी व वेळेवर द्यावेत. सर्वप्रकारच्या कर्जाची माफी शासनाने करावी. विनामूल्य नाही; पण शेतीकरिता नाममात्र दरात भारनियमनाविना वीज पुरवावी. राजकीय नेत्यांनी समाजकारणावर जोर देऊन जनतेचे प्रश्न सोडवावे. सिंचनाच्या सोयी वाढवाव्यात. शेततळे, गावतलावांची निर्मिती व्हावी. कापसावर आधारित प्रक्रिया उद्योग - जसे जिनिंग, प्रेसिंग, सूतगिरणी इत्यादींमध्ये शेतकऱ्यांना सहभागी करावे, म्हणजे त्यातून मिळणारा नफा त्यांच्याही वाट्याला येईल. विमा योजना योग्य पद्धतीने राबविली जावी. शासकीय संस्थांनी, बँकांनी, सहकारी संस्थांनी आणि वैध सावकारांनी कर्जवसुली करताना संयम बरतावा. शेतकऱ्यांचे मनोधैर्य खचेल, असे कुठलेही पाऊल उचलू नये. मंत्री, आमदार, खासदारांसारख्या गडगंज इस्टेट जमा करणाऱ्यांचे

चालली आहे. परिणामी, दारू, सिगारेटी आणि मटकाजुगाराच्या आहारी गेलेली ही पिढी खऱ्या अर्थाने सुशिक्षित झाली आहे का? की केवळ साक्षरच झाली आहे, असा प्रश्न पडतो. स्वतंत्र भारतातील युवकांना पारतंत्र्यातील अन्याय-अत्याचारांची, कष्ट, दुःख, गरिबी यांची जाणीव नाही, हेही खरेच!

भारत स्वतंत्र होऊन अर्धे शतक झाले आहे. झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या तुलनेत नोकऱ्या निर्माण होणार नाहीत. नव्या पिढीला नव्या वाटा चोखाळाव्या लागतील, नव्या आव्हानांना सामोरे जावे लागेल. शासकीय नोकऱ्यांच्या अपेक्षा सोडून पुन्हा शेतीकडे वळावे लागेल. शासकीय योजना आणून आधुनिक तत्रज्ञानाने शेती व्यवसाय करावा लागेल. समाजाच्या विविध मागण्यांची पूर्तता करण्याकरिता नवनवीन उद्योगधंदे सुरू करावे लागतील. शासनाची सबसिडी, कर्ज हेतर मिळवावे लागतीलच पण जाहिराती आणि मार्केटिंगच्या नव्या वाटा चोखाळाव्या लागतील. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शासनाने बरोजगारीवर मात करण्यासाठी व्होट बँक राजकारण करीत नोकऱ्यांची खोटी आश्वासने देण्यापेक्षा युवापिढीला शेती, व्यवसाय आणि देशविधायक कार्यात समाविष्ट करून घेण्यासाठी सकारात्मक पावले उचलणे गरजेचे आहे.

**(लेखन — जुलै २००९**

**पूर्वप्रसिद्धी — दै. लोकदूत, यवतमाळ १५—८—२००९)**



मानसिकता बदलणे जरुरीचे आहे. अशावेळी राष्ट्रपती राधाकृष्णन, पंतप्रधान लालबहादूरशास्त्री आणि मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची प्रकर्षाने आठवण येते. आजच्या राज्यकर्त्यांत तशी माणसे दिसत नाहीत, याचे दुःख होते. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे भांडवल करून आपले उखळ पांढरे करणारी मंडळी पक्षोपपक्षात फार मोठ्या प्रमाणात वाढली आहेत. त्यांना आवर कोण घालणार? शरद पवार केंद्रीय कृषीमंत्री आहेत, त्यांच्यासारख्या जनसामान्यांची जाण ठेवणाऱ्या नेत्याकडून शेतकऱ्यांच्या फार मोठ्या अपेक्षा आहेत. ते आता कोणती पावले उचलतात, एवढेच बघायचे आहे.

**(लेखन — मार्च—एप्रिल २००६**

**पूर्वप्रसिद्धी — दै. हिंदुस्थान, अमरावती,**

**दि. १७—४—२००६)**

# स्वतंत्र भारतातील बेरोजगारीची समस्या

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात शासनाने शिक्षणप्रसारासाठी अनेक शिक्षण संस्था सुरू केल्या. खाजगी संस्थांना शाळा, महाविद्यालये चालविण्याची परवानगी दिली. प्रौढशिक्षणाचे वर्ग चालविले. समाज सुशिक्षित झाला की सुबत्ता त्यापाठोपाठ येते या अपेक्षेने शिक्षणाची साधने सर्वत्र पसरली.

अगदी खेड्यापाड्यांतून शिक्षणाच्या सोयी उपलब्ध झाल्या तरी प्रत्यक्षात खरे शिक्षण सर्वांनाच मिळत आहे, असे दिसत नाही. हजेरीपटांवर विद्यार्थ्यांची संख्या फार मोठी असते आणि प्रत्यक्षात उपस्थिती अगदी नाममात्रच असते.

अशा शिक्षणप्रणालीतून तयार झालेले, येनकेनप्रकारेण पदव्या प्राप्त करणारे युवक-युवती मोठ्या पगाराच्या व कमी श्रमाच्या नोकरीची अपेक्षा करतात. घरबसल्या करोडपती होण्याची स्वप्ने पाहतात. पूर्वी उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी हे जे समीकरण होते, ते आज उलट झाले आहे. शेतातील कष्ट नकोत, व्यापारातील अनिश्चितता नको, कायम सुरक्षित असलेली हलकी नोकरी असली तरी चालेल अशी अपेक्षा केली जाते.

वास्तविक अन्नधान्याची समस्या दिवसेंदिवस बिकट होते आहे. तरीही शासनाची उदासीनता, वीजेचे भारनियमन, नकली बियाणे, बोगस खते, सावकारी पाश, व्यापाऱ्यांची लूट आणि कष्टांच्या तुलनेत अत्यल्प मोबदला या कारणांनी वडिलोपार्जित



शेती विकून टाकणे किंवा त्याजागेवर प्लॉट्स पाडण्याकडे युवकांचा कल वाढला आहे.

नोकरी म्हणजे दुसऱ्याची ताबेदारी; परंतु महिन्याच्या अखेरीस ठरावीक रक्कम मिळण्याची शाश्वती म्हणून युवा पिढी नोकरीचा शोध घेते. एका एका जागेसाठी हजारोंनी अर्ज केले जातात. लाखो रुपयांचे डोनेशन देण्याची तयारी असते. शिक्षण घेतानाही डोनेशन आणि नोकरी मिळवण्यासाठीही डोनेशन. परिणामी आपल्या कार्यात ती व्यक्ती प्रामाणिक राहात नाही. नोकरी आहे म्हटल्यावर वधुपक्षाकडली मंडळी मुलांचे दोष-दुर्गुण न पाहताही मुली देऊन टाकतात. नोकरी करणारा जोडीदार मिळणे, हे आता भाग्याचे लक्षण समजले जाऊ लागले आहे.

व्यवसाय करण्याकरिता जवळ पैसा असावा लागतो. आता वित्तीय संस्था कर्जही देतात. पण तरुणांमध्ये धडाडी, हिंमत, रात्रंदिन कष्टाची तयारी आणि दूरदृष्टी असावी लागते. एका युवकाकडून व्यवसाय करणे कठीण वाटत असल्यास चार मित्र सहकारी मिळूनही व्यवसाय उभा करता येऊ शकतो. मात्र आज व्यवसाय टाकला आणि उद्याच विपुल पैसा मिळावा अशी अपेक्षा करणे मूर्खपणाचे लक्षण आहे. आत्मविश्वास, चिकाटी, जिद्द आणि श्रम यांवर व्यवसायातील यश अवलंबून असते.

स्वतंत्र भारतातील तरुणांमध्ये उपरोक्त गुणांची कमतरता आहे, असे खेदाने म्हणावे लागते. मोजके अपवाद सोडले तर पाश्चिमात्य संस्कृतीच्या अतिक्रमणामुळे युवा पिढी चैनविलासात रमणारी होत चालली आहे. चंगळवाद फोफावला आहे. खुर्चीवरचा साहेब होण्याची स्वप्ने पाहणारी ही पिढी नैराश्याकडे झुकत

खरंतर नॅकची अंमलबजावणी म्हणजे विविध अनुदानं मिळवून देण्याची प्रणाली नसून आणि अनुदानं कमी करण्याचं षडयंत्र आहे. ही योजना भारतीय तज्ज्ञांच्या सुपीक डोक्यातून बाहेर पडली नसून जागतिक दडपणाखाली पोखरल्या गेलेल्या निवडक मेंदूंतून उगम पावली आहे. जे देश विज्ञान, तंत्रज्ञान आणि आर्थिक दृष्टीने समृद्ध आहेत, त्यांचीच मक्तेदारी संपूर्ण जगतावर राहिली आहे. जगाचं अर्थकारण ते ठरवतात. त्यांच्या प्रभावामुळे व्यापारीक्षेत्र तर आपण केव्हाच मल्टीनॅशनल कंपन्यांच्या ताब्यात देऊन स्वत्व गमावून बसलो आहोत. आता महागडं झालेलं शिक्षणक्षेत्रही गमावण्याची वेळ आली आहे. ज्ञानदान, ज्ञानग्रहण हे शब्द आज शब्दकोशाला प्यारे झाले आहेत. शिक्षणक्षेत्राचं आता व्यापारीकरण झालं आहे. गुणवत्तेच्या निकषांचा भुलभुलैय्या दाखवून जागतिक बाजारपेठ नजरेपुढे ठेवणाऱ्या प्रगत राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय शिक्षणसंस्था व विद्यापीठांना भारतात प्रवेश मिळावा हा दूरगामी हेतू त्यामागे आहे. बदलती शिक्षणव्यवस्था किंवा नॅकद्वारे भारतीय शिक्षणक्षेत्राचे मूल्यमापन ही आपल्या देशवासीयांच्या दृष्टीने अभिनंदनाची बाब नसून वर्ल्ड बँक, वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन अशा जागतिक संस्थांच्या दबावाखाली सफाचट झालेल्या भारताचे दुर्दैव आहे.

नॅकला आता पर्याय नाही. नॅकला सामोरे जावेच लागेल. फारतर आंदोलनांच्या माध्यमातून शिक्षणक्षेत्रातील विविध संघटना मुदत वाढवून घेतील. आता आपल्या शिक्षणसंस्था कशा श्रेष्ठ आहेत, आपण किती जास्तीतजास्त दर्जेदार शिक्षणप्रणाली देऊ



# नॅकचे नखरे हजार
# नॅकची काळी बाजू

उच्चशिक्षणाची क्षेत्रे वाढत असतानाच उच्चशिक्षित बेरोजगारांची संख्या तितक्याच झपाट्याने वाढत आहे. दर्जाहीन आणि दिशाहीन शिक्षणप्रणालीने समग्र भारत ग्रस्त झाला आहे. अपुऱ्या साधनांसह आणि तुटपुंज्या वेतनावर काम करणारे पूर्वीचे व्यासंगी, निस्वार्थी शिक्षक आणि आर्थिक पाठबळ नसतानाही समाजसेवेच्या दृष्टीने उघडण्यात आलेल्या शिक्षणसंस्था काळाच्या ओघात गडप झाल्या आहेत. आज अर्थप्राप्ती हेच एकमेव ध्येय डोळ्यापुढे ठेवून शिक्षणसंस्था निर्माण होतात आणि त्याच उद्देशाने प्राध्यापकही या पेशात उतरतात. विविध अनुदानं लाटण्यासाठी निर्माण झालेल्या शिक्षणसंस्थांचा शैक्षणिक दर्जा जेव्हा जगाच्या तुलनेत कुठेच बसला नाही, तेव्हा यू.जी.सी.ला जाग आली आणि दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. त्यातूनच 'नॅक'सारख्या संस्थेचा जन्म झाला.

'नॅक' (NAAC) - नॅशनल असेसमेंट अँड ॲक्रिडिटेशन कौन्सिल (बँगलोर) म्हणजेच राष्ट्रीय मूल्यमापन व अधिस्वीकृती परिषद. देशातील उच्चशिक्षणाचा दर्जा सुधारावा, जागतिक स्तरावर गुणवत्ता सिद्ध व्हावी आणि देशातील उच्चशिक्षणावरील खर्च देशाच्या प्रगतीसाठी उपयोगात यावा अशा उद्देशाने नॅकची स्थापना झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर उच्चशिक्षणात संख्यात्मक वाढ पुष्कळ झाली; पण गुणात्मक वाढ फारशी झाली नाही. राजकारणी

मंडळींनी शिक्षणसंस्था लाटल्या, कमाई केली; पण विद्यार्थी घडवले नाहीत. नॅकमुळे उच्चशिक्षणाचा चेहराच बदलून जाणार आहे. भारतातील दोनशे ऐंशी विद्यापीठांमधून बारा हजार महाविद्यालयांतील तीन लाख पंचवीस हजार प्राध्यापकांद्वारे पंचाहत्तर लाख विद्यार्थी घडवायचे आहेत. उत्कृष्ट अध्यापन, संशोधन, सामाजिक विकास अशी शिक्षणाची अंगे विकसित करण्यासाठी नॅक प्रयत्नशील राहणार आहे.

हे स्वप्नाळू जग फार छान वाटतं. विद्यार्थी जीवनात त्याच्या पायावर उभा राहील, त्याच्या क्षेत्रात तो जागतिक दर्जाचा ठरेल, नॅकच्या प्रमाणीकरणानंतर यू.जी.सी.ची, इतर जागतिक संस्थांची आर्थिक मदत मिळेल, शिक्षण संस्थांना आणखी प्रगती करता येईल वगैरे वगैरे. पण या नॅकची काळी बाजू दुर्लक्षित करून चालणार नाही. शासनाची खेळी तपासायला हवी. डिसेंबर २००३ पर्यंत नॅकचे प्रमाणीकरण केलेच पाहिजे अन्यथा मिळणारी अनुदाने बंद होतील असा सूर शासन काढू लागले आहे. शासनाला शिक्षणाचा दर्जा वाढविण्याची खरंच इच्छा आहे का? की अनुदाने बंद करून पैसा वाचविण्याची ही शक्कल आहे?

**१९९४** साली दिल्लीत शासन आणि यू.जी.सी.ने विद्यापीठे आणि महाविद्यालयांसाठी नॅकचे प्रमाणीकरण लागू केले. **१९९९** मध्ये आपल्या भागात त्याची अस्पष्ट जाणीव होऊ लागली आणि यंदा 'नॅक' म्हणजे काय? हे शासनातर्फे अधिकृतपणे सांगण्यात आलं. इतकी वर्षे ज्या गोष्टीचा उल्लेखही शासनाच्या प्रतिनिधींनी शिक्षण संस्थांपुढे केला नाही, त्यांनी नॅकचे प्रमाणीकरण २००३



पर्यंत करून घेण्याचा फतवा काढून एक जबरदस्त चाल खेळली आहे. एकीकडे महाविद्यालयांची खिरापत वाटणे आणि दुसरीकडे अनुदानासाठी निधी नाही असे सांगणे या विदूषकी भूमिका नसून राज्यकर्त्यांचा तो डबल गेम आहे. तिजोरीत खडखडाट असण्याचे पालुपद आता शिळे झाले आहे; पण ते संपता संपत नाही. महाविद्यालयांचे वेतनेतर अनुदान कापले जाऊ लागले, पाचव्या वेतन आयोगाची भली मोठी रक्कम भविष्य निर्वाह निधीच्या नावाखाली तिजोरीतच गेली, वर्षानुवर्षांपासून नवीन शिक्षकांची भरती बंदच आहे. मग शासनाचा पैसा नेमका कशावर खर्च होतो? आता नॅकमुळे ज्या अनेक महाविद्यालयांची अनुदाने कमी होतील, त्यातून तिजोरी भरणार आहे का?

नॅकला महाविद्यालयात कायम प्राचार्य, प्राध्यापक नसले तरी चालतात. ते भरा, असं ते शासनाला सांगणार नाहीत. आहे त्यात महाविद्यालय किती छान चालवतात, याचं कौतुक ते करतील. फुकटात शिकवायला तयार असणारे गरीब बेरोजगार कॉंट्रिब्युटरी प्राध्यापक किंवा कॉंट्रॅक्ट बेसीसवरचे म्हणजेच ठेकेदारीने शिक्षण देणारे प्राध्यापकही चालतील. कारण शासनाचा पैसा वाचेल आणि शासनाचा आशीर्वाद 'नॅक' नावाच्या संस्थेला हवाच आहे, कारण तोपर्यंत त्यांचं जीवन आहे. नुकताच नुटासारख्या शिक्षक संघटनांनी ठेकेदारी शिक्षण पद्धतीचा शासनाचा प्रयत्न हाणून पाडला, ही अभिनंदनाची बाब आहे. शिक्षण क्षेत्रात ठेकेदारी पद्धतीतून कसे विद्यार्थी घडतील, याचा विचार नॅक करीत नाही, ही तितकीच लाजीरवाणी गोष्ट आहे.

सूचना देतील, असं जरी सांगण्यात येत असलं तरी ते शासनाला अहवाल देतील तेव्हा शासन अनुदान कापणारच. पुन्हा पाच वर्षांनी नव्याने नॅकच्या समितीला बोलावणं आलंच. पुन्हा तोच खर्च.

नॅकसाठी सेल्फ स्टडी रिपोर्ट, इतर कागदपत्र करताना संगणक, सीडीज, फ्लॉपीज, इंटरनेट अशा अत्याधुनिक यंत्रणांचा वापर करण्यावर जोर आहे. मेडिकल, इंजिनियरिंग, सायन्स महाविद्यालयांमध्ये ह्या सुविधा आहेत; पण ४-६ हजार लोकवस्तीच्या ग्रामीण भागातील झोपड्यांमधून साध्या टाईपरायटरवर काम चालवणाऱ्या महाविद्यालयांनी काय करावं? सुसज्ज ग्रंथालये, क्रीडांगणे, संगणक, प्रयोगशाळा, वसतिगृहे, उपहारगृहे, विविध कल्याणकारी योजना, वाहनतळ, वैद्यकीय सुविधा, स्टाफ रूम, लेडीज रूम, गेस्ट हाऊस, बगिचे अशा अपेक्षा व्यक्त करणाऱ्या नॅकच्या डोळ्यांपुढे खेड्यापाड्यांनी व्यापलेला भारत नसून अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रांतील संस्कृतीहीन, यांत्रिक युगाची शिक्षणव्यवस्था आहे, हे आंधळी व्यक्तीही सांगू शकेल. या सगळ्या पार्श्वभूमीवर लालूप्रसादांचा बिहार नॅकचे कसे स्वागत करतो, हा खरा संशोधनाचा विषय ठरावा.

शहरी आणि ग्रामीण महाविद्यालयांच्या मूल्यमापनाचे निकष वेगवेगळे आहेत, तुमच्याजवळ काय आहे? त्यात तुम्ही किती उत्तमप्रकारे शिक्षणव्यवस्था राबवली आहे? याचा विचार करून ग्रेडेशन केलं जाईल, असा दिलासा दाखवला जातो आहे. छत्तीसगढसारख्या मागासलेल्या राज्यातील दोन हजार वस्तीच्या



शकतो, ते आपण दाखवून द्यायला हवे. त्यामुळेच परदेशी शिक्षणसंस्थांना आपल्याला सीमेवर रोखता येईल. आणि जर राजकारण्यांच्या आशीर्वादाने त्यांचा प्रवेश भारतात झालाच तर त्यांच्या स्पर्धेतही आपण टिकलो पाहिजे.

आजच्या घडीला नॅक करायचे म्हणजे अनेक अडचणी आहेत. महानगरे वगळता सर्वत्र बारावीपर्यंतचं शिक्षण म्हणजे 'ओपन बुक सिस्टिम'चा उत्कृष्ट नमुना आहे. बारावीनंतर लगेच 'क्लोज बुक सिस्टिम' राबवणे सोपे नाही. विद्यार्थ्यांची अनुपस्थिती आणि सवलतीचे धनादेश घेण्यापुरते त्यांचे महाविद्यालयातील आगमन हा एक प्रश्न आहे. 'झेंडा टू झेंडा' महाविद्यालयांची संख्या अफाट आहे. नॅक समितीशी सर्व पत्रव्यवहार, कागदपत्रे आणि संभाषण दीडशे वर्षे राज्य करून आपला देश लुटून बदल्यात कायमचं पिलू देऊन गेलेल्या इंग्रजांच्या भाषेत करावा लागणार आहे. संस्थांच्या व त्या राज्याच्या मातृभाषेशी नॅकचा दुरान्वयानेही संबंध येणार नाही. बँगलोरच्या या संस्थेची जी समिती आपल्याकडे येईल, त्यात भारताच्या कानाकोपऱ्यातील सदस्य असतील. ते संख्येने ४-५ असतील. स्वतःला ते व्ही. आय.पी.पेक्षा कमी समजणार नाहीत. जवळच्या विमानतळावर ते उतरतील. पंचतारांकित हॉटेलमध्ये वास्तव्य करतील आणि वातानुकुलित मोटारीने रोज आपल्या महाविद्यालयात येतील. खरंतर समितीत त्याच राज्यातील तज्ज्ञ घेतले तर खर्च वाचू शकतो. पण ते भाऊबंदकी करतील अशी आपल्याच सदस्यांची भीती नॅकला वाटत असेल तर परप्रांतीयांनाही विकत घेता येणार

नाही का?

सर्वात महत्त्वाची समस्या म्हणजे आर्थिक समस्या. आज मेडिकल, इंजिनिअरिंग, टेक्निकल व काही विज्ञान महाविद्यालये वगळता कला, वाणिज्य महाविद्यालयांची स्थिती दयनीय आहे. शहरातील डोनेशनची परंपरा ग्रामीण भागात चालू शकत नाही. विद्यार्थी पकडून पकडून आणावे लागतात. शासनयंत्रणा व विद्यापीठे यांच्या भिन्न धोरणांमुळे आणि संदिग्ध जी.आर.च्या पायंड्यामुळे रोखली जाणारी अनुदाने, थोपवलेल्या नेमणुका आणि वेतनासंबंधीचे दुर्लक्षित प्रश्न यांमुळे संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यात कुठलाही ताळमेळ राहिलेला नाही. कुठलेही महाविद्यालय सुरळीत चालताना आज आढळत नाही. शिक्षण क्षेत्रातील मानसिक शांतता, संस्कार, प्रसन्नता लोप पावल्या आहेत. अशा पार्श्वभूमीवर नॅकचा खर्च ऐकताच हृदयरोग नसतानाही झटका आल्यास शिक्षणक्षेत्राशी संबंधितांना आश्चर्य वाटायला नको. नॅकची फी कला-वाणिज्य महाविद्यालयांसाठी पंचवीस हजार रुपये तर विज्ञान शाखा त्यासोबत असेल तर पन्नास हजार रुपये आहे. विद्यापीठांना हीच फी चार विभागापर्यंत पंचाहत्तर हजार रुपये व अधिकतम तीन लाख रुपये आहे. अमरावती विद्यापीठाला नॅक समितीने भेट दिली तेव्हा संपूर्ण विद्यापीठ रंगरंगोटी व सजावटीने सज्ज झाले होते. बिल क्लिंटनसाहेब भारतात आल्यावर त्यांच्या भेटीच्या स्थळांना जसं सजवलं होतं अगदी तसंच सजवलेलं विद्यापीठ पाहून शिक्षण संस्थाचालकांना आणि प्राचार्यांना 'अपून किस खेत की मुली है?' असा प्रश्न



निश्चितच पडला असेल.

नॅकची फी अनुदानपात्र आहे; पण इतर सगळा खर्च महाविद्यालयाने करायचा आहे. नॅक समितीच्या भेटीचा खर्च दीड लाखापर्यंत सहजच येईल. विमानखर्च, हॉटेल, टॅक्सी व खाण्यापिण्याचा खर्च अनुदानपात्र नाही. मग काही बुद्धिमान संस्थाचालक स्वतःच्या खिशाला खार लागू न देता प्राध्यापकांचे पगार कापून निधी उभारतील. साहजिकच प्राध्यापकांच्या मनात संस्थेबद्दल अनास्था निर्माण होईल. काही महाविद्यालयांनी गायक, नट-नट्यांचे कार्यक्रम करून पैसे गोळा करणे सुरू केले आहे. एका महाविद्यालयाने एक नाटक आणले. उद्देश हा होता की किमान पन्नास हजार रुपये जमा होतील. शेवटी हिशोब केल्यावर लक्षात आलं की महाविद्यालयाला दहा हजाराचा तोटा झाला.

काही तज्ज्ञ २-३ महाविद्यालयानी एकत्र नॅक समितीला आमंत्रित केलं तर खर्च वाटून घेता येतो असं सांगतात. पण एकाच वेळी मुल्यमापनासाठी ही महाविद्यालये सज्ज होतील का? नॅक समिती एवढे दिवस आपल्या प्रांतात राहील का? आणि झालेला खर्च सर्व महाविद्यालये मतभेद न करता वाटून घेतील का?

हे सगळे नॅकचे चोचले पुरवणं आहे. ही नॅकची काळी बाजू आहे. अनुदानं कमी करण्यासाठी शिक्षणसंस्थांचे नाक दाबायला नॅक तयार आहे. शिक्षणाचं व्यापारीकरण करताना नॅकचे नखरे हजार आहेत. नॅक तुमचा मित्र आहे, शत्रू नाही. तुमची तक्रार ते करणार नाहीत, फक्त तुम्हाला सुधारणेच्या

चालवीत असलेल्या महाविद्यालयांवर दोषारोपण करून त्यांना ९ जानेवारी, २९, ३० व ३१ जानेवारी २०१५ रोजी बैठकीसही बोलविण्यात आले होते. परंतु विद्यापीठाच्या आदेशांना केराची टोपली दाखवीत काही महाविद्यालयांनी आपली मनमानी सुरूच ठेवली. शेवटी विद्यापीठाने अशा महाविद्यालयांवर कारवाई करण्याचे ठरविले असून त्यात यवतमाळ जिल्ह्यातील कळंब येथील एका कॉलेज ऑफ सायन्सचा समावेश आहे.

या महाविद्यालयात कायम प्राचार्य, अधिकृत मान्यमाप्राप्त प्राध्यापक, कर्मचारी नाहीत. जे दूरदुरून प्रवेश झालेले विद्यार्थी दाखविण्यात येतात ते बहुतेक बोगस आहेत. कार्यकारी प्राचार्य म्हणून पात्रता नसलेल्या व्यक्तीची नियुक्ती केली आहे. घरबसल्या पदवी मिळवून देण्याच्या आमीषाने प्रवेश दाखवून त्यांची शिष्यवृत्ती उचलली जात आहे. प्रत्यक्षात स्वत:ची जागा नाही, इमारत नाही, प्राचार्य, प्राध्यापक, शारीरिक शिक्षण संचालक, ग्रंथपाल आणि विद्यार्थीही येत नाहीत, तरी विद्यापीठाचे संलग्नीकरण दरवर्षी अवैध मार्गाने मिळविले जाते. प्रात्यक्षिक परीक्षा केवळ कागदावर दाखविल्या जातात, येणारे अनेक बाह्य परीक्षक घरी बसूनच सह्या देतात आणि विद्यार्थी आपली शिष्यवृत्ती नेण्यापुरते आले की त्यातून भरपूर रक्कम कापून घेतली जाते. ही सर्व प्रकरणे विद्यापीठाच्या आणि शिक्षण सहसंचालकांच्या



एका खेड्यातील महाविद्यालयाला चार स्टार मिळाले असंही उदाहरण दिलं जात आहे. ते कसे? हा प्रश्न अनुत्तरीत आहे. पण येणारी समिती दूरच्या प्रांतातून येईल, विमानानेच येईल, तारांकित हॉटेल्समध्ये राहील, हसतखेळत महाविद्यालयाचे मूल्यमापन करील, फीसुद्धा सोडणार नाही आणि न चुकता शासनाला अहवाल पाठवील. अनुदान रोखण्यासाठी टपलेले शासन त्यातले सोयीस्कर मुद्दे उचलेल. महाविद्यालयांची स्थिती आणखी बिकट होईल. खेड्यातलं शेंबडं पोट्टं कावरून जाईल. मास्तरला शिव्या देईल. शिक्षण सोडून शेतीकडे वळेल. जागतिक शिक्षण संस्था भारतातील केवळ शहरांत धंदे सुरू करतील. प्रगत राष्ट्रांचा वरचष्मा कायम राहील. नॅक समितीतील व्ही.आय.पी. भारतभर विमानाने सहली काढत राहतील. शासन आणि नॅक यांची हातमिळवणी कायम राहील. अनुदानाअभावी संस्थाचालकांकडून बंद केल्या जाणाऱ्या खुराड्यांतून बाहेर पडणारे विद्यार्थी आणि प्राध्यापक सैरभैर होतील.

शिक्षण संस्थाचालकांना आपली संस्था नावारूपाला यावी, असं वाटतंय, प्राचार्यांना आपलं महाविद्यालय सर्वोत्कृष्ट ठरावं, असं वाटतंय, प्राध्यापकांनाही आपले विद्यार्थी सुसंस्कृत, सुशील, यशस्वी आणि जागतिक स्पर्धेत टिकणारे व्हावेत असं मनापासून वाटतंय. पण नॅकच्या धंदेवाईक धोरणाने सगळ्यांची स्वप्ने बेचिराख करून टाकली आहेत. आता फक्त दर पाच वर्षांनी नॅक करायचे, त्यासाठी प्राध्यापक, विद्यार्थी आणि परिसरातील दात्यांकडून देणग्या मिळवायच्या. त्यासाठी आवश्यक तर वाममार्गांचा

अवलंब करायचा. अवैध मार्गाने विद्यार्थ्यांचे निकाल वाढवायचे आणि जास्तीतजास्त अनुदानं लाटण्याचे प्रयत्न चालवायचे असं चित्र दिसायला वेळ लागणार नाही.

ଔଔଔ

(लेखन – सप्टेंबर २००२

पूर्वप्रसिद्धी – दै. लोकसत्ता, विदर्भरंग पुरवणी, नागपूर, दि. २५–१०–२००२

दै. तरुण भारत, नागपूर, दि. २३–१०–२००२)



# कारणे दाखवा नोटिशीला प्रतिसाद न देणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई

यूजीसी व शासनाच्या निकषांनुसार महाविद्यालये चालवत नसल्याने व केवळ कागदावर अस्तित्व असल्याने अमरावती विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या बऱ्याच महाविद्यालयांवर कारवाईची शिफारस करण्यात आली आहे.

बंद करण्यात येणारी आणि कारवाईला सामोरी जाणारी ही सर्व डबघाईस आलेली कायम विनाअनुदानित तत्त्वावरील महाविद्यालये असून पात्रताधारक प्राचार्य व प्राध्यापक न भरणे किंवा त्यांचे वेतन न देणे, आरक्षण निर्धारण न करणे अशा प्रमुख कारणांमुळे ती बंद करण्याची मागणी फार पूर्वीची होती. या संदर्भात दि. २९ मार्च २०१४ च्या सिनेट सभेत विद्यापीठाद्वारे स्थापन झालेल्या डॉ. व्ही.आर. देशमुख समितीने १२ महिन्यात १८ बैठका घेत अहवाल तयार केला आणि सिनेटच्या अखेरच्या बैठकीत त्यांच्या शिफारशी स्वीकारण्यात आल्या.

गेल्या वर्षभरात चौकशी समितीने वारंवार या महाविद्यालयांना चौकशीसाठी बोलाविले व त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. पदे न भरता केवळ कागदावर महाविद्यालये

केलेले आरोप निराधार असून त्याचा शासननिर्णयानुसार अनुदानाशी काही संबंध नसल्याचे सांगितले. त्यानुसार न्यायमूर्तीद्वयांनी शासनाचा निर्णय योग्य ठरवत जुन्या महाविद्यालयालाच विज्ञान शाखेचे अनुदान राहील असा निर्णय दिला.

या निर्णयामुळे जुन्या सर्व महाविद्यालयांना दिलासा मिळाला असून अनुदान व शिष्यवृत्तीच्या लालसेने सुरू झालेल्या कामचलावू आणि कागदावरच्या नवीन विज्ञान महाविद्यालयांना दणका बसला आहे. अशी नवीन कितीतरी महाविद्यालये बंद पडली असून काहींवर विद्यापीठाची कारवाई सुरू आहे. अमरावती विद्यापीठाच्या अखेरच्या अधिसभेतही काही महाविद्यालये बंद करण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झाले आहे. या निर्णयाने उठसुठ उच्च न्यायालयात जाऊन शासन, विद्यापीठ आणि जुन्या महाविद्यालयांना विनाकारण त्रास देण्याच्या प्रवृत्तीला चाप लागण्यास मदतच होणार आहे.

(लेखन — जानेवारी २०१५
पूर्वप्रसिद्धी — यवतमाळमधील विविध वृत्तपत्रांतून बातमीस्वरूपात मार्च—एप्रिल—मे २०१५)



लक्षात आलेली असून या संदर्भात गेल्या काही वर्षांपासून अनेक सामाजिक संस्था व विद्यार्थी संघटनांद्वारे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यावर आता विद्यापीठ व शासन काय निर्णय घेते व हे सर्व गैरप्रकार पाहता कडक निकषांच्या आधारावर पुढील सत्रापासून विद्यापीठ प्राधिकारिणी ही महाविद्यालये बंद करणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

(लेखन — जानेवारी २०१५
पूर्वप्रसिद्धी — यवतमाळमधील विविध वृत्तपत्रांतून बातमीस्वरूपात फेब्रुवारी २०१५)

# कामचलावू महाविद्यालयांना उच्च न्यायालयाचा दणका

नुकत्याच एका निर्णयात मा. उच्च न्यायालयाने ४ फेब्रुवारी २००८ च्या शासन निर्णयानुसार जुन्या अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांना विज्ञान शाखेसाठी देण्यात आलेले अनुदान योग्य असल्याचा निर्वाळा देत अनुदान लाटण्यासाठी मोठ्या प्रमाणावर उघडण्यात आलेल्या नव्या कामचलावू विज्ञान महाविद्यालयांना दणका दिला आहे.

मध्यंतरीच्या काळात निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणावर विज्ञान महाविद्यालये वाटप करण्यात आली होती. ही महाविद्यालये ज्या शासन निर्णयानुसार सुरू करण्यात आली तो ४ फेब्रुवारी २००८ चा निर्णय ज्या ठिकाणी एक किंवा दोन विद्याशाखा अस्तित्वात आहेत, अशा तालुक्यांना प्राधान्याने जुन्या महाविद्यालयांना अनुदानित विज्ञान शाखा सुरू करण्यास परवानगी देणारा होता. मात्र काहींनी वेगळी विज्ञान महाविद्यालये सुरू करून शासनाची शिष्यवृत्ती हडपणे सुरू केले होते. त्याच बरोबर अनुदान मिळावे म्हणून अशा डझनभर महाविद्यालयांनी मा. उच्च न्यायालयात शासन, विद्यापीठ आणि पूर्वी अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांच्या विरोधात याचिका दाखल केल्या होत्या. मात्र अशा



विविध याचिकांचे निकाल लागणे सुरू झाले असून मा. उच्च न्यायालयाने शासनाचा निर्णय योग्य ठरवत जुन्या महाविद्यालयांनाच अनुदान सुरू राहील असे स्पष्ट केले आहे.

या संदर्भात शिवाजी शिक्षण संस्थेच्या नांदुरा येथील पुंडलिक महाराज महाविद्यालयाच्या विरोधात वर्धमान जैन शिक्षण संस्थेने रिट पेटिशन ५०५३/२०१३ अन्वये उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्या. भूषण धर्माधिकारी आणि न्या. सुनील शुक्रे यांच्या खंडपीठाने शासनाची भूमिका योग्य ठरवत जुन्या महाविद्यालयालाच विज्ञान शाखेचे अनुदान कायम राहील असा निर्णय दिला. सदर अनुदान हे महाविद्यालयांची संपूर्ण तपासणी, टास्क फोर्स समोरील प्रेझेंटेशन, इमारती व जागा, भरलेली प्राचार्य, ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालक, प्राध्यापकांची पदे, नॅक मूल्यांकन या सर्व बाबींचा विचार करूनच देण्यात आले होते. अपिलकर्त्याच्या वतीने अॅड. डी.आय. जैन यांनी अनेक मुद्दे मांडून न्यायालयापुढे बाजू मांडली; परंतु शासनाच्या वतीने अॅड. श्रीमती टी. खान यांनी हे अनुदान शासन निर्णयानुसार व संपूर्ण तपासणीअंती दिले असल्याचे निदर्शनास आणून दिले. अॅड. पी.बी. पाटील यांनी शिवाजी शिक्षण संस्था व पुंडलिक महाराज महाविद्यालयाच्या वतीने बाजू मांडताना याचिकाकर्त्याने

असल्याने जाहीररीत्या आवाहन करून सर्व याचिकाकर्त्यांना व या संदर्भात न्याय मागू इच्छिणाऱ्यांना पुरेशी संधी देऊन त्या एकत्रित करून मुंबई उच्च न्यायालयाचा एक विशेष बेंच तयार करावा व पुढील सहा महिन्यात निकाल लावावा. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने प्रभावित झालेल्या सर्व व्यक्तींना मुंबई उच्च न्यायालयाच्या या बेंचपुढे अंतरिम आदेशासाठी जाण्याची मुभा दिली आहे, जेणेकरून सर्वांना समान न्याय मिळेल, असेही न्यायमूर्तींनी म्हटले.

यूजीसीने निकषांनुसार पीएच.डी.धारकांकरिता नेट–सेटमधून सूट दिल्यानंतर देशभरातील बहुतेक विद्यापीठांनी त्याची अंमलबजावणी केली. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची पीएच.डी. ही निकषांनुसारच असल्याने तत्कालीन कुलगुरू डॉ. कमलसिंह यांनी डायरेक्शन काढून जुन्या–नव्या सर्व पीएच.डी.धारकांना मोठा दिलासा दिला होता. आता १६ मार्चच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने जी संभ्रमावस्था आणि समस्या निर्माण झाली होत्या त्यावर यूजीसीने मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडे एक प्रस्ताव पाठवला आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की न्यायालयाचा आम्ही सन्मान करतो; परंतु तत्कालीन नियमानुसार लागलेल्या सदर प्राध्यापकांच्या भविष्याच्या तरतूदीची जबाबदारीही येऊन पडते. २००९ पूर्वीच्या जुन्या पीएच.डी.धारकांना ६ वर्षांनंतर नेट लागू



# पीएच.डी.प्राप्त आणि नेटसेटग्रस्त प्राध्यापकांना सर्वोच्च न्यायालयाचा तात्पुरता दिलासा/ २००९ पूर्वीच्या पीएच.डी. प्राप्त प्राध्यापकांना नेटसेटमधून सूट देण्यासंबंधी यूजीसीचा प्रस्ताव

प्राध्यापक पदाच्या अर्हतेसंबंधी सुरू असलेल्या उलटसुलट चर्चेला सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने तात्पुरती विश्रांती दिली आहे तर २००९ पूर्वीच्या आचार्य पदवीधारकांना व नोंदणीधारकांना नेटसेटमधून सूट देण्यासंदर्भात यूजीसीने मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडे प्रस्ताव पाठविला आहे. त्यामुळे पूर्वीप्रमाणेच तूर्तास आचार्य पदवीधारक आणि नेट, सेट उत्तीर्ण असलेले उमेदवार प्राध्यापक पदासाठी पात्र ठरले आहेत. तसेच नेट, सेट उत्तीर्ण न झालेल्या प्राध्यापकांवरचे संकटही तात्पुरते दूर झाले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती पी.एस. ठाकूर आणि न्यायमूर्ती जे.एफ. नरिमन यांनी दि. १६ मार्च २०१५ रोजी पी. सुशीला, चेन्नई, राजस्थान आणि

इतरांनी २०१० पासून २०१३ पर्यंत दाखल केलेल्या व विविध राज्य शासनांनी दाद मागितलेल्या नेट, सेट, पीएच.डी. संदर्भातील याचिकांना एकत्रित करून निकाल दिला. या निर्णयाने देशभरातील लाखावर प्राध्यापक प्रभावित झाल्याने विविध राज्यांतील प्राध्यापक व संघटनांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले होते. हे सर्व संदर्भ तपासून महाराष्ट्राच्या सिव्हिल अपिल १०७५९ चा निकाल देताना अशा सुमारे शंभरावर याचिका एकत्र करून मुंबई उच्च न्यायालयाचे एक वेगळा बेंच स्थापन करून पुढील सहा महिन्यात निकाल लावण्याचे आदेश मा. सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

अलाहाबाद उच्च न्यायालय व इतर काही उच्च न्यायालयांनी २००९ पर्यंत पीएच.डी. झालेल्यांना नेट–सेटमधून सूट दिली होती. २००९ मध्ये प्राध्यापक पदासाठी नेट, सेट किंवा विहित पद्धतीनुसार पीएच.डी. ही पात्रता ठरविण्यात आल्याने त्यानंतरच्या पीएच.डी. धारकांना समस्येला फारसे तोंड द्यावे लागले नव्हते. २०१३ पर्यंत नेट–सेट नसलेल्यांना त्यांच्या सेवा नियमित करून सेवेत लागल्यापासून सर्व लाभ देण्याचे विविध उच्च न्यायालयांनी सांगितल्याने काही राज्य शासनांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. पी. सुशीला आणि इतर या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात यूजीसी, विविध राज्य सरकारांनी अनेक विरोधाभासी मुद्दे मांडल्याने



न्या. नरिमन यांनी पीएच.डी.धारकांना सूट नाकारत २००९ पूर्वीच्या प्राध्यापकांनाही नेट–सेट द्यावी लागणार व यापुढेही नेट–सेट ही पात्रता राहील आणि यूजीसीची भूमिका शासनविरोधात नसावी असे म्हटल्याने मनुष्यबळ विकास मंत्रालय, यूजीसी व देशभरातील उच्च शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली होती. यूजीसीला पात्रता ठरविण्याचा अधिकार नाही असेही न्यायालयाने म्हटले होते.

आशा रामदास बिडकर, एमफुक्टो आणि इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन यांच्या २०१३ च्या सर्वोच्च न्यायालयातील सिव्हिल अपिल याचिका क्र. १०७५९ संदर्भात अनेक पैलूंचे अध्ययन केले गेले. प्रत्येक राज्याप्रमाणे महाराष्ट्रातही मोठ्या प्रमाणावर नेट–सेटग्रस्त प्राध्यापक आहेत. काही विशिष्ट प्रवर्गातील नेट–सेट उत्तीर्ण होण्याचे प्रमाण सर्वाधिक असून अन्य प्रवर्गातील निकाल नगण्य असल्याने या परीक्षेसंदर्भात एक मोठी नाराजी प्राध्यापकांमध्ये आहे. २५ मार्च २०१५ रोजी न्या. विक्रमसेन यांनी या याचिकेचा निकाल देताना सांगितले की अशा शंभरावर रिट याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठात प्रलंबित आहेत. नुकताच जो विवादास्पद निकाल आला त्यामुळे ज्यांना फायदा झाला आहे, त्यांना लगेच नुकसान होऊ नये, तसेच या सर्व याचिका मूळ मुद्द्याशी निगडित

कळंब तालुक्यात डझनावर कनिष्ठ महाविद्यालये असून शिवशक्ती कनिष्ठ महाविद्यालय, कोठा, चिंतामणी कनिष्ठ महाविद्यालय, कळंब व इंदिरा महाविद्यालय, कळंब ही अनुदानित महाविद्यालये आहेत. शिवशक्ती कनिष्ठ महाविद्यालय व चिंतामणी कनिष्ठ महाविद्यालय शाळेची जोडले असल्याने दहावीचे विद्यार्थी त्यांच्याच महाविद्यालयात ११ वीत प्रवेश घेतात. मात्र इंदिरा महाविद्यालय हे वरिष्ठ महाविद्यालयाशी जोडले असल्याने अजूनही या महाविद्यालयात मोठ्या प्रमाणावर ११ वी व १२ वीच्या प्रवेशाच्या जागा रिक्त आहेत.

नवीन महाविद्यालये व तुकड्या वाटपाने अनुदानित तुकड्या तुटल्यास, येथील शिक्षक अतिरिक्त ठरल्यास त्याची जबाबदारी शासन व शिक्षण विभागाची राहील, ही भूमिका मांडण्यासाठी शिक्षक संघटनांनी प्रयत्न सुरू केले आहेत. मात्र केवळ एक आठवडा प्रवेशासाठी शिल्लक असताना अनुदानित महाविद्यालयांनी विद्यार्थी शोधत कुठे कुठे फिरावे, हा प्रश्न मात्र आजच्या घडीला अनुत्तरीतच राहिला आहे.

**(लेखन – फेब्रुवारी २०१५**
**पूर्वप्रसिद्धी – यवतमाळमधील विविध वृत्तपत्रांतून बातमीस्वरूपात जून २०१५)**



**करणे तर्कसंगत नाही. गेल्या सहा वर्षांत अनेक महिला प्राध्यापकांवर कौटुंबिक जबाबदाऱ्या येऊन पडल्या आहेत. लागलेल्या प्राध्यापकांचे वय वाढले आहे. त्यांना एक संधी दिली पाहिजे. हा निर्णय लागू करायचा झाल्यास प्राध्यापकपदाची पात्रताच बदलावी लागेल. शिवाय सर्व राज्यांमध्ये अशा नेटसेटग्रस्त प्राध्यापकांकडून वेतन वसुलीही कठीण जाणार आहे. काही प्राध्यापक निवृत्त झाले आहेत. अनेक वर्षांपासून नोकरीत असलेल्या व प्रोबेशनरी पिरेड पूर्ण केलेल्या प्राध्यापकांच्या सेवांवरच संकट येईल. परिणामी न्यायालयीन प्रकरणे आणखी वाढतील.**

**गेल्या काही वर्षांत महाराष्ट्र शासन आणि प्राध्यापक व प्राचार्य संघटनांमध्ये संबंध ताणले गेले आहेत. परीक्षांवरील बहिष्कार, शासनाच्या सचिवांना न्यायमूर्तींनी दिवसभर उभे राहण्याची दिलेली शिक्षा, चर्चा व तडजोड न होणे अशा कारणांनी शासनाचे प्रत्येक पाऊल प्राध्यापक, प्राचार्य व संस्थाचालकांच्या विरोधातच गेले. शासन बदलले तरी मंत्रालयातील अधिकारी वर्ग फारसा बदललेला नाही. त्यामुळे शासनाकडून फारशी अपेक्षा संघटनांनी ठेवलेली नाही. मात्र यूजीसीचा अभ्यास दांडगा असल्याने पुढे येणाऱ्या असंख्य समस्यांची चाहूल घेत त्यांनी मनुष्यबळ विकास मंत्रालयाला प्राध्यापकांच्या हिताचाच प्रस्ताव दिला आहे.**

या सर्व पार्श्वभूमीवर गेल्या एक दशकापासून चालू असलेल्या प्राध्यापकांच्या नेट–सेट–पीएच.डी. संदर्भातील भिजतघोंगडे आणखी काही महिने असेच राहील आणि न्यायालयीन निर्णयाने प्रभावित झालेल्या असंख्य प्राध्यापकांना मा. उच्च न्यायालयाच्या विशेष बेंचचा निकाल लागेपर्यंत प्रत्येक दिवस भविष्याचा विचार करीत मानसिक तणावाखालीच काढावा लागेल, असे दिसते.

(लेखन – फेब्रुवारी २०१५
पूर्वप्रसिद्धी – यवतमाळमधील विविध वृत्तपत्रांतून बातमीस्वरूपात मार्च–एप्रिल–मे २०१५)



# कनिष्ठ महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या शोधात

कायम विनाअनुदानित नवीन कनिष्ठ महाविद्यालयांना व अनेक अतिरिक्त तुकड्यांना मान्यता मिळाल्यामुळे अनुदानित महाविद्यालयांवर विद्यार्थ्यांचा शोध घेण्याची पाळी आली आहे. त्यातही ग्रामीण भागात कितीतरी परीक्षा केंद्रे वाटप केल्याने उत्तीर्णतेची हमी देणाऱ्या महाविद्यालयात प्रवेश घेण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढल्याने यवतमाळातील नामवंत अनुदानित महाविद्यालयांमध्ये अजूनही ११ वी व १२ वीची विद्यार्थीसंख्या पूर्ण होऊ शकलेली नाही.

या वर्षी यवतमाळ जिल्ह्यातील ३० हजार **६३८** विद्यार्थी दहावीत उत्तीर्ण झाले. मूळातच जिल्ह्याची प्रवेश क्षमता ३१ हजार **३८०** इतकी होती. त्यात आणखी अतिरिक्त तुकड्यांचे वाटप झाल्याने अनुदानित महाविद्यालयांवरच सक्रांत कोसळली आहे. खेड्यापाड्यात शाळांना जोडलेली काही कायम विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालये परीक्षा केंद्र मिळवणे, विद्यार्थ्यांकडून ठरावीक रक्कम घेऊन उत्तीर्णतेची हमी देणे, त्यासाठी आपल्या तात्पुरत्या लावलेल्या शिक्षकांना कामी लावणे, यामध्येच अडकलेली आहेत. जुन्या अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक वर्ग प्रतिष्ठेमुळे अशा अवैध मार्गाकडे वळू शकत नसल्याने अशा महाविद्यालयांची विद्यार्थीसंख्या झपाट्याने रोडावत असून त्यांच्यावर प्रवेशासाठी जाहिराती करण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

# रॅगिंग टाळता येणे सहज शक्य

केंद्र सरकार, विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्य शासन उच्च शिक्षण संचालनालयाने रॅगिंगविरोधी कायदा करून एक कार्यप्रणाली विकसित केली आहे. २००९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने त्यावर शिक्कामोर्तब केले आहे. त्यानुसार प्रत्येक महाविद्यालयामध्ये 'अॅन्टी रॅगिंग सेल'ची स्थापना करणे अनिवार्य असते. निकटतम पोलीस स्टेशनमधील अधिकाऱ्यांचाही त्यात समावेश असतो. दरवर्षी विविध ठिकाणी शासनाच्या वतीने या संदर्भात कार्यशाळा आयोजित केल्या जातात व महाविद्यालयीन प्रशासनाला तिथे उपस्थित राहणे अनिवार्य असते. प्रत्येक महाविद्यालयात या विषयावर दरवर्षी कार्यक्रम आयोजित केले जातात, जेणे करून कोणत्याही उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थेत रॅगिंगसारखे घृणास्पद प्रकार होऊ नयेत. असे असले तरी दरवर्षी सुमारे चार ते पाच हजार रॅगिंगच्या तक्रारी शासकीय संकेतस्थळावर नोंदविल्या जातात.

आज अनेक महाविद्यालयीन तरुण–तरुणी रॅगिंगला बळी पडतात व मानसिक तणावापोटी काही विद्यार्थी आत्महत्या करतात. अभ्यासाच्या प्रचंड तणावातून बाहेर पडण्यासाठी मनोरंजनाचा काहीसा भाग म्हणून, गंमत म्हणून किंवा फ्रेंडली रॅगिंग म्हणून सुरू झालेला प्रकार गंभीर स्वरूप घेतो आणि तोंड दाबून बुक्क्यांचा मार



# ग्रामीण भागातील कला–वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या शोधात विज्ञान महाविद्यालयांची चंगळ

स्वयं अर्थसहाय्यावरील नवीन कनिष्ठ महाविद्यालयांना व अनेक अतिरिक्त तुकड्यांना मान्यता मिळाल्यामुळे ग्रामीण भागातील अनुदानित महाविद्यालयांवर विद्यार्थ्यांचा शोध घेण्याची पाळी आली आहे.

या वर्षी यवतमाळ जिल्ह्यातील २४ हजार ५६ विद्यार्थी दहावीत उत्तीर्ण झाले. मूळातच जिल्ह्याची प्रवेश क्षमता २८ हजार ५९० इतकी होती. त्यात आणखी अतिरिक्त तुकड्यांचे मागेल त्याला वाटप झाल्याने अनुदानित महाविद्यालयांवरच सक्रांत कोसळली आहे. शाळांना जोडलेली काही कायम विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालये परीक्षा केंद्र मिळवणे, विद्यार्थ्यांकडून ठरावीक रक्कम घेऊन उत्तीर्णतेची हमी देणे, त्यासाठी आपल्या तात्पुरत्या लावलेल्या शिक्षकांना कामी लावणे, यामध्येच अडकलेली आहेत. जुन्या अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक वर्ग प्रतिष्ठेमुळे अशा अवैध मार्गाकडे वळू शकत नसल्याने अशा महाविद्यालयांची विद्यार्थीसंख्या झपाट्याने रोडावत असून त्यांच्यावर प्रवेशासाठी जाहिराती करण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

कळंब तालुक्यात तेरा कनिष्ठ महाविद्यालये असून त्यात कला शाखेच्या १४, विज्ञान शाखेच्या ४ तर कला-वाणिज्य शाखेची एकमेव इंदिरा महाविद्यालयाची तुकडी आहे. इंदिरा महाविद्यालय वगळता इतर कनिष्ठ महाविद्यालये शाळेची जोडली असल्याने दहावीचे विद्यार्थी टीसी देण्यास टाळाटाळ केली जात असल्याने त्याच महाविद्यालयात ११ वीत प्रवेश घेतात. मात्र इंदिरा महाविद्यालय हे वरिष्ठ महाविद्यालयाशी जोडले असल्याने अजूनही या महाविद्यालयात मोठ्या प्रमाणावर ११ वी व १२ वीच्या प्रवेशाच्या जागा रिक्त आहेत. एटीकेटीनेही विद्यार्थी मिळत नसल्याने विनामूल्य प्रवेश दिले जात आहेत.

या वर्षी पुन्हा विज्ञान महाविद्यालयांचे वाटप झाले. त्यात यवतमाळ शहराचा अग्रक्रमांक आहे. शिक्षण विभागाची परवानगी न घेताही काही विज्ञान शाखेच्या तुकड्या सुरू करण्यात आल्या असून परवानगीची प्रक्रिया नंतर पार पाडली जाणार असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांचाही जीव टांगणीला लागला आहे.

या वर्षीपासून केवळ ३५ टक्के गुणांनी दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यालाही त्याच्या कुवतीचा विचार न करता विज्ञान शाखेत प्रवेश मिळत असल्याने विज्ञान शाखेच्या महाविद्यालयांची चंगळ सुरू झाली आहे. प्रत्येक प्रवेशामागे आर्थिक व्यवहार होत असून त्याचा फटका कला-वाणिज्य शाखांना बसला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील कला वाणिज्य शाखांना विद्यार्थ्यांना विनामूल्य प्रवेश देण्याची पाळी आली आहे.



नियमानुसार दहावीत २ विषयात विद्यार्थी अनुत्तीर्ण झाला असल्यास त्याला ११ वीत प्रवेश एटीकेटीने घेता येतो. मात्र अनेक विद्यार्थी व पालकांना ही बाब माहितीच नसल्याने आणि निकाल पडेल या भीतीने अनेक महाविद्यालये अशा विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारत आहेत. अशा विद्यार्थ्यांनी निःसंकोचपणे इंदिरा महाविद्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

नवीन महाविद्यालये व तुकड्या वाटपाने अनुदानित तुकड्या तुटल्यास, येथील शिक्षक अतिरिक्त ठरल्यास त्याची जबाबदारी शासन व शिक्षण विभाग घेईल का आणि केवळ एक आठवडा प्रवेशासाठी शिल्लक असताना ग्रामीण भागातील अनुदानित कला-वाणिज्य महाविद्यालयांनी विद्यार्थी शोधत कुठे कुठे फिरावे, हा प्रश्न मात्र आजच्या घडीला अनुत्तरीतच राहिला आहे.

**(लेखन – फेब्रुवारी २०१५**
**पूर्वप्रसिद्धी – यवतमाळमधील विविध वृत्तपत्रांतून बातमीस्वरूपात जुलै २०१५)**

रॅगिंगमध्ये दोषी आढळणाऱ्या विद्यार्थ्याला परीक्षेची परवानगी नाकारता येते. पुढील शैक्षणिक प्रवेश नाकारता येतो. जर महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा संचालक अशा विद्यार्थ्यांवर कारवाई करीत नसतील तर त्यांच्यावरही कारवाई होते. मात्र रॅगिंगचे प्रकार घडूनही बरेचदा विद्यार्थी तक्रारी करण्यास भीतीपोटी पुढे येत नाहीत. संबंधित विद्यार्थी चौकशीला घाबरतात. प्राचार्य अशा विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यापूर्वी पालकांना बोलवतात, तेव्हा पालक विविध माध्यमांतून संस्थेवर दबाव टाकून किंवा माफी मागून प्रकरण पुढे येऊ देत नाहीत. या प्रकारापासून सर्वच विद्यार्थ्यांनी दूर राहणे आणि नवीन विद्यार्थ्यांच्या मनातील भीती घालवणे, हे संस्थांप्रमाणेच पालकांचेही कर्तव्य आहे. कायदे कठोर असले तरी त्यांची अंमलबजावणी कठोरपणे होत नाही. विद्यार्थी, पालक, प्राचार्य, संस्थाचालक आणि पोलीस स्टेशनवरही दबाव असतो. प्रकरण मिटविण्याकडे सर्वांचाच कल असतो, हे जगजाहीर आहे.

असे असले तरी रॅगिंग होऊ नये म्हणून काही गोष्टी अंमलात आणणे काळाची गरज आहे. शासनाच्या निर्देशांनुसार सर्वप्रथम वर्षाच्या सुरुवातीला रॅगिंगविरोधी कायद्याची माहिती देण्याकरिता स्थानिक न्यायालय व पोलीस स्टेशनमधून माहीतगार अधिकारी यांनी अनिवार्यपणे महाविद्यालयात एक कार्यशाळा घ्यावी. या कार्यशाळेत



सहन करणारा विद्यार्थी जिवानिशी जातो. माध्यमांमध्ये दोन–चार दिवस चर्चा होते. पुन्हा सर्व शांत. नवीन सत्र सुरू झाल्यावर 'सिनियर्स' झालेले कालचे 'ज्युनियर्स' नव्याने आलेल्या विद्यार्थ्यांवर तसलाच प्रयोग करतात आणि परत एखादा बळी जातो. हे थांबवणे शक्य नाही का? निश्चितच हे सर्व रोखता येईल. मात्र त्यासाठी शासनाच्या उपाययोजनांना प्रभावीपणे राबविताना केवळ महाविद्यालयीन प्राचार्य आणि प्रशासनच नव्हे तर पोलीस यंत्रणा, समाजमाध्यमे, स्थानिक सामाजिक संस्था, पालक आणि प्रत्यक्ष विद्यार्थ्यांचा त्यात सातत्याने सहभाग असणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्याची जबाबदारी वरील सर्वच घटकांची आहे.

रॅगिंग म्हणजे वरिष्ठ विद्यार्थ्यांनी कनिष्ठ विद्यार्थ्यांना शारीरिक इजा करणे किंवा मानसिक त्रास देणे असे स्थूलमानाने मानले जाते. हे प्रकार व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या म्हणजेच इंजिनिअरिंग, मेडिकल अशा प्रकारच्या महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर होतात. त्यामानाने पारंपरिक अभ्यासक्रम शिकविणाऱ्या म्हणजेच कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांमध्ये रॅगिंगचे प्रमाण अत्यल्प असते. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या वसतिगृहांमध्ये असे प्रकार घडण्याचे प्रमाण अधिक आहे. तिथे वॉर्डन व सुरक्षा रक्षकांवर सर्व जबाबदारी असते. परंतु चोवीस तास विद्यार्थ्यांवर लक्ष ठेवणे शक्य होत

नाही. रात्री उशिरा असे प्रकार चालतात. महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये सतत चहलपहल असल्याने हा प्रकार वसतिगृहांच्या तुलनेने कमी होतो.

वरिष्ठ विद्यार्थी नवीन विद्यार्थ्यांना बॅचमेट्सची नावे व गावे पाठ करायला लावतात. अंतिम वर्षाचे व सिनियर्य विद्यार्थी यांच्यासमोर मान खाली घालून जाणे, त्यांना सतत 'गुड मॉर्निंग सर / मॅडम' अशा प्रकारे विश करणे हे प्राथमिक धडे दिले जातात. विविध कामेही सांगितली जातात. त्यात त्यांना खाद्यपदार्थ आणून देणे, कपडे धुणे, बुट पॉलीश करणे, दारू—सिगारेट—ड्रग्ज आणून देणे, प्रॅक्टिकल बुक्स, असाईनमेंन्टस, प्रोजेक्ट्स लिहून देणे असे विविध प्रकार असतात. वरिष्ठ विद्यार्थ्यांचे ऐकले नाही तर गाणे म्हणून दाखवण्यास, नाचण्यास, विविध पात्रे रंगविण्यास, मुर्गा बनण्यास, ऊठबशा काढण्यास, एका रांगेत खाली मान घालून उभे राहण्यास सांगणे असे प्रकार होतात. यामध्ये विद्यार्थिनीसुद्धा तितक्याच सामील असतात. बरेचदा या प्रकारांच्या पुढे जाऊन कपडे काढावयास लावणे, लैंगिक चाळे करावयास भाग पाडणे असेही प्रकार होतात. 'मुन्नाभाई एमबीबीएस' चित्रपटातून दाखविण्यात आलेल्या रॅगिंगचा चांगला परिणाम झाल्याचे कुठेही निदर्शनास येत नाही. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त आणण्यासाठी, डेअरिंग आणण्यासाठी किंवा सर्वांशी



परिचय होण्यासाठी रॅगिंग हा प्रकार केला जातो, असा दावा अनेक वरिष्ठ विद्यार्थी करतात. मात्र त्यात काहीही तथ्य नाही. हे सर्व न केल्यास नोट्स, आयएमपी मिळणार नाही, अशीही धमकी वरिष्ठ देतात. यातून नवीन विद्यार्थ्यांची मानसिकता नैराश्य व नकारात्मकतेकडे झुकते.

विविध वाहिन्यांवर दाखविले जाणारे समाजास अहितकारक ठरणारे कार्यक्रम, इंटरनेटच्या युगात अश्लील क्लिप्सची झालेली सहज उपलब्धता आणि चित्रपटांमधील अल्प कपड्यांच्या फॅशन्समुळे आजची नवीन पिढी ही गरजेपेक्षा अधिक आणि नको त्या बाबतील 'बोल्ड' होत चालली आहे. परिणामी गुन्हेगारीचे प्रमाणही वाढतच आहे. मुला—मुलींमधील वाढती व्यसने ही समस्या गेल्या पाच—सात वर्षांत भीषण झाली आहे. अशा पार्श्वभूमीवर गंमत म्हणून सुरू झालेले रॅगिंग किळसवाण्या प्रकारांकडे अधिक झुकले आहे. त्यामुळे सुस्वभावी, संस्कारशील व अभ्यासालाच प्राधान्य देणाऱ्या विद्यार्थ्यांना हा एक मानसिक धक्का असतो. मोबाईलमध्ये रॅगिंगची शुटींग घेतली जाते. ती क्लिप व्हायरल करण्याची धमकी देऊन अशा विद्यार्थी—विद्यार्थिनींचे सर्वप्रकारे शोषण केले जाते आणि शेवटी पीडितांच्या मनात आत्महत्येचे विचार येतात.

रॅगिंगविरोधी कायद्यात भरपूर कलमं आहेत.

मंडळाचे अनुदान मिळाले. 'दामूअण्णा' हे पुस्तक 'दै. महाविदर्भ'मध्ये क्रमश: प्रकाशित झाले आहे. सतत कार्यमग्न राहण्याचे याहून दुसरे उदाहरण कोणते असू शकेल?.... अभ्यासाच्या दृष्टीने, कर्तृत्वाच्या दृष्टीने एक संपन्न जीवन असलेला हा तरुण प्रसिद्धीपासून थोडा दूर आहे. घरूनच अभ्यासाचे बाळकडू, पुढे तरुणपणी सैन्यातील शिस्त यातून पवनचे व्यक्तिमत्त्व घडले आहे. माझ्या त्याला अनंत शुभेच्छा!

— डॉ. गोविंद कासट

सतिधाम मार्केट, अमरावती

(पूर्वप्रसिद्धी — 'दै. विदर्भ मतदार'करिता घेतलेल्या मुलाखतीतून दि. २९–७–२००१ रोजी प्रकाशित झालेल्या 'व्यक्ती–विशेष' या सदरातून निवडक अंश साभार!
दै. नवराष्ट्र, नागपूर, दि. १२–८–२००१
दै. लोकदूत, यवतमाळ, दि. १९–८–२००१)



महाविद्यालयीन प्रशासनाबरोबरच सर्व विद्यार्थ्यांची व त्यांच्या पालकांची उपस्थिती अनिवार्य असावी. पालकांनी आपल्या पाल्यांवर योग्य तो वचक ठेवून या प्रकारापासून दूर राहण्याची तंबी द्यावी. आपल्या पाल्यांचे लाड अशा प्रकरणांत मुळीच करू नये. कुठलीही लहानशी घटना घडली किंवा घडण्याची शक्यता असल्यास विद्यार्थ्यांकरिता उपलब्ध तक्रार निवारण पेटीत जागृत विद्यार्थ्यांनी लेखी माहिती टाकावी. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांची नावेही येणार नाहीत व त्यांना सुरक्षित वाटेल. परिणामी पुढे येऊ घातलेल्या संकटावर सुरुवातीलाच मात करता येईल. सर्व महाविद्यालये व वसतिगृहे सीसीटीव्हीच्या निगराणीखाली असावीच पण त्यावर लक्ष ठेवणारी यंत्रणाही सक्षम असावी. ॲन्टी रॅगिंगसंबंधी केंद्र व राज्य शासनाच्या, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या, शिक्षण संचालनालयाच्या, विविध विद्यापीठे व महाविद्यालयांच्या संकेतस्थळांवर कायदे व यासंबंधी माहिती उलपब्ध आहे. ती प्रत्येक विद्यार्थी व पालकाने वाचणे, 'गंमत' आणि 'गुलाम' किंवा 'जुलूम' यातील भेद समजणे आज गरजेचे झाले आहे. सुसंस्कारित चांगले डॉक्टर्स, इंजिनिअर्स, वकील अथवा प्रत्येकच क्षेत्रातील तज्ञ निर्माण करायचे असतील आणि देशाचा विकास साधायचा असेल तर विद्यार्थीदशेतच त्यांची मानसिकता प्रसन्न असावयास हवी. नकारात्मकता, नैराश्य,

छळवणूक या सर्व बाबींपासून दूर ठेवण्यासाठी सर्वच घटकांनी एकत्र येऊन रॅगिंगविरोधी लढा दिलाच पाहिजे. मूल्यशिक्षणाचा समावेश हा केवळ शालेय शिक्षणापुरता मर्यादित न ठेवता उच्च शिक्षण क्षेत्रातही होणे ही काळाची गरज आहे.

ОЗОЗОЗ

(लेखन – जुलै २०१९
पूर्वप्रसिद्धी – बेधडक पुरवणी, दै. देशोन्नती, नागपूर, रविवार दि. १८–८–२०१९)



# एक अभ्यासू साहित्यिक

थोर साहित्यिक प्राचार्य डॉ. भाऊ मांडवकर आणि साहित्यिक व सामाजिक कार्यकर्त्या डॉ.सौ. सिंधू मांडवकर यांचा धाकटा मुलगा प्रा. पवन मांडवकर म्हणजे एक अभ्यासू, नियमित वैविध्यपूर्ण लेखन करणारा मराठी विषयाचा प्राध्यापक. बारावीत असताना वृत्तपत्रातील जाहिरात वाचून आपल्या १०–१२ मित्रांसोबत पवननेही भारतीय वायूसेनेत भरतीसाठी अर्ज केला. ७००० विद्यार्थ्यांपैकी १० टक्के म्हणजे ७०० विद्यार्थी लेखी परीक्षेत उत्तीर्ण झाले. त्यातील पवन सातवा होता. सोळाव्या वर्षी त्याने हे मोठे यश मिळविले. पुण्याला मेडिकल कॉलेजला वैद्यकीय चाचणी, मुंबईला कॉटनग्रीनला मुलाखतीतही यशस्वी होऊन मद्रास येथे तांबरम प्रशिक्षण केंद्रात दीड वर्षांच्या प्रशिक्षणासाठी सैन्यात भरती झाला. प्रशिक्षणानंतर चंदिगढ त्यानंतर भारत–पाक सीमेवर बाडमेर जिल्ह्यातील उतरलाई या ठिकाणी त्याने सेवा केली. एअर फोर्समध्ये असतानाच खाजगीरीत्या बी.ए. आणि एम.ए. इंग्रजी पूर्ण केले. बी.एड.ला प्रावीण्य आणि एम.ए. मराठीत गुणवत्ता यादीत प्रथम आला. मराठीची नेट परीक्षा उत्तीर्ण केली....... १९९८ ते २००१ पर्यंत त्याची १० पुस्तके प्रकाशित झाली..... 'किलबिलाट' या पुस्तकाला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती